सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०५ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३११ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सरकारने मृतकांचे आकडे लपवले : अखिलेश यादव

## महाकुंभातील चेंगराचेंगरीवरून लोकसभेत आरोप

नवी दिल्ली, ०४ फेब्रुवारी : उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे आयोजित महाकुंभात २९ जानेवारी रोजी झालेल्या चेंगराचेंगरीचा मुद्दा आज, मंगळवारी पुन्हा एकदा संसदेत गाजला. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी राज्य सरकारवर चेंगराचेंगरीतील मृतकांचे आकडे लपवल्याचा आरोप केला.

महाकुंभ मेळ्यातील चेंगराचेंगरीवरून विरोधकांनी मंगळवारी देखील संसदेच्या दोन्ही सभागृहात गोंधळ घातला. लोकसभेचे कामकाज सुरू होताच अखिलेश यादव यांनी महाकुंभ अपघाताचा मुद्दा उपस्थित केला. राज्य आणि केंद्र सरकारने अपघातग्रस्तांचे आकडे लपवले आहेत. त्यांनी आकडे का लपवले ?, याचे उत्तर द्यावे. 'सरकार सातत्याने अर्थसंकल्पाचे आकडे देत आहे. त्यांनी महाकुंभात मृत्युमुखी पडलेल्यांचे आकडेही द्यावेत. महाकुंभाच्या व्यवस्थेबाबत



स्पष्टीकरण मिळविण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात यावी अशी मागणी यादव यांनी केली. त्याचप्रमाणे

महाकुंभ आपत्ती व्यवस्थापन आणि हरवलेला आणि सापडलेल्यांची केंद्राची जबाबदारी लष्कराकडे सोपवावी. महाकुंभ घटनेतील मृतांची आकडेवारी, जखमींवर उपचार, औषधे, डॉक्टर, अन्न, पाणी आणि वाहतुकीची उपलब्धता संसदेत मांडली पाहिजे. महाकुंभ दुर्घटनेला जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करावी आणि सत्य लपवणाऱ्यांना शिक्षा करावी असे यादव म्हणाले. प्रयागराज घटनेवर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शोकसंवेदनाही व्यक्त केल्या नाहीत. देशाचे राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी शोक व्यक्त केला तेव्हा राज्य सरकारने १७ तासांनंतर तो स्वीकारला. असे लोक आहेत जे आजही सत्य स्वीकारू शकत नाहीत असा आरोप अखिलेश यादव यांनी केला.

## एकाच ट्रॅकवर आल्यामुळे दोन मालगाड्यांची जोरदार धडक



उत्तर प्रदेश : उत्तर प्रदेशात भीषण अपघात घडला आहे. उत्तर प्रदेशातील फतेहपूर जिल्ह्यात रेल्वे रुळावर दोन मालगाड्या समोरा समोर येऊन मोठा अपघात झाला आहे. धडक इतकी भीषण होती की इंजिन रेल्वे रूळावरून खाली कोसळले. या अपघातामध्ये चालक आणि को पायलट गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आलेय. मात्र कोणतीही जीवित हानी झाली नसल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार फतेहपूर जिल्ह्यातील खगा कोटवाली येथील पँबपिपूरजवळ एक मालगाडी सिग्नलला थांबली होती. त्यावेळी दुसऱ्या मालगाडीने जोरदार धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच रेल्वे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

अपघातामुळे फ्रेट कॉरिडॉरवरील रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाल्याचे समजते आहे. अनेक मालवाहतूक गाड्या थांबविल्या गेल्या आहेत. काहींचे काही मार्ग बदलण्यात आले आहेत. दरम्यान या अपघातात दोन रोको पायलट जखमी असून स्थानिक रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहे. या अपघातानंतर रेल्वे प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत.

## इंडिगो एअरलाईन्सच्या २००० हून अधिक कर्मचाऱ्यांचा भाजपात प्रवेश

मुंबई, ४ फेब्रुवारी : 'राष्ट्र प्रथम' ही भावना समोर ठेऊन भाजपा राष्ट्रहितासाठी सदैव तत्पर आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार आणि राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील भाजपा-महायुती सरकार कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे असे प्रतिपादन भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज येथे केले. आज मुंबई येथील भाजपा प्रदेश कार्यालयात इंडिगो एअरलाईन्सच्या २००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी भाजपा परिवारात प्रवेश केला. याप्रसंगी पक्ष प्रवेश सोहळ्याला उपस्थित राहून भाजपा परिवारात सामील झालेल्या सर्व कर्मचारी बांधवांचे स्वागत केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिवसेना उबाठा गटाचे संबंधित असलेल्या भारतीय कामगार सेनेचे संलग्न असलेल्या तर युनियन मध्ये कर्मचाऱ्यांनी यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये युनिट अध्यक्ष करण कांबळे, युनिट सरचिटणीस दिनेश शेवाळे, युनिट उपाध्यक्ष सिराज हाश्मी, युनिट कोषाध्यक्ष चंदन कांडू, संयुक्त खजिनदार मोहम्मद शाहिद हुसेन, युनिट सेक्रेटरी रणजीत नरे, युनिट सेक्रेटरी राकेश कदम, युनिट सेक्रेटरी लक्ष्मण सुरवसे, युनिट सेक्रेटरी विजय यादव, युनिट समिती सदस्य अंकुश निकम आदी सदस्य आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

## बेकायदेशीर स्थलांतरितांना घेऊन अमेरिकेचे लष्करी विमान भारताकडे रवाना

वॉशिंगटन , ४ फेब्रुवारी : डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांविरुद्ध तीव्र कारवाईला आता सुरुवात केली आहे. त्यानुसार, अमेरिकेत बेकायदा राहणाऱ्या स्थलांतरितांना घेऊन जाणारे अमेरिकेचे लष्करी विमान भारताकडे रवाना झाले आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सी-१७ विमान स्थलांतरितांना घेऊन भारताकडे रवाना झाले आहे. परंतु ते किमान २४ तासांपर्यंत पोहोचणार नाही. यूएस इमिग्रेशन अँड कस्टम्स एन्फोर्समेंटने (आयसीई) सुमारे १८ हजार कागदपत्रे नसलेल्या भारतीय नागरिकांची प्रारंभिक यादी तयार केली आहे. दरम्यान अमेरिकेहून भारताच्या दिशेने निघालेल्या



विमानात कितीजण आहेत, हे स्पष्ट झालेलं नाही. डोनाल्ड ट्रम्प त्यांचा इमिग्रेशन अजेंडा राबवण्यासाठी लष्कराचा वापर करत आहेत, ज्यामध्ये अमेरिका-मेक्सिको सीमेवर अतिरिक्त सैन्य पाठवणे, स्थलांतरितांना देशाबाहेर नेण्यासाठी लष्करी विमानांचा वापर करणे आणि त्यांना राहण्यासाठी लष्करी तळ उघडणे यांचा समावेश आहे. पेंटागॉनने एल पासो, टेक्सास आणि सॅन दिएगो, कॅलिफोर्निया येथे अमेरिकन अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेल्या ५ हजारांहून अधिक स्थलांतरितांना परत पाठवण्यासाठी विमान सेवा सुरू केली आहे. आतापर्यंत, लष्करी विमानांनी ग्वाटेमाला, पेरू आणि होंडुरास येथे स्थलांतरितांना नेले आहे. अमेरिकेत बेकायदा स्थलांतरितांचा मुद्दा गाजत आहे. जानेवारी महिन्यात ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतली त्यानंतर पहिल्यांदाच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवर चर्चा केली.यावेळी अमेरिकेत बेकायदेशीरपणे आलेल्या भारतीय स्थलांतरितांना परत घेण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी जे योग्य आहे ते करतील असे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी म्हटले होते.दोन्ही नेत्यांमध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा झाल्यानंतर हे वक्तव्य समोर आले होते.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे घेणार विभागाचा आढावा; नागरिकांसोबत साधणार संवाद

छत्रपती संभाजीनगर, दि. ०४, (विमाका) :- राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शुक्रवार, ७ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून विभागातील विविध विषयांचा ते आढावा घेणार आहेत. सकाळी १० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय पातळीवरील आढावा घेणार आहेत. यासाठी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व अपर जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

दुपारी ०२ ते ०४ दरम्यान नागरिकांसाठी राखीव असून महसूलमंत्री श्री. बावनकुळे हे नागरिकांशी संवाद साधणार असून नागरिकांच्या समस्या जाणून घेणार आहेत. नागरिकांना भेटण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय येथे व्यवस्था करण्यात आलेली आहे.

दुपारी ०४ वाजता नोंदणी महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा घेण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील नोंदणी महानिरीक्षक, सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे.

सायंकाळी ०६ वाजता भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा घेतला जाणार आहे. यावेळी उपसंचालक, भूमी अभिलेख यांच्यासह विभागातील सर्व जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख उपस्थित राहणार आहेत. आढावा बैठका व नागरिकांना भेटीचा कार्यक्रम विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार असे महसूल विभागाच्या अपर आयुक्त नयना बोंदर्डे यांनी कळविले आहे.

## भूतानच्या राजांचे त्रिवेणी संगमात स्नान

प्रयागराज : भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक भारताच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज, मंगळवारी प्रयागराजला भेट दिली. याप्रसंगी महाकुंभाच्या निमित्ताने त्यांनी त्रिवेणी संगमात स्नान केले. यावेळी त्याच्यासमवेत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ होते. दोघांनी गंगेची पूजा आणि आरती केली. यानंतर वांगचुक यांनी अक्षयवटचे दर्शन घेतले.

भूतानचे राजे वांगचूक लखनऊहून विमानाने बामरौली विमानतळावर पोहोचले. याठिकाणी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांचे स्वागत केले. अरैल घाटावरून ते होडीने प्रयागराजमधील संगम घाटावर पोहोचले. येथील संगमात त्यांनी स्नान केले. यानंतर वांगचूक यांनी योगींसोबत पक्ष्यांना खायला दिले आणि त्यांचा फोटोही काढले. पंतप्रधान मोदी ५ फेब्रुवारी रोजी महाकुंभाला भेट देतील. यानंतर हेलिपॅड, योगसेना रेल घाट आणि संगम येथील व्यवस्थेची पाहणी करतील.

दरम्यान, गेल्या १३ जानेवारीपासून आतापर्यंत ३७ कोटी लोकांनी पवित्र स्नान केले आहे. तर सोमवारी (३ फेब्रुवारी) वसंत पंचमीनिमित्त २ कोटी ३३ लाख लोकांनी महाकुंभात स्नान केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आगामी १० फेब्रुवारी रोजी प्रयागराज येथे भेट देणार आहेत.

## राज्यपालांच्या हस्ते सारा तेंडुलकर सन्मानित

मुंबई : एका सुप्रसिद्ध माध्यम समूहातर्फे कॉर्पोरेट सामाजिक दायित्व पुरस्कार राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज (दि. ४) मुंबई येथे प्रदान करण्यात आले. आपल्या सामाजिक दायित्व निधीतून आरोग्य, शिक्षण यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते कॉर्पोरेट समूह, सार्वजनिक उपक्रम, उद्योग, सामाजिक संस्था व समाजसेवी व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नवभारत-नवराष्ट्र तेजोत्सव या कॉफी टेबल पुस्तकाचे देखील प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला नवभारतचे व्यवस्थापकीय संपादक निमिष माहेश्वरी, मेघाश्रेय फाउंडेशनच्या संस्थापिका सीमा सिंह, अध्यक्ष, बजाज फाउंडेशनचे अध्यक्ष शिशिर बजाज तसेच निमंत्रित उपस्थित होते. यावेळी जेएसडब्ल्यू फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी



हर्षवर्धन नवाथे, सचिन तेंडुलकर फाउंडेशनच्या संचालिका सारा तेंडुलकर, पीएनजी ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ यांसह एल अँड टी, टाटा मोटर्स, एसबीआय फाउंडेशन, डॉ डी वाय पाटील शिक्षण समूह, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, रायन इंटरनॅशनल, ग्रांट मेडिकल फाउंडेशन आदी संस्थांच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

## शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने १ कोटी १० लाखांची फसवणूक; सायबर पोलिसांकडून चौघेजण अटकेत

नगरः शेअर ट्रेडिंग मध्ये २० ते ३० टक्क्यांपर्यंत परताव्याचे अमिष दाखवून तसेच विश्वास संपादन करून मोबाईल पच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास भाग पाडले. १ कोटी १० लाख ८० हजार रुपये जमा झाल्यानंतर कोणताही परतावा न देता प ब्लॉक करून फसवणूक केली.

याबाबत नगर सायबर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम, उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार अभिजीत



अरकल, योगेश गोसावी, राहुल मुसळे, निळकंठ कारखेले, अरुण सांगळे, मोहम्मद शेख, मल्लिकार्जुन बनकर, दिगंबर कारखेले, महिला अंमलदार दिपाली घोडके, सविता खताळ, प्रीतम गायकवाड यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सखोल तपास केला. याबाबत प्रवीण दत्तू लोंढे, शिवाजी साहेबराव साळुंके, सागर उर्फ केशव कुलकर्णी, महावीर दिगंबर कांबळे या चौघांविरुद्ध आयटी ॲक्ट तसेच विविध कलमांअन्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

सायबर फसवणुकीचे वाढते प्रकार लक्षात घेता गुंतवणूक करताना ज्यादा परताव्याच्या आमिषाला बळी न पडता सावगिरी बाळगावी असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम यांनी केले आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'सुनबाई लय भारी' चित्रपटाचं पोस्टर लाँच

मुंबई, ४ फेब्रुवारी : दिग्दर्शक शिवाजी दोलताडे आता सुनबाई लय भारी हा चित्रपट घेऊन येणार आहेत. महिला सक्षमीकरण या विषयावर बेतलेल्या धमाल मनोरंजन करणाऱ्या चित्रपटाचं पहिलं पोस्टर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लाँच करण्यात आलं असून, मार्च महिन्यात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर चित्रपटाचं चित्रीकरण सुरू करण्यात येणार आहे.

सोनाई फिल्म क्रिएशन तर्फे सुनबाई लय भारी या चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे. चित्रपटाच्या पोस्टर लाँच वेळी चित्रपटाचे लेखक, निर्माते गोवर्धन दोलताडे, अभिनेते रोहन पाटील, आमदार तुकाराम बिडकर उपस्थित होते.




## बिडकीन चितेगाव येथे धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात - संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ४ फेब्रुवारी : पैठण ते नक्षत्रवाडी पर्यंत जलवाहिनी टाकण्याचे काम व चौपदरीकरणाचे काम काही महिन्यापासून चालू आहे बिडकीन चितेगाव येथे कित्येक महिन्यापासून या कामामुळे रस्त्याची दूर अवस्था झाली रस्त्यावरती मोठाले खड्डे पडले असून रस्त्यावरून जड वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने या वाहनांमुळे धुळीचे साम्राज्य पसरले आहे.

शेकटा फाटा ते निलजगाव फाटा रस्त्याची संपूर्ण चाळण झाली असून यामुळे रस्त्यावर



सर्वत्र धुळीमुळे अनेक छोटे मोठे अपघात घडत आहे,या धुळीने शाळेकरी विद्यार्थी, वयोवृद्ध, नागरिकांना या धुळीमुळे मोठा आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, व रोडवरती असलेल्या लहान मोठ्या व्यापारांच्या दुकानांमध्ये धुळीने थर साचलेले आहे धूळ बसल्याने व्यापाऱ्याचे वस्तू विक्री होत नाही.

बिडकीन ग्रामपंचायतच्या वतीने अनेक वेळा शेकटा फाटा ते निलजगाव फाटा पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी अनेक वेळा निवेदन देण्यात आले आहे, व रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते, परंतु संबंधित अधिकारी यांच्याकडून फक्त आश्वासन देण्यात येते,बिडकीन चितेगाव गावातील चौपदरी रस्त्याचे काम कधी होणार असा नागरिकांना मोठा प्रश्न निर्माण झाला आहे या धुळीमुळे सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

रस्त्याचे चौपदरी काम लवकर करण्याची मागणी नागरिकांतून होत असून नसता बिडकीन चितेगाव येथे स्थानिक नागरिकांकडून रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे तरी संबंधित अधिकारी यांनी रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी नागरिकाकडून करण्यात येत आहे.

## जालना जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक संपन्न

# ऑलिम्पिक स्पर्धेतील दर्जाचा स्विमींग पुल तयार करण्यात यावा -पालकमंत्री पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या शहरासह ग्रामीण भागातून उत्तम खेळाडू घडून त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्याचे आणि देशाचे प्रतिनिधीत्व करावे अशी माझी इच्छा आहे. तरी जिल्हा क्रीडा संकुलात उभारणी करण्यात येणारा स्विमींग पुल आकर्षक रचनेसह ऑलिम्पिक स्पर्धेतील दर्जाचा स्विमींग पुल तयार करण्यात यावा, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

जालना जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस आमदार



बबनराव लोणीकर, आमदार अर्जून खोतकर, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता स्मिता पवार, यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जिल्ह्यात क्रीडा संस्कृती वाढत आहे.

विविध खेळामध्ये उदयोनमुख खेळाडू सराव करत आहेत. तसेच लगतच्या जिल्ह्यातील जलतरण स्पर्धेतील खेळाडूंना येथे संधी मिळेल असे पहावे. स्विमींग पुलाचे काम करत असतांना बालेवाडी येथील कॉमनवेल्थ स्पर्धेत वापरण्यात आलेल्या स्विमींगपु-लचे प्रथमत: अवलोकन करावे. स्नानगृहाचा परिसर स्वच्छतेसह कोरडा राहील याप्रकारे उभारणी करावी. तसेच क्रीडा संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात येवून स्विमींग पुलासह इतर ठिकाणी वापरात येणाऱ्या पाण्याचा अपव्यय टाळावा. जिल्हा क्रीडा संकुलातील टप्पा-१ चे काम संपुर्ण करुन वापरात आल्यानंतर टप्पा -२ मधील ४०० मीटर सिथेंटीक ट्रॅक, नॅचरल ग्रास फुटबॉल मैदान, धावपट्टी तसेच मल्टीपर्पज सभागृहाचे कामकाज हाती घेण्यात यावे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी क्रीडा संकुलात करण्यात येणाऱ्या कामकाजाची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# बौद्ध धम्म परिषद साजरी; शेकडो अनुयायांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील इब्राहिमपूर येथे दिनांक २ फेब्रुवारी रविवार रोजी पहिली धम्म परिषदचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी भदंत भिक्कूची गावातून मिरवणूक काढत उपासकव उपाशीका तसेच बालिकाच्या वतीने भदंत भिक्कूच्या डोक्यावर फुलांची पुस्पवृस्टी करत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे, सकाळी पूज्यभदन्त राहुल राज यांच्या हस्ते धम्मध्वजारोहण करण्यात आले, दरम्यान यावेळी सकाळपासूनच गावामध्ये आनंदाचे वातावरण पहायाला मिळाले, दुपारी भदंतभिक्कूच्या भोजन दानानंतर परिषदेस सुरुवात झाली.

यावेळी पूज्यभदन्त भिक्कू आर आनंद थेरो,पूज्यभदन्त संघरत्न,पूज्यभदन्त फ्राआजान खंनतीको थायलंड,पूज्यभदन्त रोहित,पूज्यभदन्त राहुलराज यांनी उप-स्थितीतांना प्रवचन मधून धम्माचा संदेश दिला, याप्रसंगी पूज्यभदन्त भिक्कू आर आनंद यांनी आपल्या प्रवचन प्रवचनातून सांगितले की बुद्ध सांगतात की प्रत्येक वेळी मंगलमय आहे, धम्माचा आचरण करण्यासाठी म्हणून वाईट वेळ कोणतीच नसते दुःखाची वेळ कोणतीच नसते, ती आपण तयार करतो परंतु धम्माच्या भाषेमध्ये सांगायचं तर धम्माच वारणवार अचारण करण्यासाठी प्रत्येक वेळ काळ हा मंगलमय आहे, तथागत गौतम बुद्धाने आपल्याला २५६८ वर्षांपूर्वी संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी व मानव जातीच्या मंगल साठी खूप छान प्रकारे सद्धम्म दिला आहे, तो सदधम्म अनुयायी आह-ोत, या जगामध्ये सर्वात प्रथम जर कोणी जगामध्ये दुःख आहे तर ते भगवान बुद्धांनी सांगितलेआहे, परंतु दुःख भगवान बुद्धांनी सांगितले, परंतु दुःखद भगवान बुद्धाने सांगितले नाही तर ते दुःख काय आहे त्याचे कारण ही भगवान बुद्धाने सांगितलं तर आपण चार आर्य सत्य आहे मनात असतो की दुःख, दुःख समुदाय, दुःख निरोग, दुःख निरोगी घामेली पतीपदायक हे चार आर्य सत्य भगवान बुद्धाने सांगितले ते त्यांनी यावेळी संबोधित केले, या कार्यक्रमाला सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी रमेश घेबंदे, सरपंच रामसिंग डोभाळ, गोविंद सिंग भेंडरवाल, नगरसेवक दीपक बोर्डे, सेवानिवृत्त नगरपरिषद अधीक्षक शामराव दांडगे, प्राध्यापक टी आर कांबळे, केंद्रप्रमुख नरवाडे सर, मुख्याध्यापक पगारे सर, पत्रकार कमल किशोर जोगदंडे, सरपंच सिद्धार्थ वेलदोडे,प्रा. अशोक नवगिरे, यांच्यासह शेकडोच्या संख्येने उपासक उपासिकेची उपस्थिती होती, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन बोर्डे यांनी केले, हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी गजेंद्र पगारे ऋषिकेश पगारे शांतीलाल पगारे विजय पगारे पत्रकार युवराज पगारे,राहुल पगारे,अमोल पगारे, संजय पगारे, वसंत साळवे,यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### परतूर येथे रथसप्तमी निमित्त तालुका स्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व स्पर्धा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतूर येथे रथसप्तमीच्या निमित्ताने लॉयन्स क्लब यांच्या वतीने तालुकास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण आणि स्पर्धेचे आयोजन परतुर येथील इंदिरा मंगल कार्यालयामध्ये करण्यात आले. या उपक्रमात १०० हून अधिक योगसाधकांनी सहभाग घेतला आणि सामूहिकरीत्या १०८ सूर्यनमस्कार पूर्ण केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विशेष योग प्रशिक्षक राधा तांबे यांनी सूर्यनमस्काराचे शास्त्रीय पद्धतीने प्रशिक्षण दिले. तसेच प्रमोद टेकाळे, गजानन वायाळ, अश्विनी मोरे आणि संतोष हरकळ यांनीही योगशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. या वेळी मनोहर खालापुरे, डॉ. कदम, दाभाडे, मुकुंद शेपाळ,संजीवनी खालापुरे यांच्यासह विविध पदाधिकारी, योग शिक्षक व योगसाधक उपस्थित होते. कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच स्पर्धेत पहिल्या १२ विजेत्यांना विशेष प्रमाणपत्र आणि मेडल प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लॉयन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम योगप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरला असून, भविष्यातही अशाच उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### विवेकानंद इंग्लिश स्कूल, परतूर मध्ये रथसप्तमी निमित्त सूर्यनमस्कार प्रशिक्षण उत्साहात संपन्न!



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

रथसप्तमीच्या निमित्ताने सूर्यनमस्काराचे महत्त्व अनन्यसाधारण असून, निरोगी आरोग्य व सकारात्मक ऊर्जेसाठी सूर्यनमस्कार महत्त्वाचे मानले जाते. विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य व आनंद वाढावा, या उद्देशाने विवेकानंद शाळेच्या वतीने विशेष सूर्यनमस्कार प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी योगतज्ञ राधा तांबे व गजानन वायाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थ्यांनी १२ सूर्यनमस्कारांचे शास्त्रीय पद्धतीने प्रशिक्षण घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनानंतर शाळेचे अध्यक्ष संदीप बाहेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग, ध्यान व प्राणायाम महत्त्वाचे आहेत. शाळेत अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. कार्यक्रमाच्या यशस्वी-तेसाठी भालचंद्र महाजन सर, विजय धंदाळे सर व शिक्षकवृंदांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक ऊर्जा हा कार्यक्रमाचा मुख्य गाभा ठरला!

# जिल्हाधिकारी कार्यालयात खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा क्षयरोग केंद्र, आयएमए जालना, निमा वैद्यकीय व्यावसायिक व ओएचसी यांचा कार्यक्रमात सहभाग वाढविण्याकरीता कार्यशाळेचे आयोजन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल भवनात दि.४ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली दीपप्रज्वलन व डॉ.रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन करण्यात आले.

कार्यशाळेत प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच टीबी आजार आरोग्याची सार्वजनिक समस्या असुन त्याचे निर्मुलन करण्यासाठी सर्वांनी सहभाग घेऊन क्षयरोग निर्मुलनासाठी प्रयत्न करावेत, असेही सांगितले. कार्यशाळेस जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे , जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.जी.एम.कुडलीकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.राजेंद्र गाडेकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल सोनी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गजानन मस्के, जागतिक आरोग्य संघटना सल्लागार डॉ.कौस्तव दासगुप्ता, स्टेट टेक्नीकल सपोर्ट युनिच्या डॉ.गिरीजा ठाकुर, नोडल ऑफिसर डॉ.जहिर शहा, आयएमए सचिव डॉ.अनंत बोरीवाले, निमा संघटनेचे सचिव डॉ.कच्छवा, वैद्यकीय अधिकारी डॉ.परशुराम नागदरवाड आदिंची उप-स्थिती होती. कार्यशाळा यशस्वी-तेसाठी जिल्हा क्षयरोग केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# मंठा पोलीसांनी पकडले अवैध रेती वाहतुक करणारे २ ट्रॅक्टर

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

तळणी परीसरात अवैध वाळु वाहतुक सुरु आहे. खात्रीलायक बातमी मिळताच. मा.पोलीस निरीक्षक श्री निकाळजे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक नेमुन दिनांक ०२.०२.२०२५ रोजी सकाळी ०४.४५ ते ०५.३५ वाजे दरम्यान मौजे वाघाळा ता. मंठा येथील पुर्णा नदी पात्रातुन १) ट्रॅक्टर चालक नामे त्र्यंबक किसन काळे यांच्या ताब्यातुन चक-३८ इड ५१४६ तसेच २) चालक नामे हनुमान रामभाऊ घुले यांच्या ताब्यातुन विना नंबर असलेले महिंद्रा कंपनीचे ५७५ऊख असे दोन ट्रॅक्टर अवैध रेती वाहतुक करतांना ताब्यात घेण्यात आले. यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असुन रेती व ट्रॅक्टर असा एकुण १४,१६,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस हवालदार मुंढे हे करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक जालना श्री अजय बन्सल साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर श्री दादाहरी चौरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक श्री रविंद्र निकाळजे, सपोनि श्री पोउपनि श्री संतोष माळगे, यांच्या सह पोलीस ठाणे मंठा येथील पोह/मुंढे, तुळशीराम बिजुले, मनोज काळे, आसाराम मदने, श्रीकांत काळे, संतोष बनकर ईत्यादी स्टाफ यांनी केली.

# जालन्यात गावठी पिस्टल बाळगणारा एक जण जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालन्यात गावठी पिस्टल बाळ-गणाऱ्या एकास पोलिसांनी जेरबंद केलय. जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली असून यात ४० हजार रुपये किंमतीची एक गावठी पिस्टल पोलिसांनी जप्त केलीय. जालना शहरातील गंगाधरवाडी रेवगावरोड येथे गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारून अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एकास ताब्यात घेतलंय. विकास गणेश म्हस्के (वय २३ वर्ष, रा. गंगाधरवाडी, जालना) असं या तरुणाचे नाव आहे. या कारवाईत पोलिसांनी




गावठी पिस्टल जप्त केली असून तालुका जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहेसदरील कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पो-लीस निरिक्षक पकंज जाधव,सहायक पोलीस निरिक्षक योगेश उबाळे,पोलीस उपनिरिक्षक राजेंद्र वाघ,रामप्रसाद पव्हरे,गोपाल गोशिक,रमेश राठोड,देविदास भोजने,रमेश काळे,फुलचंद गव्हाणे,ईरशाद पटेल,सतिष श्रीवास,अंकुर धांडगे,भाऊराव गायके,लक्ष्मीकांत आडेप आणि कैलास चेके यांनी कारवाई केलीय

# शेतकऱ्यांना पिकविम्याची अग्रीम तत्काळ द्या, किसान मोर्चाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधि**

शेतकऱ्यांना पिकविम्याची २५ टक्के अग्रीम पिक विमा कंपनीनी त्वरीत द्यावी अशी मागणी भाजप किसान मोर्चाचे प्रदेशउ-पाध्यक्ष राजेश मोरे यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे



याबाबत शेतकऱ्यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की शेतकऱ्यांचा कोट्यवधी रुपयांचा पिकविमा महाराष्ट्र शासनाने पिकविमा कंपणीला भरला आहे , खरीप हंगामातील पिकांचा पिकविमा शेतकऱ्यांकडून केवळ एक रूपयात भरुन घेतला आहे ,महाराष्ट्र शासनाच्या सुचनेनुसार पिकविम्याची २५ टक्के अग्रीम तत्काळ शेतकऱ्यांना मंजूर करण्याच्या सुचना सुद्धा करण्यात आली होती मात्र कित्येक महिन्यात पिकविम्याची अग्रीम आद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही,यामुळेच पिकविमा कंपनीच्या चुकीमुळे,शेतकऱ्यांबाबत चांगल काम करत असतांना ,शेतकऱ्यांची राज्य सरकार बद्दल नाराजी होत आहे ,शेतकऱ्यांना तत्काळ पिकविम्याची अग्रीम मिळाली नाही तर कंपनीच्या कार्यालयाला कुलूप लावण्याचा इशारा भाजप किसान मोर्चाचे प्रदेशउपाध्यक्ष राजेश मोरे यांच्यासह शेतकऱ्यांच्या वतिने देण्यात आला आहे तसेच शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अणूदान सुद्धा त्वरीत देण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे या निवेदनाची प्रत आ.बबनराव लोणीकर यांना देण्यात आली आहे

# पारध मध्ये कोणी वाचनालय देता का वाचनालय?

## भल्या मोठ्या लोकसंख्येच्या गावाला वाचनालयही मिळेना? युवकांचे ग्रामपंचायतीला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

शासनाचा वाचन संस्कृती संवर्धनासाठी प्रेरणादायी असलेला 'गांव तेथे ग्रंथालय' उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतींनी सार्वजनिक ग्रंथालय साकारणे गरजेचे आहे. परंतु याकडे दुर्लक्ष होत असून बहुसंख्य ग्रामपंचायत, गावात सार्वजनिक ग्रंथालये नाहीत.

राज्य शासनाची 'गाव तिथे ग्रंथालय' या योजनेची मागील काही महिन्यांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी घोषणा केली होती की गाव तिथे ग्रंथालय ही योजना आता मोठ्या प्रमाणावर अमलात आणणार आहोत आणि त्याप्रमाणे सर्वांना आदेशही देण्यात आले होते. परंतु ग्रामपंचायतीद्वारे याकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. त्याच अनुषंगाने भोकरदन तालुक्यातील पारद (बु) हे एक



मोठे गाव म्हणून ओळखले जाते. परंतु अजून देखील या गावातील युवकांना वाचनालय उपलब्ध नाही . पण हीच खंत गावातील नवतरुण युवक व्यक्त करत आहे. त्याच अनुषंगाने पारद( बु) येथील युवकांनी शासनाच्या गाव तिथे ग्रंथालय या योजनेच्या माध्यमातून गावात ग्रंथालय सुरू करावे यासंबंधीचे निवेदन अनेक विद्यार्थ्यांच्या सहीनिशी ग्रामपंचायत पारद (बु ) दिले असून याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली आहे. राज्य शासन, ग्रामविकास विभाग यांच्या शासन निर्णय व राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानाच्या माहिती पुस्तिकेत, तसेच केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीतून लोकोपयोगी विकास कामाच्या यादीतही 'सार्वजनिक वाचनालय' हे प्रमुख उद्देश आहे. वाचन संस्कृतीपासून शालेय विद्यार्थी वंचित राहू नयेत, यासाठी ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या वित्त आयोगाच्या अनुदान माध्यमातून गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय तयार करता येईल. यासाठी ग्रामपंचायतींनी ग्रंथालय साहित्यासाठी आराखड्यात स्वतंत्रपणे तरतूद करावी, असे निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनाचा पाठपुरावा ग्राम पंचायतीने करावा आणि युवकांनी वाचनालय उपलब्ध करण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा हीच विनंती गावातील युवकांनी केली त्यामधे किशोर लोखंडे, सागर लोखंडे, राजु देशमुख, सागर तेलग्रे,अमोल लोखंडे, आदेश कोथलकर, सागर देशमुख, विकास लोखंडे, यानी निवेदनाच्या माध्यमातून ग्रामसेवक संजय पुरी व सरपंच बाबुराव काकफळे यांच्या कडे निवेदन देण्यात आले.

पारध हे गाव तालुक्यातील सर्वात मोठे गाव आहे पारध येथे मोठाले तीन कॉलेज असल्यामुळे पारध मध्ये स्पर्धा परीक्षा करणारे विद्यार्थ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे, आज स्पर्धा परी-क्षेच्या युगात मुलांना अभ्यास करण्यासाठी वाचनालय आवश्यक आहे, पारध येथील स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी बुलढाणा, संभाजीनगर, पुण्यासारख्या ठिकाणी जाऊन अभ्यास करतात आज सर्वसामान्य घरातल्या मुलाला हे शक्य नाही त्यामुळे कुठेतरी ग्रामीण भागात सुद्धा असे स्पर्धा परीक्षेचा वातावरण जर तयार करायचा असेल तर नक्कीच ग्रामपंचायतीने वाचनालय पारध येथे सुरू करावे. जेने करून सर्वसामान्य कुटुंबातील मुलींना सुद्धा पारध सारख्या ठिकाणी अभ्यास करता येईल, सागर देशमुख यांनी व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जलवाहिनीच्या अडथळ्यांची कोर्टाच्या समितीने बिडकीन येथे केली पाहणी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ४ फेब्रुवारी छत्रपती संभाजीनगर मंजूर करण्यात आलेल्या नवीन २७४० कोटींच्या जलवाहिनीच्या कामासंबंधीची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात सुरु आहे, नुकतीच जलवाहिनीला अडथळा ठरणाऱ्या दोन मालमत्तांची पाहणी करण्याचे आदेश न्याय न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती अशिवन भोबे यांनी दिले होते, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वकील संघाच्या समितीने दोन मालमत्तांची पाहणी केली बिडकीन जवळ असलेल्या श्रीसाई मंदिर आणि एक हॉटेलच्या मालमत्तांची पाहणी करण्यात आली,पैठण छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या खाली १८,कि मी जलवाहिनी आल्याने अडचण निर्माण झाली आहे, संबंधित जलवाहिनीची देखभाल दुरुस्ती कशी करणार, जलवाहिनी मल्टिकसल वाहनांच्या दाबाने फुटली तर मोठी जीवितहानी शक्य असल्याची बाब समोर आली आहे,पैठण रस्त्यावरील दोन मालमत्तांमुळे रस्त्याचे काम अडल्याची बाब समोर आल्याने उच्च न्यायालयाने वकिलांची समिती गठित करुन प्राथमिक चर्चा करण्याचे निर्देश दिले होते, समिती मध्ये मुख्य सरकारी वकील अमरजीत सिंह गिरासे, मनपाचे वकील अँड विनोद पाटील,एन एच एआयचे ज्येष्ठ विधिज्ञ संजीव देशपांडे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, आदींचा या पाहणी समिती मध्ये समावेश होता, यावेळी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे, संदीप धनेधर हजर होते.



बिडकीन जवळ रस्त्याला लागून असलेल्या श्रीसाई मंदिरच्या भागात छोटे हनुमान मंदिर आहे, संबंधित हनुमान मंदिराच्या दरवाजा रस्त्यांत येतो, रेड्डी नामक व्यक्ती मंदिराचे काम बघतात, संबंधितांनी सहकार्य करण्यास अनुमती दर्शविली आहे, रस्त्याचे काम करण्यास श्री साई मंदिराची हरकत नसल्याचे त्यांनी सांगितले पुढील हॉटेल आनंदाचे शेड आणि बोर्ड लावण्यात आले आहे, समितीने चर्चा केली तेव्हा त्यानी आपणास मावेजा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली, विरुद्ध दिशेला २५००,१२००,९००,७०० मीटर जलवाहिनी टाकलेली आहे,हॉटेलचे बोर्ड आणि दरवाजा काढल्यास गाड्या लावण्यास वाहनतळ शिल्लक राहत नाही,आता व्यवसाय येथे असल्याचे संबंधित मालमत्तांधारक राजेंद्र चव्हाण यांनी पाहणी करण्यासाठी आलेल्या समितीला सांगितले

## मुख्य वरिष्ठ मार्गदर्शक म्हणून विजय कल्याणकर तर मराठवाडा संपर्कप्रमुख म्हणून अनिता काटे यांची निवड



छत्रपती संभाजीनगर - येथील आदर्श सुवर्ण नात्यांचे व्यासपीठ चे २०२५-२६ ची नवीन कार्यकारणी निवड संदर्भात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये आदर्श सुवर्ण नात्यांचे व्यासपीठ छ.संभाजीनगर २०२५-२६ या वर्षाची नवीन कार्यकारणी सर्वानुमते घोषित करण्यात आले. यावेळी मुख्य वरिष्ठ मार्गदर्शक म्हणून विजय कल्याणकर , अशोक काटे राजेंद्र काळे ,तर मराठवाडा संपर्कप्रमुख म्हणून अनिता अशोक काटे यांची निवड करण्यात आली.

मुख्य कार्यकारणी पंचकमिटी अध्यक्ष म्हणून भरत कल्याणकर, उपाध्यक्ष दत्तात्रय काटे, सचिव ज्ञानेश्वर लाखोळकर, कोषाध्यक्ष नवनाथ काटे, कार्याध्यक्ष संतोष लिवेकर, मुख्य मार्गदर्शक उमेश क्षिरसागर.

**कार्यकारणी युवा आघाडी –** युवा अध्यक्ष राजेंद्र कावळे ,उपाध्यक्ष नितेश कल्याणकर, युवा सचिव योगेश काटे यांची निवड करण्यात आली. महिला आघाडीमध्ये अध्यक्षा म्हणून शकुंतला संतोष लिंबेकर, उपाध्यक्ष रूपाली राजेंद्र कांबळे, सचिव स्वाती कृष्णा डिगूरकर ,याची निवड करण्यात आल्याची या वेळी घोषणा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संतोष हिशोबे, सत्यजित लाखोंलकर, प्रमोद शिरसागर व समस्त सोनार समाज यांनी परिश्रम घेतले.

## एसटी कामगार संघटनेच्या गंगापूर अध्यक्षपदी नीरज वैजापूरकर तर सचिवपदी सोन्याबापू कळमकर



गंगापूर दि.४ : महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना छत्रपती संभाजीनगर विभागाच्या गंगापूर अध्यक्षपदी नीरज वैजापूरकर तर सचिव पदी सोने बापू कळमकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. गंगापूर येथे झालेल्या बैठकीत विभागीय सचिव बाबासाहेब साळुंके विभागीय अध्यक्ष रवींद्र डाखोरकर विभागीय कार्याध्यक्ष एन.एस. दराडे, दिलीप अण्णा मनाळ, यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी नंदकिशोर जाधव,साईनाथ भालेराव, सोपान भुतेकर, राजू मुळे, संदीप कदम,संजय कापसे,गणेश पाटील, के.एस. सोनवणे, राजेंद्र सोनवणे, दीपक माळी, रामनाथ दगडे, मोहन पांचाळ, राजू काळे, सुखदेव सोनवणे, बापू इथापे, चंद्रकांत मस्के, कपिल तायडे, भाऊसाहेब पांढरे,वसीम अक्रम, बाळासाहेब पाटील, भाऊसाहेब आव्हाड, अमोल बोरगे, सौ.क्रांती धायडे, नाना पाठक, सदाशिव नाईक, जितेंद्र शिंदे, तुषार तायडे राहुल भगत, सुनील कुंडारे, भगवान लांडगे ,जालिंदर जायभाये सुरेश सामसे, सुनील पंढोरे,जिवन दलाल, कृष्णा वाघ अविनाश हिवाळे, बी. एस. दवणे, भाऊसाहेब गाडेकर, सतीश पांचाळ ,मच्छिंद्र जाधव, प्रमोद शिंदे, गणेश राऊत, उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर कदम यांनी केले.

## ईयर सोल्युशन्सने त्यांचे ३० वे क्लिनिक सुरू

ठाणे : ईयर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडने ठाणे पश्चिम, मुंबई येथे त्यांचे ३० वे क्लिनिक सुरू केले आहे. हे क्लिनिक उथळसर नाका येथील राधा सहनिवास अपार्टमेंट येथे आहे आणि कंपनीच्या विस्तार धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. श्रवण समस्यांनी ग्रस्त असलेल्या लोकांना प्रगत श्रवण सेवा प्रदान करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. क्लिनिकच्या उद्घाटन समारंभाला वैद्यकीय तज्ज्ञ, ऑडिओलॉजिस्ट आणि स्थानिक मान्यवर उपस्थित होते. श्रवण आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कंपनीच्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. तज्ञांच्या मते, वेळेवर निदान आणि योग्य उपचारांनी श्रवणविषयक समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकतात. या उद्देशाने, इअर सोल्युशन्स सतत नवीन क्लिनिक उघडत आहे, जेणेकरून अधिकाधिक लोकांना या सुविधेचा लाभ घेता येईल.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये मोफत कर्करोग तपासणी शिबिर आणि मोफत कॅन्सर स्पेसिएॅलिस्ट कंसल्टेशन

छत्रपती संभाजीनगर : कॅन्सरचे वाढते प्रमाण ओळखून मेडिकव्हर हॉस्पिटलने नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी पुढाकार घेत जागतिक कर्करोग दिना निमित्य मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये ३ ते ८ फेब्रुवारी पर्यंत मोफत कर्करोग तपासणी शिबिर आणि मोफत कॅन्सर स्पेसिएॅलिस्ट कंसल्टेशन चा उपक्रम हाती घेतला आहे . या उपक्रमाचे उदघाटन आज करण्यात आले . डॉ. दीपेन शाह म्हणाले, आम्ही मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये लवकर निदान ,लवकर उपचार व प्रतिबंधात्मक उपाय योजना करता याव्यात यासाठी मेडीकव्हर हॉस्पिटलने संभाजीनगरच्या नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी मोफत कॅन्सर स्क्रिनिंग कॅम्प आणि मोफत कॅन्सर स्पेसिएॅलिस्ट कंसल्टेशन चा उपक्रम हाती घेतला आहे.

## ओला इलेक्ट्रिकने ८ नवीन स्कूटर्स केल्या लाँच



छत्रपती संभाजीनगर, ३ फेब्रुवारी २०२५ : भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी ओला इलेक्ट्रिकने त्यांचा रस वन जेन ३ पोर्टफोलिओ लाँच केला आहे. जेन ३ प्लॅटफॉर्मवर बनवलेल्या या प्रगत स्कूटर्सनी इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानाला पुढील स्तरावर नेले आहे. हा पोर्टफोलिओ एसवन एक्स+ २ केडब्ल्यूएच साठी ७९,९९९ रुपयांपासून सुरू होतो, जो एसवन प्रो+ ५.३ केडब्ल्यूएच साठी १,६९,९९९ रुपयांपर्यंत (प्रारंभिक किंमत) जातो.

जेन ३ पोर्टफोलिओमधील सर्वाधिक चर्चेत असलेल्या फ्लॅगशिप स्कूटर्स, एसवन प्रो+ ५.३ केडब्ल्यूएच (४६८० भारत सेल) आणि ४ केडब्ल्यूएच यांची किंमत अनुक्रमे १,६९,९९९ रुपये आणि १,५४,९९९ रुपये आहे. एसवन प्रो ४ केडब्ल्यूएच आणि ३ केडब्ल्यूएच ची किंमत अनुक्रमे १,३४,९९९ रुपये आणि १,१४,९९९ रुपये आहे. एसवन एक्स श्रेणीतील २ केडब्ल्यूएच, ३ केडब्ल्यूएच आणि २ केडब्ल्यूएच प्रकारांची किंमत अनुक्रमे ७९,९९९ रुपये, ८९,९९९ रुपये आणि ९९,९९९ रुपये आहे. एसवन एक्स+ ४ केडब्ल्यूएच ची किंमत १,०७,९९९ रुपये आहे. याशिवाय, कंपनीच्या जेन २ स्कूटर्सवर ३५,००० रुपयांपर्यंतची सूट मिळत राहील, ज्यामध्ये एसवन प्रो, एसवन एक्स (२ केडब्ल्यूएच,३ केडब्ल्यूएच आणि ४ केडब्ल्यूएच) यांचा समावेश आहे ज्यांची किंमत १,१४,९९९ रुपये; ६९,९९९ रुपये; ७९,९९९ रुपये आणि अनुक्रमे ८९,९९९ रुपये.

## नगर परिषद, हदगाव जि. नांदेड
## प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०

नगरपरिषद हदगाव हद्दीमधील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नवीन घरकुल मंजूरी करीता वेब पोर्टल

**(https://pmaymis.gov.in/PMYMIS2 2024/PmayDefault.aspx)**

**वर इच्छुक लाभार्थी यांनी ऑनलाइन नोंदणी करावी.**

पात्रताः -

१. भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटुंबातील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे

२. लाभयार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

३. वार्षिक उत्पन्न मर्यादा ३.०० लक्ष रुपये कमाल राहील.

**नवीन घरकुल नोंदनी ऑनलाइन करण्याकरिता आवश्यक कागदपत्रे :-**

१. अर्जदाराचे आधारकार्ड (मोबाइल नंबर लिंक असलेले)

२. चालू वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र (तहसीलदार यांचे)

३. जात प्रमाणपत्र (SC, ST, OBC) करीता

४. बँकेचे पासबूक (आधार कार्ड लिंक असलेले)

५. जमिनीचे पुरावे (सातबारा, आखिव पत्रिका, सिटी सर्वे उतारा ई.)

६. अर्जदार यांचे आई व वडीलांचे आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र)

७. अर्जदार यांचे कुटुंबामधील सर्व सदस्यांचे आधारकार्ड (पती-पत्नी व मुले)

८. नगरपरिषद हदगाव चे मालमत्ता कर व नमुना न.४७ चा उतारा प्रत.

**संपूर्ण कागदपत्राचा मूळ प्रति सह ऑनलाइन नोंदणी करून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० योजनेमध्ये लाभ घेण्याकरिता आव्हान करण्यात येत आहे.**

**(टीपः- ऑनलाईन अर्ज केल्यांनतर कागदपत्रे नगरपरिषद हदगाव येथे जमा करावी)**

**याबाबत अधिक महितीकरिता प्रधानमंत्री आवास योजना कक्ष श्री प्रसाद कदम स्थापत्य अभियंता PMAY यांचाशी संपर्क साधावा.**

**(गौरव वांडेकर)**
**मुख्याधिकारी नगरपरिषद**
**हदगाव**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

नि. दि दावाक्र २३७/२०२५

वादी : १) शोभाबाई सर्जेराव पाटील (खेरनार) वय ६५ वर्षे धंदा शेती. २) किशोर सर्जेराव खैरनार (पाटील) वय ३५ वर्षे धंदा शेती, ३) वाल्मीक सर्जे राव खैरनार (पाटील) वयः ३० वर्षे धंदा शेती, ४) राहुल सर्जेराव पाटील (खैरनार) वय २९ वर्षे धदाः शेती. सर्व रा. बनोटी ता सोयगांव जि. औरंगाबाद

// विरुध्द //

प्रतीवादी : १) सर्जेराव भीकन पाटील (खैरनार) वयः ७० वर्षे धंदाः निल रा. मुळ रहीवासी बनोटी ता सोयगाव जि. औरंगाबाद

दावा- प्रतीवादी मयत जाहीर होवुन वादी हे प्रतीवादीचे वारस असल्याचे जाहीर होवुन मिळणे बाबत.

१/- असे की. प्रतीवादी हा वादी नं. ०१ चा पती असुन वादी नं. ०२ ते ०४ चे वडील आहे. प्रतीवादी व वादी नं. ०१ मध्ये दिनांक- ०७/०२/२०१६ ला रात्री ७:०० ते ७:३० च्या दरम्यान वाद झाला होता. प्रतीवादी हा दिनांक: ०८/०२/२०१६ ला सकाळी संडासला जावुन येतो म्हणुन घराबाहेर निघुन गेले. प्रतीवादी मिळुन न आल्यामुळे वादी नं. ०२ ने दिनांक: १५/०२/२०१६ ला पोलीस स्टेशन सोयगांव येथे प्रतीवादी बेपत्ता झाल्याबाबत तकार दिल्यावरुन पोलीस स्टेशन सोयगाव यानी मिसिंग न ०३/२०१६ प्रमाणे दाखल करुन पो. ह. २६६ यांच्याकडे मिसिंग नं ०३/२०१६ चौकशी कामी देण्यात आले होते.

२/- असे की, वादी व प्रतीवादी यांची मौजे बनोटी ता. सोयगाव जि. औरंगाबाद शिवेतील गट नं. १२७ क्षेत्रफळ ०१ हे ७२ आर ही शेत जमीन प्रतीवादी यांच्या नावे आहे. तसेच ग्रा. पं. कार्यालय बनोटी ता. सोयगांव जि. औरंगाबाद हद्दीतील घर जागा मिळकत न. ६७६ क्षेत्रफळ २६ ÷ ४२ चौरस फुट चा नमुना नं. ०८ चा उतारा प्रतीवादीच्या नावे आहे वादी नं. ०१ ते ०४ हे प्रतीवादीला एकमेव वारसदार आहेत म्हणून वादी हे दिनांक: १५/१२/२०२४ ला संबंधी तलाठी सजा बनोटी ता. सोयगांव जि. औरंगाबाद व ग्रा. पं. बनोटी ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्याकडे गेले असता संबंधीत तलाठी व ग्रामसेवक यांनी न्यायालयाच्या आदेशाची मागणी केली. म्हणुन वादी यांनी मा. न्यायालय साहेब, सोयगाव यांच्याकडे ॲड. आर. एस. महाजन साहेब याच्या मार्फत प्रतीवादी मयत जाहीर होवुन वादी हेच प्रतीवादीचे वारस असल्याचे जाहीर होवुन मिळणे बाबत दावा दाखल केला आहे. (पुढील दिनांक:- ०६/०२/२०२५).

प्रतीवादी हा दिनांकः ०८/०२/२०१६ पासुन बेपत्ता आहे. तरी कोणालाही प्रतीवादीचा कुठलाही पत्ता आढळुन आल्यास सदर जाहीर प्रकटन पासुन ३० दिवसाच्या आत स्वःता किंवा लेखी स्वरुवात आपला आक्षेप मा. दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव येथे नोंदवावा अन्यथा कोणाताही आक्षेप नाही असे समजुन योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबधीतानी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २९/१/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.६०४/२०२४

अर्जदार : १) मच्छिंद्र रावजी माळी, वय ६९ वर्षे, धंदा मजुरी रा. तांदुळवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रामनाथ रावजी माळी वय ५६ वर्षे, धंदा मजुरी, रा. कोडापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) शोभा भ्र. खंडु माळी, वय ५२ वर्षे, धंदा. घरकाम रा. मस्जिद जवळ सिल्लेखाना, छत्रपती संभाजीनगर ४) सुनिता भ्र. लक्ष्मण माळी, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. कोडापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) अरुण गोरखनाथ माळी वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. टि.व्ही. सेंटर रोड मयुर नगर, हडको एन-११छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.ए. पारधे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, रावजी सोनाजी माळी हे मौजे कोडापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक १५/१०/२०१३ रोजी मौजे कोडापुर ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे, मयता रावजी सोनाजी माळी यांना पाच मुले १) लक्ष्मण रावजी माळी, २) खंडु रावजी माळी, ३) गोरखनाथ रावजी माळी, अर्जदार क्र.१ मच्छिंद्र रावजी माळी व अर्जदार क्र.२ रामनाथ रावजी माळी असे होते त्यापैकी लक्ष्मण रावजी माळी हे दिनांक २८/०४/२०१९ रोजी मयत झाले त्यांना अर्जदार क्र.४ सुनिता लक्ष्मण माळी ही वारस आहे व खंडु रावजी माळी हे दिनांक ०४/११/२०१५ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र.३ शोभा खंडु माळी ही वारस आहे. तसेच गोरखनाथ रावजी माळी हे दिनांक १९/११/२०१० रोजी मयत झाले असुन मयत गोरखनाथ यांची पत्नी शकुंतला गोरखनाथ माळी ह्या दिनांक ०८/०९/२०२१ रोजी मयत झालेल्या असुन मत गोरखनाथ व मयत शकुंतला यांना अर्जदार क्र.५ अरुण गोरखनाथ माळी हा मुलगा वारसदार आहे. येणे मयत रावजी सोनाजी माळी यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/०२/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

पु. ता. १७/०३/२५

कि.दि.अर्ज क्र.८२/२०२५

अर्जदार : १) दिगंबर सुरेश जाधव, वय २६ वर्षे, धंदा मजुरी रा गडी मारोती मंदिराजवळ, भोसले गल्ली गंगापुर ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) सौ. संध्या मंगेश हिरे, वय ३० वर्षे धंदा घरकाम रा ज्वाडी रोड, निमगाव ता. मालेगाव जि. नाशिक ३) माधुरी पि. सुरेश जाधव विवाहानंतर सौ. माधुरी विशाल दंडवते, वय २९ वर्षे धंदा घरकामरा. उपासनी नगर कॉलनी, साकुरी ता राहता जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.


उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.बी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन ते वरील नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे अनिता सुरेश जाधव ह्या मौजे गंगापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक ०६/०७/२०२३ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे व तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील नामे सुरेश राधाकिसन जाधव हे दिनांक ३०/०१/२००२ रोजी मयत झालेले आहे. मयत अनिता सुरेश जाधव यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३१) **हिंदू कोण?**

**संघ परिवारातील भारतीय मजदूर संघाचे संस्थापक माननीय दत्तोपंतजी ठेंगडी यांची एक आठवण सांगते. इ.स. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतरची गोष्ट आहे. तेव्हा बंगालचे राज्यपाल होते श्री. त्रिभुवन नारायण. त्याआधी ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होते. ते वैयक्तिक रितीने पंतप्रधान नेहरूजींचे मित्र होते. त्यांच्या घरी विजयादशमीच्या आधी नवरात्र पूजा होत असे. त्यावेळी ते शतचंडीचा पाठ करायचे. त्यात या देवी सर्वभूतेषु क्षुधा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः हा श्लोक आहे. याविषयी त्यांनी नेहरूजीं समवेत चर्चा केली. आणि धर्म हा शब्द जरी उच्चारला तरी नेहरूंचा विरोध असायचा. तो त्यांचा विरोध मावळला व त्यांच्या विचारात परिवर्तन आले. आणि नंतर ते म्हणू लागले आम्ही भौतिक प्रगती, कृषी प्रगती करत असताना आपल्या मनाची सतर्कता वाढवणे देशहितासाठी आवश्यक आहे. व ही मनाची सतर्कता, मनातील देशप्रेम जप िंहश लरीळी`ष उक्र-ठच- यामुळेच शक्य आहे. अशा अर्थाची प्रस्तावना श्री. नारायण यांच्या पुस्तकात पंडित नेहरूंनी लिहिली. ती प्रसिद्ध झाली नेहरूंच्या मृत्यूपूर्वी २४ तास आधी. थोडक्यात त्याग; तपस्या, निष्ठा आणि प्रतिबद्धता असल्याशिवाय भौतिक किंवा ऐहिक प्रगती शक्य नसते. हाच विचार हिंदू धर्म शिकवतो व हा विचार मानणारे सारे हिंदूच असतात. ज्यांच्यामुळे हिंदुराष्ट्र बनते. (अशीच एक आठवण उद्याच्या अलक मध्ये क्रमशः**

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ५९/२०२५.

अर्जदार : १. सिंदुबाई पांडुरंग गवळे वय. ४० वर्षे, धंदा. शेती, रा. तिडका, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, २. अश्विनी दादासाहेब शिंदे, वय. २८ वर्षे, धंदा. शेती, रा. किन्ही, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

-विरुध्द-

गैरअर्जदार - कोणीही नाही.

प्रकरण - वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत पांडुरंग नामदेव गवळी हे दि. ११/०१/२०२५ रोजी मौजे. तिडका, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत पांडुरंग नामदेव गवळी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीखः ०५/०३/२०२५.

आज दि. ०४/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ६०/२०२५.

अर्जदार : १ शेख रहिम शेख चांद, वय. ३९ वर्षे, धंदा, मजुरी, २. अजिम चांदबादशाह शेख, वय. ३६ वर्षे, धंदा, मजुरी, ३. शेख नाझीम शेख चांद, वय. ३४ वर्षे, धंदा, मजुरी, सर्व रा. काळेनगर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत शाईनबी चांद शेख हे दि. ०४/०७/२०२३ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत शाईनबी चांद शेख यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- ०६/०३/२०२५.

आज दि. ०४/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९/२०२५

१/- सुलोचना जयवंत जाधव, वय ५८ वर्ष, धंदा घरकाम, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- अमोल जयवंतराव जाधव, वय ३५ वर्षे, धंदा. डॉक्टर, रा. वरीलप्रमाणे. ३/- गोपाल जयवंतराव जाधव, वय ३० वर्षे, धंदा. नोकरी, रा. वरीलप्रमाणे.

विरुध्द

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत जयवंत विनायक जाधव यांचा दि. २४/०४/२००९ रोजी मौजे सप्तश्रृंगीगड, ता. कालवण, जि. छ. नाशिक येथे मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ एकमेव है वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी मयत जयवंत विनायक जाधव यांचे वारस असुन त्यांना मयत जयवंत विनायक जाधव यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ४/२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. २४/३/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ५८/२०२५

अर्जदारः १. श्री. शांताराम सिध्दार्थ वानखेडे उर्फ श्री. शांताराम कडुबा कांबळे, वय ३५ वर्षे, धंदा मजुरी, रा. बहुखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदारः- कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत हौसाबाई कडूबा कांबळे उर्फ हौसाबाई गिरीजाजी वानखेडे हया दि. १३/११/२०१७ रोजी घोसला, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत हौसाबाई कडूबा कांबळे उर्फ हौसाबाई गिरीजाजी वानखेडे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०७/०३/२०२५०

आज दि. ०४/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## अग्रलेख...

# व्यापारयुद्धाचे रणशिंग?

पाच वर्षांपूर्वी, २०१९ मध्ये अमेरिकेच्या 'नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च' या संस्थेने 'अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि व्यापारयुद्ध' नावाचा एक अहवाल प्रसृत केला आणि संपूर्ण जगात या अहवालाची चर्चा सुरू झाली. अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापारयुद्ध पेटले तर ते अमेरिकेच्या हिताचे ठरणार नाही, असे मत अमेरिकेतील काही आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनी तयार केलेल्या या अहवालात नमूद केले. कारण २०१८ मधील व्यापारयुद्धामुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेस जवळपास ५४ हजार कोटी रुपयांचा फटका बसला होता. साहजिकच या अहवालामुळे अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्धास विराम मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आणि मंदीच्या भीतीने धास्तावलेल्या जगाने काहीसा सुटकेचा सुस्कारा सोडला. एकीकडे चीनसोबतच्या व्यापारयुद्धाची चिन्हे मावळत असतानाच, भारतासोबतच्या व्यापार धोरणात अमेरिकेकडून काही बदल घडविले जाण्याची चर्चाही सुरू झाली होती. विकसनशील देशाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावण्यासाठी त्या देशांकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर कर न लावण्याच्या अमेरिकेच्या तेव्हाच्या धोरणातून अमेरिकेने भारतास वगळल्याने भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर मिळणारी जवळपास ४० हजार कोटी रुपयांची सवलत यामुळे बंद झाली, पण चीनसोबतच्या व्यापारयुद्धाचा परिणाम म्हणून भारताची अमेरिकेतील निर्यात वाढल्याने भारताचा फायदाच झाला, असेही स्पष्ट झाले. त्या अगोदरच्या वर्षात भारताकडून चीन व अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीमध्ये मोठी वाढ झाली होती. भारतातून चीनमध्ये होणाऱ्या निर्यातीत सुमारे ३२ टक्के तर अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीत सुमारे १२ टक्के वाढ झाल्याची नोंद युनायटेड कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँण्ड डेव्हलपमेंट (यूएनसीटीएडी) ने त्यावर्षी प्रसिद्ध केलेल्या 'द ट्रेड वॉर : पेन अँण्ड गेन' नावाच्या अहवालात करण्यात आली होती. आपल्या राष्ट्राच्या अर्थनीतीस बाधा येईल असे कोणतेही व्यापारी हितसंबंध सातत्याने जपत अन्य देशांसोबतची मैत्री कायम राखण्याची अमेरिकेची नीती कधीच नव्हती. साहजिकच अमेरिकेच्या अध्यक्षपदाची नव्याने सूत्रे स्वीकारताना डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या 'राष्ट्र प्रथम' या घोषणेनुसार अमेरिकेची नवी अर्थनीती स्पष्ट होऊ लागली असून, ट्रम्प यांनी शनिवारी समाजमाध्यमांवरून केलेल्या घोषणेत या नीतीचेच प्रतिबिंब उमटले आहे.

चीन, मेक्सिको आणि कॅनडा या देशांतून होणाऱ्या आयातीवर भरमसाट आयात कर लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केल्यावर पाच वर्षांपूर्वीच्या अमेरिका-चीन यांच्यातील व्यापारयुद्धाच्या सावटामुळे जगावर दाटलेले मंदीच्या भीतीचे सावट आता पुन्हा एकदा गडद होऊ पाहात आहे. देशांतर्गत वस्तूंच्या बाजारपेठांना आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण झाल्यास या वस्तू अशा स्पर्धेत टिकाव धरू शकत नाहीत, त्यामुळे आयातीद्वारे देशात येणाऱ्या वस्तूंवर आयात कर वाढविल्यास त्यांच्या किमती वाढून देशी उत्पादने त्यांच्याशी किमतींची स्पर्धा करू शकतील व त्यांची मागणी वाढून देशांतर्गत उत्पादनांना व बाजारपेठेस चालना मिळेल, हा आयात कर वाढविण्याच्या धोरणाचा स्पष्ट अर्थ असतो. ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे होती घेतली, त्याच्या आधीपासूनच त्यांच्या या नीतीची चाहूल जागतिक अर्थविश्वाला लागलेली होती. त्यामुळे आता त्यांनी उचललेले हे पाऊल जागतिक अर्थव्यवस्थेवर कोणता परिणाम घडवू शकते, याचे वेगवेगळे आडाखे सुरू झाले आहेत. ट्रम्प यांच्या निर्णयास आव्हान देण्यासाठी मेक्सिको आणि कॅनडानेही अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवरील आयात कर वाढविण्याचा निर्णय घेऊन व्यापारयुद्धात अमेरिकेसमोर उभे राहण्याची तयारी सुरू केली आहे. असेच पाऊल चीनने उचलले तर हे व्यापारयुद्ध जागतिक पातळीवर भडकेल आणि जगातील या दोन बलाढ्य अर्थव्यवस्थांमधील संघर्षातून जागतिक अर्थव्यवस्था डळमळीत होईल, अशी भीती वर्तविली जात आहे. जेव्हा एखादा देश आपल्या देशातील उत्पादनांच्या बाजारपेठेस संरक्षण देण्याच्या हेतूने अन्य देशांकडून होणाऱ्या आयातीवरील शुल्क वाढवितो, तेव्हा ते देशदेखील आयात शुल्क वाढवितात. अशा प्रकारे व्यापारयुद्धे भडकतात आणि महागाई वाढून त्याच्या झळा जागतिक पातळीवर पोहोचतात. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळातही 'अमेरिका फर्स्ट' हेच धोरण अवलंबिले होते. नव्या सत्ताकाळातही त्यांचे हेच धोरण राहील हे त्यांच्या सत्ताग्रहणाआधीच जगाला माहीत झाले होते. भारतासोबतचे त्यांचे याबाबतचे धोरण अजून पुरेसे स्पष्ट झालेले नसले, तरी हर्ले डेव्हिडसन वादात त्यांची भूमिका उघड झालेली असल्याने ट्रम्प यांनी नव्या कार्यकाळात कॅनडा, चीनप्रमाणे भारताबाबतही असेच आयात धोरण स्वीकारले तर भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नावर त्याचा परिणाम होऊ शकतो. कारण अशा धोरणामुळे भारतात आयात होणाऱ्या वस्तूंच्या किमती भरमसाट वाढतील व त्याचा ग्राहक असलेल्या सामान्य नागरिकांच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका सोसावा लागेल.

अमेरिकेच्या नव्या व्हिसा धोरणामुळे जगातील अनेक देशांत अगोदरच चलबिचल सुरू झालेली आहे. अनधिकृतपणे देशात वास्तव्य करणाऱ्यांना अमेरिकेबाहेर पडावे लागेल हे स्पष्ट होऊ लागल्यामुळे तेथील अनेक अनधिकृत रहिवाशांनी परतीच्या वाटा शोधण्यास सुरुवातही केली आहे. देशातील सर्व संधी स्थानिक नागरिकांस मिळाव्यात व त्यातून स्थानिक जनतेच्या जीवनमानाचा आलेख अधिक उंचावावा या धोरणात गैर काहीच नाही. अवैधपणे वास्तव्य करणारे परदेशी नागरिक स्थानिक नागरिकांच्या रोजगारांच्या संधींवर डल्ला मारत असल्याने बेरोजगारीसारख्या समस्यांची तीव्रता वाढते. त्यामुळे ट्रम्प यांच्या या धोरणास अमेरिकेतून व्यापक पाठिंबा मिळेल व त्याचा राजकीय फायदा मिळून त्यांची लोकप्रियता आणखी वाढेल, हे या धोरणामागचे गणित आहे. अर्थात्, अमेरिकेतील आयात वस्तूंवर कर वाढविल्यामुळे तेथेही या वस्तू महाग होऊन सामान्यांच्या खिशाला त्याचा भार सोसावा लागणार आहे. अमेरिकेतील महागाई वाढण्याची शक्यता असून, महागाईवर नियंत्रण आणण्याच्या ट्रम्प यांच्या आश्वासनास या धोरणामुळे आव्हान मिळेल, अशीही शक्यता आहे. या धोरणाचे जागतिक परिणाम अमेरिकेतही पाहावयास मिळणार आहेत. मेक्सिको आणि कॅनडामधून अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची निर्यात होत असते. गेल्या वर्षी अमेरिकेने सुमारे ८६ अब्ज डॉलरचा कृषिमाल आयात केला होता. नव्या धोरणानंतर या आयातीकरिता अमेरिकेस अधिक पैसा मोजावा लागेल व त्याचा भार सामान्य ग्राहकांवरच पडणार असल्याने महागाईचे दुष्टचक्र जनतेवरच कोसळेल. कारण यातून कुटुंबांचा अर्थसंकल्प कोलमडणार आहे. केवळ शेतीमालच नव्हे, अमेरिकेच्या यांत्रिक वाहने आणि ऊर्जा क्षेत्रावरही या धोरणाचा परिणाम संभवतो. अमेरिकेचा वाहन उद्योग प्रामुख्याने कॅनडामधून होणाऱ्या आयातीवरच अवलंबून असून तेथून होणारी आयात महागल्यास वाहने महागतील व अमेरिकेतील बड्या वाहन उद्योगांना त्यांची झळ सोसावी लागेल. हाच फटका ऊर्जा क्षेत्रालाही सोसावा लागणार आहे. ऊर्जा निर्मिती क्षेत्रात आवश्यक असलेल्या कच्च्या तेलासाठी अमेरिका प्रामुख्याने कॅनडावरच अवलंबून आहे. आयात शुल्क महागल्यास कच्चे तेल महागेल आणि अमेरिकेची ऊर्जा सुरक्षा संकटात सापडेल, अशी भीती तेथील या क्षेत्रातील जाणकार आता व्यक्त करू लागले आहेत. त्यामुळे 'अमेरिका फर्स्ट' धोरणाचा भाग म्हणून ट्रम्प यांनी उचललेल्या या पावलांमुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल अडखळू शकते. व्यापारयुद्धाच्या या संघर्षात अमेरिकेसमोर उभे राहण्याची तयारी चीन, कॅनडाकडून सुरू आहे. चीनने तर ट्रम्प यांच्या या बेधडक नीतीला जागतिक व्यापार संघटनेत आव्हान देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत, तर कॅनडा, मेक्सिकोने अमेरिकेतून आयात होणाऱ्या वस्तूंवरील कर वाढविला आहे. या युद्धात आता ट्रम्प यांनी रणशिंग तर फुंकले आहे, पण त्याच्या झळा सोसाव्या लागतील तेव्हा माघारीचे मार्गदेखील आधीच आखून ठेवावे लागतात. धोरणे मवाळ करण्याची नीती अवलंबून पुन्हा एकदा नवा मोठेपणा पदरात घेण्याचा ट्रम्प यांचा इरादा असू शकतो. व्यापारयुद्धाच्या झळा तीव्र होऊ लागल्या की तसेही काही घडण्याची शक्यता राखून ठेवलेली असेलच!

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# वाखान कॉरिडोर : एक संवेदनशील बफर पट्टी

गेल्या काही दशकांत भारताशी सतत युद्ध करून हरणारा पाकिस्तान एका नव्या युद्धाला सामोरे जाण्याची तयारी करतो आहे, असे वृत्त आहे. पाकिस्तान आजवर भारताच्या विरोधात दहशतवादी उभे करीत आला आहे. हे करीत असताना तो कंगाल झाला, पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही. हे दहशतवादी आता त्याच्यावरच उलटले आहेत. अमेरिकेलाही यांना आवरणे शक्य झाले नाही. त्यांना म्हणजे अफगाणी पख्तूनांना संपविण्यासाठी पाकिस्तान युद्ध पुकारण्याचा विचार करतो आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सीमेवर सातत्याने अफगाणिस्तानचे दहशतवादी हल्ले करीत आहेत. जे पाकिस्तानने भारतासोबत केले तेच आता त्यांच्यासोबत होऊ लागले आहे. अफगाणिस्तानचे दहशतवादी एका मागोमाग एक हल्ले करून पाकिस्तानला बेजार करीत आहेत. अफगाणी (पख्तून) घुसखोर पाकिस्तानमधील पख्तूनबहुल भागात घुसखोरीही करतात, असा पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर आरोप आहे. यामुळे पाकिस्तानला आता या तालिबानी दहशतवाद्यांशी युद्ध करावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच पाकिस्तानने अमेरिका-अफगाणिस्तान सोडून जात असताना याच तालिबान्यांना आश्रय दिला होता, त्यांना प्रशिक्षण दिले होते, त्यांना पुन्हा अफगाणिस्तानमध्ये पाठविले होते. अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यानंतर आता हेच दहशतवादी पुन्हा पाकिस्तान सीमेवर आले आहेत. त्यांचा पाकिस्तानवर आरोप आहे की, काही अफगाण प्रदेश पाकिस्तानने बळकावला आहे, तो परत मिळावा म्हणून तालिबान्यांची धडपड चालू आहे.

निर्मितीपासूनच पाकिस्तान भारताबरोबर कुरापती काढत आला आहे. भारताविरोधात दहशतवादाला पोसण्यातच पाकच्या कूटनीतिज्ञांचा वेळ खर्च होत आला आहे. पण हे तालिबानी दहशतवादी आता खुद्द पाकिस्तानलाच बेजार करू लागल्यामुळे त्यांना संपविण्यासाठीच युद्ध पुकारण्याची वेळ पाकिस्तानवर आली आहे. यामुळे पाकिस्तानला आता या तालिबानशीच दोन हात करावे लागणार, अशी स्थिती निर्माण होते आहे. तालिबानी दहशतवाद्यांविरोधी करावयाच्या कारवाईची सुरुवात म्हणून पाकिस्तानने वाखान कॉरिडोर ही चिंचोळी पट्टी ताब्यात घेण्याच्या विचारात आहे. कॉरिडोर ही पट्टी ब्रिटिश मुत्सद्दी ड्युरॅण्ड यांनी रशियन वर्चस्वाखालील प्रदेश आणि ब्रिटिश साम्राज्यातील प्रदेश यांच्या सीमा एकमेकींना स्पर्श करू नयेत, म्हणून निर्माण केलेली कृत्रिम चिंचोळी बफर पट्टी आहे. दोन महासत्तांमध्ये असा चिंचोळा भाग असल्यास त्या दोन महासत्तांत संघर्षाचे प्रसंग आणि मुद्दे निर्माण होत नाहीत. आज हा भूभाग अफगाणिस्तानचा हिस्सा आहे. तो आज ताजिकिस्तान आणि पाकिस्तान यांना वेगळा करतो आहे. बफर स्टेटमध्ये दोन्ही महासत्तांच्या सेना असत नाहीत. त्यामुळे दोन महाशक्तींचा परस्पर संपर्कच होत नाही. काही वादाचे मुद्दे निर्माण झाले तर चर्चा करून त्यांचा निपटारा करणे शक्य होते आणि बहुधा त्या दोन देशांत युद्धासारखी परिस्थिती निर्माण होत नाही.

वाखान कॉरिडोर ही जमिनीची चिंचोळी पट्टी मानव निर्मित आहे. हा चिंचोळा भूभाग अफगाणिस्तानच्या बादखशान प्रांताचा हिस्सा आहे. हिच्या एका बाजूला आज जो ताजिकिस्तान देश आहे, तो भूभाग एकेकाळी सोव्हिएत रशियाचा भाग होता. पट्टीच्या दुसऱ्या बाजूला आज पाकिस्तानचा खैबर पख्तूनख्वा आणि गिलगिट-बाल्टिस्तान प्रांत आहे. हा संपूर्ण भाग आज जरी व्याप्त असला, तरी एकेकाळी हा भूभाग ब्रिटिशांच्या होता. यातील गिलगिट-बाल्टिस्तान हा प्रदेश काश्मीरचा भाग असून आज तो व्याप्त काश्मीरमध्ये येतो. ही पट्टी समुद्रसपाटीपासून ४९२३ मीटर उंच आहे.

क्षाखान हा भूभाग आज पाकिस्तानमध्ये अचानक चर्चेत आला आहे. हा चिंचोळा भूभाग अफगाणिस्तानच्या नकाशात शेपटीसारखा उठून दिसतो. ती ३५० किलोमीटर लांब आणि ३४ किलोमीटर रुंद आहे. आजची भूराजकीय स्थिती सांगायची तर या पट्टीच्या उत्तरेला ताजिकिस्तान, दक्षिणेला पाकिस्तान (ज्यात व्याप्त काश्मीर आहे) आणि दूर पूर्वेला चीन आहे. हे सर्व भौगोलिक विशेष असलेली ही पट्टी आज जगातला एक संघर्ष बिंदू म्हणून पुढे येते आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यातील तणावयुक्त भूभाग म्हणून वाखान पट्टीकडे भारत पाहू शकत नाही. कारण पट्टी व्याप्त काश्मीरला लागून आहे. त्यामुळे हा मुद्दा भारतासाठीही महत्त्वाचा ठरतो. आज भारताचे ताजिकिस्तानशी सामरिक, सामंजस्याचे आणि घनिष्ठ संबंध आहेत. १९९५ ते २०१६ या काळात ताजिकिस्तानचे अध्यक्ष एमोमाली यांनी सहा वेळा भारताला भेट दिली आहे. अफगाणिस्तानमध्ये सत्ताबदल झाल्यानंतर तालिबानी राजवटीशीही भारताचे स्नेहाचे संबंध निर्माण होत आहेत. याबाबत पुढाकार तालिबानी राजवटीने घेतला आहे, हे विशेष.

ब्रिटिश मुत्सद्दी ड्युरॅण्ड यांच्या प्रयत्नातून आखल्या गेलेल्या ड्युरॅण्ड रेषेला अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधली सीमा म्हणून ओळखले जाते. ही २,६४० किलोमीटर (१,६४० मैल) लांब आहे. हिचे पश्चिम टोक इराणच्या सीमेपर्यंत आणि पूर्वेकडील टोक चीनच्या सीमेपर्यंत जाते. आज निर्माण झालेली समस्या अफगाणिस्तानच्या ईशान्य आणि दक्षिणेकडील प्रांतांमधून खैबर पख्तूनख्वा, बलुचिस्तान आणि उत्तर आणि पश्चिम पाकिस्तानच्या गिलगिट-बाल्टिस्तानच्या (व्याप्त काश्मीर) प्रदेशाचे सीमांकन न होणे यामुळे आहे. ड्युरॅण्ड लाईनशी ही समस्या संबंधित नाही. वाखान कॉरिडोर हा त्या प्रदेशातील संभाव्य संघर्ष बिंदू म्हणून समोर येतो आहे. मुख्य म्हणजे ही भारताची चिंता वाढविणारी बाब ठरते आहे. अफगाणिस्तानमधील तालिबानी राजवट भारताशी चांगले संबंध प्रस्थापित करण्यास उत्सुक आहे. भारत आणि चीन यांच्यातील आजचे संबंध पाहता वाखान पट्टी आहे तशीच राहणे महत्त्वाचे आहे. पाकिस्तानने तिरिमिरीत येऊन ही पट्टी नष्ट केली तर नव्याने सीमांकन होईल. महासत्तांच्या सीमा नव्याने एकमेकींना भिडतील. पाकिस्तान मध्य आशियाशी जोडले गेले तर ते पाकिस्तानला हवे आहे, पण ही बाब भारतासाठी सोयीची नाही. त्यामुळे या क्षेत्रात संघर्ष उभा झाला तर भारत बघ्याची भूमिका घेऊ शकणार नाही.

पाकिस्तानच्या वृत्तसृष्टीत सध्या हा विषय चविष्टपणे हाताळला जातो आहे. ताजिकिस्तान आणि पाकिस्तानमध्ये आडवी असलेली अफगाणिस्तानची ही शेपटीसदृश पट्टी नष्ट करावी आणि तिचे रूपांतर एका नवीन व्यापारी मार्गात करावे, असा विषय आग्रहाने पुढे आणला जातो आहे. असे झाल्यास अफगाणिस्तानचा चीनशी आज असलेला संबंधच संपेल. अशाप्रकारे मध्य आशियाला जोडणारा नवीन व्यापारी मार्ग तयार झाला तर पाकिस्तानची आर्थिक दुरवस्था दूर होईल, असा विश्वास पाक वृत्तसृष्टीत व्यक्त केला जातो आहे. भारताने ताजिकिस्तानमध्ये बऱ्यापैकी गुंतवणूक केली आहे. या दोन देशांत उभयपक्षी उपयोगी पडावेत असे सामरिक हितसंबंधही निर्माण झाले आहेत. पाकिस्तानने वाखान कॉरिडोर नष्ट करण्याचे दु:साहस केले तर भारत बघ्याची भूमिका घेऊ शकणार नाही.


९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# घटनेचा आत्मा समान नागरी कायदा

भारत हा जगामधील एक उदार आणि धर्मनिरपेक्ष देश म्हणून ओळखला जातो. देशामध्ये जर खरी धर्मनिरपेक्षता टिकवून एकतेच्या दिशेने वाटचाल करायची असेल तर त्यासाठी देशात समान नागरी कायदा अमलात आणण्याची नितांत आवश्यकता असल्याचे अनेकांचे मत आहे. विविधतेने नटलेल्या या देशामध्ये सर्वांसाठी कायद्याचे एक समान सूत्र असावे हा मूळ उद्देशच समान नागरी कायद्यामध्ये समाविष्ट आहे. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये ही बाब स्पष्टपणे नमूद असतानाही देशावर सर्वाधिक राज्य करणाऱ्या काँग्रेसला हा कायदा करण्याची सुबुद्धी सुचली नाही, हे देशाचे दुर्दैव. सत्तेसाठी विशिष्ट समाजाचे लांगूलचालन अन् हिंदूंचा विखारी द्वेष करणे यातच काँग्रेस पक्षाने आपले उभे आयुष्य खर्ची घातले. अजूनही तीच री ओढण्यात काँग्रेस पक्ष धन्यता मानत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस म्हणजेच संपूर्ण देश अन् देश म्हणजेच काँग्रेस हे समीकरण पक्के ठरले होते. त्यामध्ये सामान्य जनतेच्या मताला काडीचीही किंमत नव्हती. त्यामुळे या देशाच्या वाट्याला जो भोग आला; तो भोग देशाने म्हणजेच पर्यायाने जनतेने भोगला. काँग्रेसचा स्वार्थीपणा आणि दुटप्पी धोरणामुळे या देशाचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले. काँग्रेसचा हा ढोंगीपणा ओळखण्यात जनतेलाही सहा दशके लागली. राष्ट्र म्हणजे निव्वळ जमिनीचा एक तुकडा मानणाऱ्या काँग्रेसच्या काळामध्ये भोगवादही चरमसीमेवर पोहोचला होता. या देशावर राज्य करण्याची फक्त आमचीच लायकी या अहंपणाने काँग्रेस पक्ष पछाडल्याने त्या पक्षाची गतही भरकटलेल्या जहाजासारखी झाली आहे. परंतु, सन २०१४ पासून बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे देशामध्ये समान नागरी कायदा लागू होण्याची शक्यता बळावली आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने १९८५, १९९५ आणि २००३ मध्ये वेगवेगळ्या प्रकरणांमधील निवाड्यामध्ये देशामध्ये समान नागरी कायदा अमलात आणावा, असा निर्देश भारत सरकारला दिला आहे. भारतीय राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक अभिसरणासाठी अशा कायद्याची नितांत गरज असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त सर्व निवाड्यांमधून स्पष्ट होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक सुधारणा व समानतेची चळवळ सुरू होती. भारतीय राज्य घटनेमध्ये धर्म, जात, पंथ, भाषा व लिंग या सर्वांना छेद देऊन समान नागरिकत्व सर्वांना बहाल केले आहे. कायद्याचे राज्य हे भारतीय लोकशाहीचे अधिष्ठान आहे. देशामधील सर्व नागरिक धर्म किंवा रूढी-परंपरेने नव्हे, तर समान कायद्याने बांधलेले आहेत. त्यामुळे सर्वांना एकच कायदा ही संकल्पना आणि याच संकल्पनेतून समान नागरी कायद्याची संकल्पना उदयास येते. भारतीय घटनेतील कलम १४ प्रमाणे सर्व नागरिक कायद्यासमोर समान आहेत. तसेच घटनेमधील कलम १५ नुसार शासनाद्वारे कोणत्याही नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात व लिंग याद्वारे भेद करता येणार नाही. घटनेमधील कलम २५ द्वारे प्रत्येकास जरी धर्मस्वातंत्र्य असले, तरी या धर्मस्वातंत्र्याच्या आधारे काही भूमिका घटनेमधील कलम १४ व १५ मधील तरतुदी कलम २५ मधील तरतुदींना छेद देऊ शकतात. त्यावेळी कलम १४ आणि १५ प्रभावी ठरतील, असे सर्वोच्च न्यायालयाचा निकाल सांगतो. त्यामुळे समान नागरी कायद्याला धर्माच्या व धार्मिक रूढीच्या आधारे विरोध करता येऊ शकत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समान नागरी कायद्याच्या गरजेवर भर दिल्यानंतर अनेक राज्यांनी विशेषतः भाजपाशासित राज्यांनी समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीने समित्या स्थापन करणे, मसुदे तयार करणे व जनतेकडून सूचना मागविणे अशा विविध प्रक्रिया सुरू केल्या आहेत. या प्रयत्नामध्ये उत्तराखंड हे राज्य खऱ्या अर्थाने समान नागरी कायदा लागू करणारे पहिले राज्य ठरले आहे. उत्तराखंड सरकारने या कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशीनुसार हा कायदा लागू केला आहे. या नव्या समान नागरी कायद्यामुळे राज्यातील सर्व नागरिकांची विवाह नोंदणी, घटस्फोट, वारसा हक्क, लिव्ह इन रिलेशनशिप यासारख्या नोंदणीविषयक बाबीमध्ये अनेक बदल केले जाणार आहेत. आपल्या सवयीप्रमाणे काँग्रेसने तेथेही या कायद्यास असंवैधानिक म्हणत सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयानेच या आधी अनेक वेळा समान नागरी कायदा लागू करण्यावर भर दिला असल्यामुळे काँग्रेसच्या या सर्व प्रयत्नावर पाणी फेरले गेले.



९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कृत्रिम बुद्धिमत्ता : उपयोग आणि आवश्यकता

गेल्या वर्षाअखेर म्हणजेच २ ते ४ डिसेंबर २०२४ दरम्यान बेलग्रेड येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आयोजित करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा वैचारिक परिषदेचे आयोजन केल्याने 'कृत्रिम बुद्धिमत्ता : उपयोग आणि त्याची व्यावसायिक आवश्यकता' या विषयावर व्यापक चर्चा झाली. याचाच पाठपुरावा म्हणून केंद्र सरकारच्या तंत्रज्ञान व उच्च-शिक्षण विभागातर्फे २०२५ वर्ष हे 'कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष' म्हणून पाळण्याचा व त्यानिमित्ताने विविध कार्यक्रम-उपक्रमांचे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण व धोरणात्मक निर्णय घेतल्याने या विषयाचे महत्त्व नव्या संदर्भात अधोरेखित झाले आहे.

याचाच एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून केंद्र सरकारच्या वाणिज्य उद्योग व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे 'कृत्रिम बुद्धिमत्ता-सर्वांसाठी' नावाचे अभिनव अभियान हाती घेण्यात आले आहे. यामध्ये केवळ उद्योग-व्यापार व व्यवसाय यांच्याशीच नव्हे, तर समाजातील सर्व क्षेत्रांना समाविष्ट करून घेतले जाणार आहे हे विशेष. यामध्ये मेट्रो-महानगरांपासून शहर-गाव व ग्रामीण क्षेत्राचा अंतर्भाव केला जाणार आहे. त्यामुळेच भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता प्रसार-प्रचार व उपयोग करताना आरोग्य व वैद्यक सेवा, कृषी व संबंधित क्षेत्र, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने विशेषतः ग्रामीण क्षेत्रात प्रभावी संवाद-संपर्क निर्माण करणे व वैद्यकीय सेवांसह विविध साधनांना बळकटी देणे इ. शक्य होणार आहे.

यासंदर्भात कृत्रिम बुद्धिमत्तेशी निगडित व नुकताच साध्य झालेला उपक्रम म्हणून 'किसान-ई-मित्र' याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. यामध्ये विविध भौगोलिक क्षेत्रातील व विविध प्रकारे आणि विविध प्रकारची शेती व फलोत्पादन, भाजीपाला लागवड विविध प्रकारचे वातावरण, शेतजमीन व पर्जन्यमानासह करणाऱ्या शेतकऱ्यांना थेट व संवादासह सल्ला-मार्गदर्शन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे हे विशेष. मुख्य म्हणजे असा थेट सल्ला मिळण्यासाठी पुरेसे ठरणार असल्याने त्याच्या वापरामध्ये संबंधित शेतकऱ्याला सुलभता लाभणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे इच्छित व अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे जी विशेष उपाययोजना केली आहे त्यामधील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे-

**कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी क्षमता विकास** : उपाययोजना : कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक स्वरूपात वापर करण्यासाठी आवश्यक ते मूलभूत सुविधा तंत्रज्ञान व कौशल्य उपलब्ध करून त्याद्वारा क्षमता विकास साधणे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेला कल्पकतेची जोड** : कृत्रिम बुद्धिमत्तेला भारतीय व देशी शिक्षण-संशोधनाची जोड देण्यासाठी कल्पकतापूर्ण विकास केंद्रांची स्थापना करणे.

**माहिती संचय संग्रहाचा प्रगत वापर** : संगणकीय पद्धती व माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे प्रगत कार्यपद्धतीचा विकास व वापर करणे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेची विकासाशी सांगड घालणे** : भारताची सध्याची विकसनशील स्थिती व नजीकच्या काळातील विकासाचा वेग याचा अद्ययावत ताळमेळ घालणे.

**कौशल्य विकासात वाढ साधणे** : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने त्या नव्या व प्रगतिशील कौशल्य विकासाला गतिमान करणे.

**नवागतांना वित्तीय साहाय्य** : कृत्रिम बुद्धिमत्ता हे मुळातच नवे क्षेत्र असल्याने त्यामध्ये नव्याने प्रवेश करून काम करणाऱ्यांना 'स्टार्ट अप'च्या स्तरावर वित्तीय साहाय्य उपलब्ध करून देणे.

**सुरक्षित व विश्वासार्ह बनविणे** : प्रगत माहिती तंत्रज्ञान व संगणकीय पद्धती यांना संशोधनाची जोड देऊन कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला भारतात सुरक्षित व सर्वांसाठी विश्वासार्ह असे साधन बनविणे.

केंद्र सरकारच्या वरील प्रकारच्या विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयांचे परिणाम योजनाकारांच्या मते पुढीलप्रमाणे अपेक्षित आहेत.**आर्थिक क्षेत्रातील लवचीक स्वायत्तता** : कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा व्यापार-व्यवसाय पद्धती अधिक गतिमान होऊन त्याचा परिणाम उद्योग-व्यवसायाच्या आर्थिक प्रगतीच्या संदर्भात अधिक सकारात्मक व पूरक स्वरूपात होऊ शकतो. .

**कौशल्य विकासातून कर्मचारी व कामाचा विकास** : नव्याने विकसित होणारे क्षेत्र म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याच्याशी निगडित क्षेत्रांमध्ये कौशल्य विकासाला मोठा वाव राहणार आहे. सध्या उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक आकडेवारीनुसार सुमारे ३.३ लाख जणांना या क्षेत्राशी निगडित कौशल्य विकासाचा लाभ झाला आहे.

सरकारचे धोरणात्मक निर्णय व त्याला उद्योग-व्यवसायांची सकारात्मक साथ यामुळे भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याच्याशी निगडित क्षेत्रात आघाडी घेतली आहे. याचा पण आर्थिक व व्यावसायिक लाभ भारत आणि भारतीयांना होणार आहे. ग्रॅनफोर्डच्या २०२४ च्या अहवालात तर भारताला कृत्रिम बुद्धिमत्तेचे मुख्य केंद्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**आरोग्य सेवेमध्ये विशेष सुधारणा** : कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा भारतातील वैद्यक क्षेत्र व रुग्णसेवा क्षेत्रात लक्षणीय सुधारणा घडवून आणल्या जात आहेत. कोरोना काळाच्या पृष्ठभूमीवर आरोग्य सेवा क्षेत्रात घडून येणारे हे परिवर्तन मोठ्या अर्थाने लक्षणीय व परिणामकारक ठरणार आहे. देशांतर्गत आरोग्य क्षेत्रात प्रगत स्वरूपात व परिणामकारक बदल करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य संस्था व इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा विशेष प्रकल्प आणि प्रयत्न साकारला जात आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण क्षेत्र** : सरकारचे नवे शैक्षणिक धोरण व त्याच्या अंमलबजावणीला कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगाची परिणामकारक साथ मिळाली आहे. याचे दृश्य व सर्वात प्रमुख उदाहरण म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीद्वारा सोपा व दृक्-श्राव्य स्वरूपातील कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक विशेष अभ्यासक्रमांचा उल्लेख करावा लागेल. यातूनच कर्नाटकमध्ये 'शिक्षा-पायलट' या अभिनव योजनेची सुरुवात होणे याचे श्रेय कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याच्याशी संबंधित प्रयत्नांना जाते.

**कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कृषी व ग्रामीण विकास** : भारत आणि भारताच्या आर्थिक-सामाजिक संदर्भात महत्त्वाच्या अशा कृषी व ग्राम विकास क्षेत्राला आता पूर्वापार प्रयत्नांच्या जोडीलाच कृत्रिम बुद्धिमत्तेची आता व परिणामकारक साथ लाभली.

**कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा परिणामकारक प्रशासन** : बदलता काळ, बदलत्या अपेक्षा व जनमानस यांचा योग्य ताळमेळ साधून परिणामकारक प्रशासन व्यवस्था साकारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर परिणामकारक ठरला आहे. यामुळे शासन-प्रशासन व्यवस्था अधिकाधिक परिणामकारक होत आहे हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. थोडक्यात कृत्रिम बुद्धिमत्ता हे नवे क्षेत्र विकसित व अधिकाधिक प्रचलित-प्रचारित होत असल्याने त्याचे दृश्य व फायदेशीर परिणाम आता निश्चितपणे दिसू लागले आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### कश्मीर तो होगा पर पाकिस्तान नहीं होगा...

प्रखर देशभक्त विद्यार्थी संघटना अभाविपने नुकतीच श्रीनगरच्या लाल चौकात भव्य तिरंगा रॅली काढली आणि पुन्हा एकदा संपूर्ण जगास संदेश दिला की, काश्मीर हा अखंड भारताचा अविभाज्य भाग आहे. याच लाल चौकात काही वर्षांपूर्वी तिरंगा फडकवणे शक्य नव्हते. प्रखर राष्ट्रभक्त असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कलम ३७० निष्प्रभ केले आणि परिवर्तनाची सुरुवात झाली. भयमुक्त काश्मिरात भारताचा तिरंगा डौलाने फडकू लागला. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत आत्मविश्वासाने सांगितले की, व्याप्त काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच आज तो दिवस दूर नाही ज्या दिवशी व्याप्त काश्मीरही भारताच्या ताब्यात असेल. अभाविपच्या या तिरंगा रॅलीने महाविद्यालयीन जीवनातील त्या आठवणी पुन्हा एकदा जाग्या झाल्या. विद्यार्थिवर्गात राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतवणाऱ्या त्या ओळी आजही आठवतात..

धारा हर मोड बदलकर लाहोर से गुजरेगी गंगा
इस्लामाबाद की छाती पर लहरेगा भारत का झंडा
पिंडी और कराची तक सबकुछ गारद हो जाएगा
सिंधु नदी के आरपार पूरा भारत हो जाएगा
सदियों सदियों तक फिर जिन्ना जैसा शैतान नहीं होगा
कश्मीर तो होगा पर पाकिस्तान नहीं होगा...

**अखिल देशपांडे**/अकोला

●● ●●

### रस्ते, पदपथाला पार्किंगचा विळखा



संपूर्ण नागपुरातच वाहतुकीची समस्या निर्माण झालेली आहे. नागपुरातील लोकप्रतिनिधी, व्यापारी व मनपाचे अधिकारी यांच्यात याबाबतीत अनेकदा चर्चा झाली. मात्र मार्ग निघालेला नाही. परदेशात पार्किंग समस्येवर विविध पर्याय आहेत. नेदरलॅण्ड्स ॲमस्टरडॅम येथील शाळेत व कॉलेजमध्ये जाणारी मुले सायकलने जाणे-येणे करतात. अमेरिकेत लोकसंख्येच्या मानाने जमिनीचे क्षेत्रफळ जास्त असल्यामुळे तेथे पार्किंगची फारशी समस्या येत नाही. १ ते २ किलोमीटर अंतरावरील ठिकाणी शक्यतो पायी चालत जावे. एकाच ठिकाणी कार्यक्रमाला जायचे असल्यास प्रत्येकाने आपले चारचाकी वाहन न घेता, एका चारचाकीत किमान ५ व्यक्तींनी जावे. शक्य असल्यास शहरात शहरात बस, आटोरिक्षा, ई रिक्षा, ओला, उबर इत्यादी पर्यायांचा विचार करण्यात यावा. ज्या ठिकाणी गर्दी होणार आहे अशा ठिकाणी, चारचाकी वाहन न घेता दुचाकीचा वापर करण्यात यावा. स्टेटस म्हणून स्वयंचलित वाहनाचा उपयोग करू नये. वाहन पार्किंग करताना नियम व शिस्तीचे पालन करण्यात यावे. दुसऱ्याला त्याचे वाहन बाहेर काढण्यात अडचण जाऊ नये, याची काळजी घेण्यात यावी. वरील उपायांची अंमलबजावणी करणे कठीण आहे हे मान्य. तथापि, पार्किंगच्या सद्य:स्थितीत समस्या लक्षात घेता हे उपाय करणे आवश्यक आहे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

●● ●●

### केंद्र सरकारचा प्रशंसनीय अर्थसंकल्प

जगाच्या इतिहासात असा एकही दिवस आला होता का, जेव्हा संसदेत केवळ पंधरा सेकंदांच्या घोषणेने एका देशाचे एक कोटी लोक तात्काळ करपात्र श्रेणीतून शून्य-कर श्रेणीत गेले? नाही.

हां तसा लक्ष्मी योजनेबद्दल बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओझरता इशारा फक्त दिला होता. अमेरिकेमध्ये, तुम्ही अविवाहित असाल आणि १२,९५० डॉलर्सपेक्षा कमी कमावल्यास, तुम्ही शून्य आयकर भरता! भारतात, आतापासून, १४,८२६ डॉलर्स शून्य कर असेल!!! अमेरिकेचे दरडोई उत्पन्न ७०,५३९ डॉलर्स आहे तर भारताचे केवळ २,१३९ डॉलर्स! म्हणजे चक्क ३३ पटींनी गरीब असूनही भारतामध्ये अमेरिकेसारख्या (फक्त ३३ कोटी लोकसंख्या, साधनानी संपन्न व जगात बलाढ्य) देशाच्या तुलनेत शून्य टॅक्स ब्रॅकेट जास्त आहे!! हे खरोखर अविश्वसनीय आहे. लेकिन 'मोदी है तो मुमकिन है' हेच खरे.

वीस वर्षांपूर्वी, अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारचा संपूर्ण अर्थसंकल्प फक्त ५,१४,००० कोटी होता! आज, नरेंद्र मोदी सरकारचे संरक्षण बजेटच ६,८१,००० कोटी रुपये आहे!!! भारताने खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि आपल्या सीमेचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी व जनतेसाठी ही आनंदाची बातमी आहे! मध्यमवर्गच नाही तर, शेतकरी, युवक, उद्योजक देशाचा सर्वांगीण विकास या सगळ्या बाबी हा अर्थसंकल्प विचारात घेत आहे. माझ्या मते हा नक्कीच प्रशंसनीय व कौतुकास पात्र अर्थसंकल्प आहे.

**रवी वाघमारे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)


# अखेर वादग्रस्त सायफळ वाळू घाट काढला खोदून

## ना. तहसीलदार उर्फ महाकाल जेठे यांची रात्रीला दमदार कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०४ फेब्रुवारी**

माहूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या पैनगंगा नदी पात्रावरवरील मौजे सायफळ वाळू घाटावरून वाळू चोरी होत असल्याच्या वावड्या उठवून अवैध वाळू चोरट्यांचे कर्दनकाळ ठरत महाकाल या विशेषणाने प्रसिद्ध झालेले नायब तहसीलदार कैलास जेठे यांचे विरुद्ध वाळू तस्करांनीच सोशल मीडियावर मजकूर टाकून विनाकारण बदनामी करण्याचा प्रयत्न केला. परिणामी तहसीलदार किशोर यादव यांचा आदेश मिळाला अन् अखेर ना.तहसीलदार जेठे यांनी रात्रीला जाऊन तो वादग्रस्त सायफळ वाळू घाट जेसीबीने चक्क खोदून काढत बेल पत्र वाहून आल्याने पुन्हा एकदा त्यांच्या या धडक कारवाईची वाळू तस्करांनी धास्ती





घेतल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील वाई बाजार परिसरातील वाळू तस्करीत अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या काही मंडळींनी रात्रीबेरात्री जोखीम पत्करून जिवाची पर्वा न करता वाळू तस्करीविरुद्ध धाडसी कारवाईसाठी प्रसिद्ध असलेले ना.त. कैलास जेठे यांनी आपल्या विरोधात कारवाया करू नयेत म्हणून त्यांना रोखण्यासाठी सोशल मीडियावर खोट्यानाट्या वावड्या उठवत सायफळ वाळू घाटा वरून वाळू चोरी होत असल्याच्या पोस्ट टाकत कारस्थान रचून त्यांची बदनामी सुरू केली होती. यामध्ये काही पांढरपेशा तस्करांचाही हात होता. परंतु कैलास जेठे यांनी बदनामीला भीक न घालता रजेवरून ड्युटीवर हजर होताच तात्काळ सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली व तहसीलदार किशोर यादव यांच्या आदेशानुसार तडक सायफळ वाळू घाट गाठत जेसीबी द्वारे संपूर्ण घाट रात्रीलाच खोदून काढल्याने तस्करांनी त्यांच्या या धडक कारवाईची जबरदस्त धास्ती घेतल्याचे दिसून येत आहे.

सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तथा तहसीलदार किशोर यादव यांनी वाळू तस्करीविरुद्ध वाहन जप्तीच्या जवळपास तीन डझन धडक कारवाया करत वाळू तस्करांना सळो कि पळो करून सोडल्याने आता वाळू तस्करी जवळपास बंद झाली असल्याचे दिसून येत आहे. नायब तहसीलदार पुन्हा महाकालच्या रूपात थेट सायफळ घाट गाठून त्यांनी जेसीबी मशीनच्या सहाय्याने घाट खोदून काढल्याने वाळू तस्करांची प्रचंड कोंडी झाली असून, वाळू तस्करीत एखाद्या ट्रॅक्टर, टिप्पर चालकाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग आढळून आल्यास त्याचे घरूनही ट्रॅक्टर जप्तीची कारवाई करण्यात येईल. असा कडक इशारा तहसीलदार किशोर यादव, महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी दिला आहे. यावेळी सोबत पोलीस पाटील हेमंत गावंडे पाटील, महसूल सेवक पवन पाटील हे उपस्थित होते.

# सदस्य नोंदणीच्या कामावरून बुथस्तरावरील कार्यकर्त्यांना पक्षात महत्वाची पदे : आ.भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट ,दि. ०४ फेब्रुवारी**

सदस्य नोंदणी अभियानांतर्गत किनवट विधानसभा क्षेत्रात १ लाख सदस्यनोंदणीचे उद्दिष्ट पक्षाने ठरवून दिले आहे हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने बुथस्तरावरील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेणे आवश्यक आहे. सदस्य नोंदणीच्या कामाचे मूल्यमापन करूनच प्रदेश स्तरावरून उच्चपदे बहाल केली जाणार असून कोणाचीही वशिलेबाजी चालणार नाही.त्यामुळे सदस्य नोंदणीच्या कामाला जोमाने लागा असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे.

सदस्य नोंदणी अभियानअंतर्गत गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात भाजपाची बैठक आयोजित केली होती त्यावेळी आ.भीमराव केराम कार्यकर्त्यांना संबोधीत केले. बैठकीस सदस्य नोंदणी अभियानाचे



विधानसभा संयोजक बाबुराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार,अशोक नेम्मानीवार,राघू मामा,प्रा किशन मिरासे,तालुकाध्यक्ष बालाजी आलेवार माहूर तालुकाध्यक्ष श्रीकांत घोडेकर, स्वागत आयनेणीवार, दत्ता आडे, निळकंठ कातले, उमाकांत कराळे, संजीव रेड्डी येल्टीवार, अशितोष बेद्रे, भगवान हुरदुखे, काशिनाथ शिंदे, महेश मुंडे सुकेशनी कपाटे सागरताई शिंदे, पाटील मॅडम, भावना दीक्षित, शेखर चिंचोळकर, प्रदीप एडके, माझ बडगुजर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सदस्य नोंदणी अभियानाच्या माध्यमातून बूथस्तरावरील कार्यकर्त्याला त्याचे संघटनात्मक कार्य आणि सदस्य नोंदणीच्या संख्येवरून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महत्वाची पदे दिली जाणार आहेत.आता कोणाचीही वशिलेबाजी चालणार नाही.त्यामुळे उद्दिष्टपूर्ण करा आणि पक्षात मानाचे पद हस्तगत करा आवाहन आ. केराम यांनी केले आहे. या बैठकीला पदाधिकारी कार्यकर्ते शक्तीकेंद्र प्रमुख,विस्तारक व बुथप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा समाजातील लक्षित गटासाठी अभ्यासिका, वस्तीगृहाची निर्मिती करावी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०४ फेब्रुवारी**

सारथी अंतर्गत नांदेड येथे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना अभ्यासिका ग्रंथालय आणि वसतिगृह निर्माण करण्याच्या बाबतचे निवेदन छावाच्या वतीने नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांना देण्यात आले.

महाराष्ट्र सरकारच्या वतीने छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था अर्थात सारथी या संस्थे अंतर्गत मराठा समाजातील लक्षित गटांच्या विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती सुधारली पाहिजे. या उद्देशाने महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यात सारथी संस्थेची सुसज्ज इमारत, वस्तीग्रह, अभ्यासिका, ग्रंथालय, प्रशिक्षण सभागृह या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करून द्यावी. तसेच या सुविधा मराठा समाजातील विद्यार्थ्यांना



त्वरित उपलब्ध करून द्याव्यात. याबाबतचे एक निवेदन छावा मराठा संघटनेच्या वतीने नांदेड जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांना देण्यात आले. यावेळी छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, जिल्हाध्यक्ष इंजि. प्रवीण जाधव, संघटक प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे पाटील, प्रवक्ता डॉ. प्रभाकर जाधव, डॉ. कल्पना कदम, दीपक पाटील राजूरकर,शहराध्यक्ष अजय मुंगल,प्रा. गजानन जाधव, राम शिंदे, सारिका कदम, सविता जाधव आदींची उपस्थिती होती.

# देवकृपा गोशाळा महाराष्ट्रात नांदेड पॅटर्न म्हणुन उदयास येईल : जयेशभाई शाह

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. ०४ फेब्रुवारी**

हिमायतनगर तालुक्यातील पवना येथे देवकृपा गोशाळेच्या मैदानावर सोमवार ता. ३ रोजी आकार ६०÷१०० आकाराच्या शेडचे उद्घाटन श्री शहा यांच्या शुभ हस्ते पार पडले. या वेळी आयोजित कार्यक्रमात शहा बोलत होते.



पुढे बोलतांना शहा म्हणाले की, किरण बिच्चेवार हे कायद्याच्या चौकटीत राहुन गोरक्षणाची लढाई लढतात. ही बाब अतिशय कौतुकास्पद ठरते आहे. आम्ही गोभक्त सर्वजण किरण बिच्चेवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. गोसेवा महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य श्री उद्धव नेरकर आपल्या मनोगतात म्हणाले की, नांदेड जिल्ह्यामध्ये किरण बिच्चेवार यांनी सुरू केलेली गोररक्षणाची लढाई अतिशय कौतुकास्पद असून त्यांनी हाती घेतलेले अद्वितीय कार्य खरच प्रेरणादायी आहे. आगामी काळात महाराष्ट्रात प्रत्येक गोरक्षक कार्यकर्त्यांचे विमा संरक्षण गोसेवा आयोग लवकरच करणार आहोत. तसेच क्षेत्र गोरक्षा प्रमुख भाऊराव कुदळे यांनी आपल्या मनोगतात सांगीतले की, किरण बिच्चेवार यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी आम्ही तत्परतेने काम करीत असून आपल्याकडील गोवंशाचा ठेवा कसायाच्या हाती लागणार नाही. याची काळजी आपण सर्वांनीच घ्यावी. असे अवाहन केले.

कार्यक्रमांच्या प्रास्ताविकात देवकृपा गोशाळेचे संचालक किरण बिच्चेवार म्हणाले की, श्री आदि जिन युवक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांची गोशाळेच्या या मोठ्या यशामध्ये महत्त्वपूर्ण भुमिका राहीलेली आहे. आज पर्यत आपल्या गोशाळेला मोठे चार गोदाम, संपूर्ण गोशाळेला कंपाऊंड, मोठे चाप कटर, अभयदान, रिपर आणी तसेच वेळोवेळी चाऱ्यासाठी मदत या ट्रस्ट ने केली आहे. श्री आदी जिन युवक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई या संस्थेने आमच्या गोशाळेला केलेली मदत व त्यांनी दिलेले आम्हाला प्रोत्साहन हे शब्दात मांडणे कठीण असुन, त्यांचे प्रोत्साहन, मदत आणि प्रेरणा आम्ही कधीच विसरणार नाही. असे सांगुन उपस्थित सर्वांचेच बिच्चेवार यांनी आभार मानले. यावेळी यवतमाळ, लातूर, हिंगोली, नांदेड जिल्ह्यातील गोशाळा संचालक व गोरक्षक आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते मोठ्याप्रमाणात उपस्थिती होते.तसेच महावीर शेठजी श्रीश्रीमाळ, उपाध्यक्ष श्री परमेश्वर मंदिर कमिटी ट्रस्ट, अमरचंद जी श्रीश्रीमाळ, सचिव जैन श्रावक संघ हिमायतनगर, नागनाथराव अक्कलवाडसर, दिगंबर गोसलवाड , वराडे सर, रामरावजी सूर्यवंशी, यासह अनेक उपस्थित होते.

# लोहा सार्वजनिक शिवजयंती कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी केशव पवार



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०४ फेब्रुवारी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत रयतेचे राजे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारी रोजी ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून सार्वजनिक शिवजयंतीची कार्यकारिणी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यंकटेश गॉर्डन येथे जाहीर करण्यात आली. अध्यक्ष केशव मुरलीधर पवार , स्वागताध्यक्ष -जीवन रामराव चव्हाण , उपाध्यक्ष -गणेश धनाजी कल्याणकार , सचिव -साईनाथ प्रल्हाद फाजगे, सहसचिव पपन बोडके, कोषाध्यक्ष-योगेश बंडू कदम, मिरवणूक प्रमुख - बालासाहेब पाटील कवठेकर, प्रसिद्धी प्रमुख- पत्रकार विलास सावळे, इमाम लदाफ, गोविंद कदम, रमेश पवार, शुभम उतरवार, सजावट प्रमुख -अनिल धुतमल, संयोजक - नगरसेवक भास्करराव पाटील पवार, मार्गदर्शक - माजी जि.प. सदस्य प्रविण पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, दत्ताभाऊ वाले, छत्रपती धुतमल, नारायण येलरवाड, दिपक पाटील कानवटे आदी जंबो कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त



### संविधानाने दिव्यांगाना हि जगण्याचा अधिकार दिला आहे - न्या.दलजीत कौर जज

**नांदेड**-जनसामान्य व्यक्तीसारखा जगण्याचा अधिकार संविधानाने दिव्यांगाना दिला असून दिव्यांगाना चांगली वागणूक देण्याची जबाबदारी समाजाची सुद्धा असल्याचे मनोगत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या. श्रीमती दलजीत कौर जज यांनी कुसुमताई चव्हाण सभागृहात आयोजित दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमात केले आहे. जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून सतत दोन दिवस दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक कार्यकामाचे आयोजन जिल्हा समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी केले होते. शहरातील कुसुमताई चव्हाण सभागृहात मंगळवारी दिव्यांगाचा अस्थिव्यंग, मतिमंद, मूकबधिर, अंध या चार प्रवर्गाचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या. श्रीमती दलजीत कौर जज, जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप माळोदे, सेवानिवृत्त समाजकल्याण अधिकारी बापू दासरी, डॉ.अजय मालपाणी, कमलजीत, प्रकाश नेहलानी, ओमप्रकाश गिल्डा हे उपस्थित होते. तर परीक्षक म्हणून डॉ. प्रमोद देशपांडे, प्रा. रमाताई करजगावकर , चंद्रकांत अटकळीकर, दीप्तीताई उबाळे यांनी परीक्षण केले. या सांस्कृतिक कार्यक्रमात दिव्यांगाच्या ५५ शाळेतील दिव्यांग मुलामुलींनी सहभाग घेतला.देशभक्तीपर गीत , लावणी, सामाजिक प्रबोधनपर गीत, शेतकरी आत्महत्या, विविध चित्रपटातील गीतावर दिव्यांग मुला मुलींनी नृत्य सादर करून उपस्थितीतांची मने जिंकली. दिव्यांग मुलामुलींच्या नृत्याला प्रेक्षकातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### शिवजन्मोत्सव सोहळाच्या अध्यक्षपदी धनराज पाटिल लुंगारे



**कंधार**-कंधार शहरात १९ फेब्रुवारी रोजी साजरा होणारा शिवजन्मोत्सव सोहळा सार्वजनिक शिवजन्मोत्सव २०२५ कार्यकारणी निवडीची बैठक नुकतीच भवानी मंदीर भवानी नगर कंधार येथे संपन्न झाली यात अध्यक्षपदी धनराज (बाळु ) पाटिल लुंगारे तर सचिवपदी प्रमेश्वर जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली या बैठकीत पुढिल प्रमाणे शिवजन्मोत्सव सोहळा कार्यकारणीची निवड सर्वानुमते करण्यात आली



अध्यक्ष धनराज ( बाळू )पाटील लुंगारे ,सचिव परमेश्वर पाटील जाधव ,उपाध्यक्ष संभाजी पाटील लाडेकर ,उपाध्यक्ष कपिल जोंधळे ,सहसचिव भगवान पाटील गिरे ,कार्याध्यक्ष नितीन पाटील कोकाटे, सहकार्याध्यक्ष विनोद पाटील तोरणे,संघटक संदीप पाटील तोंडचीरे सहसंघटक अंकुश पाटील कदम ,कोषाध्यक्ष अतुल पापीनवार. या नवनिर्वाचीत कार्यकारणी चे सर्व स्तरातुन शुभेच्छांचा वर्षाव केल्या जात आहे.

# खरब खंडगांव ते चांडोळा वळण रस्ता ठरत आहे धोकादायक

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. ०४ फेब्रुवारी**

मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव ते ग्राम चांडोळा पर्यंतचा ठिकठिकाणचा वळण डांबरी अंतर्गत मार्ग वाहनधारकांसाठी अतिशय धोकादायक ठरत असल्याचे सद्यस्थितीत चित्र आहे.रविवार दि.०३ फेब्रुवारी रोजी त्याच चांडोळा तांडा तलावनजीकच्या वळण रस्त्यावर बस आणि मोटारसायकलचा भीषण अपघात घडला होता.त्यात मोटारसायकल वरील एकाचा मृत्यु तर एक गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.





खरब खंडगांव येथील काही मुलांचे मोठे वाहन चांडोळा शाळेसाठी नियमित ये जा करतात.गाव व परिसरातील काही शासकीय कार्यालयातील कर्मचारीवर्ग दररोज दळणवळण करीत असतात.त्यात या वळण रस्त्यांवर वाहनधारकांसाठी सूचनावजा दिशादर्शक,दिवसा,रात्रीचे चमकणारे रेडियम फलक,अपघात ग्रस्त स्थळ,वाहने सावकाश चालवा,पुढे गाव,शाळा आहे,गतिरोधक,रोडवर रात्री चमकणाऱ्या बाबी,सूचनाफलक, संकेत अशा स्वरूपात ठळकपणे वळण परिसरात संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने बसवणे महत्त्वपूर्ण झाले आहे. शिवाय वळण रस्त्यावर आजूबाजूस रोडलगत काटेरी झुडूपे व इतर वनस्पतींची वाढ झालेली आहे. या वनस्पतींमुळे वेगात वळण रस्त्यावरील वाहन दिसत नसल्याने अपघात वाढताना दिसून येत आहेत. संबंधित वळण रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष घालून दैनंदिन ये जा करणाऱ्या वाहन धारकांना दिलासा द्यावा,असे परिसरातील वाहनधारकांतून व्यक्त केले जात आहे.

# हदगावमधील उड्डाणपुलाचे काम संथ गतीने सुरू

## ▸▸कंपनीच्या मनमानी व एकाधिकारशाहीमुळे वाहनधारकांत असंतोष

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,,दि. ०४ फेब्रुवारी**

केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या नागपूर - तुळजापूर ( क्र. ३६१) या राष्ट्रीय महामार्गाचे महागाव ते वारंगा दरम्यान रस्त्याचे कामाचे अक्षरशा तीन तेरा वाजले असून त्यात भर म्हणजे हदगाव शहरानजीक उड्डाणपुलाचे काम कासवगतीने सुरू असल्यामुळे काम करत असलेल्या कंपनीच्या मनमानी व एकाधिकारशाहीमुळे वाहनधारकांत मोठ्या प्रमाणात असंतोष उफळून येत आहे. राष्ट्रीय राज्य महामार्ग प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांचे यांच्यावर कुठलेच अंकुश नसल्याकारणाने ना. गडकरी यांच्या या महत्वकांक्षी प्रकल्पास अप्रत्यक्षरीत्या ' ब्रेक ' देण्याचा कार्य होत असल्याची चर्चा होत आहे. हदगाव शहरातून जात असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ वरून नागपूरकडे जात असलेल्या मार्गावरती वारंगा ते गोजेगाव दरम्यानच्या कामाचे



अक्षरशा तीन तेरा वाजले होते काही ठिकाणी हे काम रस्ता खोदून पुन्हा नव्याने करण्यात येत आहे. हदगाव शहरानजीक असलेल्या उड्डाणपुलाचे अर्धवट कामामुळे आतापर्यंत अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. संबंधित कंत्राटदाराचे काम करण्याची कार्यशैलीमुळे ना. गडकरी यांच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाचे कामास हदगावात ब्रेक लागल्याचे स्पष्ट जाणवत आहे. या टप्प्याचे काम मागच्या पाच ते सात वर्षापासून संथ गतीने काम चालू आहे. पूर्वी सदभाव कन्स्ट्रक्शन कंपनीने हे काम घेतले होते त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे पहावयास मिळाले आता कुठेतरी दुसऱ्या कंत्राटदाराने हे अपूर्ण काम हाती घेतल्या असून त्यांच्या पण काम करण्याची पद्धत लक्षात घेता येथे ही दर्जाहीन काम होतं असल्याची चर्चा होत असून संबंधित विभागाचे अधिकारी यांना पाठीशी का घालत आहेत ? की यांच्यात मधुर संबंध निर्माण झालेत की काय ? असे एक ना अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# माहूरात दिवसाढवळ्या घरफोडी करून ५० हजाराचा मुद्देमाल चोरी

## अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०४ फेब्रुवारी**

माहूर शहरातील वार्ड क्र.५ मधील राष्ट्रीय महामार्गालगतच्या गजबजलेल्या रहिवासी वस्तीतील एका बियरशॉपी चालकाचे राहते घराचे कुलूप व कडीकोंडा तोडून दिवसाढवळ्या अज्ञात चोरट्याने ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व २० हजार रुपये रोख रक्कम असे मिळून एकूण जवळपास ५० हजार रुपयांचे मुद्देमालावर डल्ला मारत चोरी केल्याची खळबळजनक घटना दि.३ फेब्रुवारी रोजी घडली आहे.



माहूर पोलिस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार पवनकुमार शिवराम कोंडे वय ३८ वर्ष हे व्यावसायिक शहरातील ब्राम्हणगल्ली वार्ड क्र.येथील आपल्या घराला लागून असलेल्या बिअर शॉपीचे दुकान चालवुन आपल्या कुंटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

दरम्यान,दि. ०३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:३०वा. चे सुमारास त्यांच्या चुलत भाचीचे लग्न शहरातील बालाजी मंगल कार्यालय येथे असल्याने लग्नाकरिता ते आपल्या कुटुंबासह गेले होते. जाताना घराच्या दाराला कुलुप लावुन खिडक्या बंद करुन गेले. त्याठिकाणी लग्नादीकार्यानंतर पवन कोंडे हे संध्याकाळी ०४:०० वा. चे सुमारास घरी परतले असता त्यांना त्यांच्या घराचा कडीकोंडा तुटलेला अवस्थेत दिसला.त्यांनी घरात जावुन पाहणी केली असता त्यांची बहीण सौ.नंदा नागेश जोशी रा. गोरेगाव प. मुंबई हिच्या बॅगेतील सोन्याचे कर्णफुले ०५ग्रॅम वजनाचे किंमत अंदाजे ३० हजार रुपये व २० हजार रुपये रोक रक्कम असे मिळून एकुण ५० हजार रुपयांचा मुद्देमाल सकाळी ११:३० ते दुपारी ४:००वा. चे. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराचा कडीकोंडा तोडुन आत प्रवेश करून चोरुन नेला असल्याचे दिसून आल्याचा जबाब पवन कोंडे यांनी नोंदवला आहे.पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून भरदिवसा घडलेल्या या चोरीच्या घटनेची कलम बीएनएसएसच्या १७३ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३३१(३) अंतर्गत लपून घरात घुसने किंवा घरफोडी करणे व कलम ३०५(अ) अंतर्गत राहत्या घरात चोरी करणे या दोन विविध कलमानुसार गुन्ह्याची नोंद केली आहे. घटनेचा पुढील तपास प्रभारी ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.सुनिल गायकवाड व बीट जमादार गजानन चौधरी हे करीत आहेत.

# कुंडलवाडी बसस्थानकाचे बांधकाम कासव गतीने सुरू



**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०४ फेब्रुवारी**

कुंडलवाडी शहराचा विकास व प्रलंबित कामे आमदार जितेश अंतापुरकर यांनीलवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

कुंडलवाडी शहर हे बिलोली तालुक्यातील मोठे गावं असून या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय मंजूर होऊन रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहे मात्र उद्घघाटनेच्या प्रतीक्षेतअसून या बाबीकडे आमदार यांनी लक्ष द्यावे तसेच कुंडलवाडी प्रा. आरोग्य केंद्रात एक वैद्यकिय अधिकारी सह अनेक पद रिक्त असल्यामुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत आहे.

कुंडलवाडी येथील बसस्थानकाचे बांधकाम कासव गतीने सुरू असून बसस्थानकात सोई सविधा उपलब्ध नाहीत त्या मुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. कुंडलवाडी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार देगलुरच्या मुख्याधिकारी कडे असल्या मुळे कुंडलवाडीतील नागरिकांची कामे होण्या साठी विलंब होत आहे त्या मुळे कुंडलवाडीनगरपालिकेला पूर्ण वेळ मुख्याधिकारी नेमण्यात यावा असे अनेक बाबी असून हया बाबी कडे आमदार अंतापूरकर यांनी लक्ष देवून विकासकामे करावे अशी हया परिसरातील जनतेची मागणी आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त





ज्ञानराधासह दिवाळखोरीत निघालेल्या मल्टीस्टेट पतसंस्थांच्या बीड येथे ठेवीदार संघर्ष कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवार दि.४ फेब्रुवारी रोजी मोर्चा काढून शासन आणि प्रशासनाला जाब विचारला.

## डॉ. प्रकाश महिंद्रे यांचे दुःखद निधन



**तभा वृत्तसेवा**
**पुणे दि.४ फेब्रुवारी**

बीडच्या माजी खासदार स्व. केशरबाई क्षीरसागर यांचे जावई व माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांचे मेव्हणे डॉ. प्रकाश महिंद्रे यांचे दि. ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी पुणे येथे त्यांचे घरी हृदय विकाराने दुःखद निधन झाले.

डॉ.प्रकाश महिंद्रे हे महाराष्ट्र शासनाच्या फलोउत्पादन विभागाचे संचालक होते. त्यांनी त्यांच्या काळात हजारो एकर शेतीवर फळबागा निर्माण केल्या. डॉ. प्रकाश महिंद्रे हे मुळचे दिग्रस जि.यवतमाळ येथील असुन त्यांनी जिल्हा मृदु संधारण अधिकारी म्हणुन कामास सुरुवात केली. पुढे त्यांची विभागीय मृद संधारण अधिकारी म्हणून पदोन्नती झाली. त्यांनी अकोला, नाशिक व पुणे या विभागात सेवा केली. पुढे शासनाने त्यांची फलोउत्पादन संचालक म्हणून निवड केली. त्यांच्या विभागात उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल शासनाने त्यांचा गौरव केला. तत्कालीन लोकसभा अध्यक्ष बळराम जाखड यांच्या हस्ते त्यांना प्रियदर्शनी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यांचा महाराष्ट्रात मोठा चाहता वर्ग आहे. त्यांनी नागपुर विद्यापीठातुन एम.एस.सी.पदवी धारण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी डॉ. प्रिया महिंद्रे, एक मुलगा, स्नुषा व दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## निपुण जल्लोष २०२५ च्या कार्यक्रम धोंडराई येथे संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.४ फेब्रुवारी**

बालकांना खेळाताना आनंद घेता यावा त्याच बरोबर जे विद्यार्थी वेगवेगळ्या कलागुणांत प्रविण आहेत. अशा बालकांच्या आपली कला दाखविण्यासाठी वाव मिळाला पाहिजे. मुले अभ्यासा बरोबर खेळातही अग्रेसर असले पाहिजेत असा उदांत हेतू डोळ्यासमोर ठेवून यावरआधारित निपुण जल्लोष २०२५ या कार्यक्रमाचे शुक्रवार दि.३१ रोजी धोंडराई या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी अध्यक्ष संजय सोनवणे नायब तहसीलदार गेवराई, तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी शेवगाव शंकर गाडेकर,डायट अधिव्याख्याता स्वाती कापसे, लेखिका संध्या सोळुंके,गटशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे, मा. सभापती जिल्हा परिषद बीडचे भरत खरात, फुलचंद बोरकर, धोंडराईच्या सरपंच शितलताई साखरे, बालसंवादक आर्या चौथाईवाले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा

## महसूल, बांधकाम, कृषी, जिल्हा परिषदेची आढावा बैठक





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

बीड मतदारसंघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी महसूल विभागांतर्गत बीड व शिरूर कासार तहसिल कार्यालय, सार्वजनिक बांधकाम तसेच जिल्हा परिषदेतील बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा विभागांची बैठक घेऊन आढावा घेतला. यावेळी या विभागांशी निगडित नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकार्यांना दिले.

मतदारसंघातील सामान्य लोकांची सरकारी कार्यालयात अडकलेली कामे तसेच जनसामान्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने तसेच विभागांतर्गत होत असलेले कामकाज यांचा आढावा घेण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.४) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात बैठक घेतली. महसूल विभागांतर्गत बीड व शिरूर कासार तहसिल कार्यालय, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषद अंतर्गत बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आदी विभागांचा आ.क्षीरसागर यांनी आढावा घेतला. यावेळी या विभागांशी संबंधित नागरिकांच्या असलेल्या तक्रारी यांचा निपटारा करण्याबात आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच आ.क्षीरसागर यांनी या विभागांतर्गत झालेल्या आणि होत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ब्राह्मण महिला मंचाच्या वतीने शानदार राज्यस्तरीय सन्मान सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर दि.४ फेब्रुवारी**

मातृशक्ती हीच आमची भारताची मुळशक्ती असुन आज सर्व क्षेत्रात यशस्वीनींनी यशोशिखर गाठले आहे.महिला सबलीकरणाचा प्रामाणिक प्रयत्न हा स्वतःपासून करावा लागेल तरच स्त्री पुरुष समानता खऱ्या अर्थाने स्थापित होईल असे प्रतिपादन परळीचे माजी नगराध्यक्ष तथा अमृत संस्थेचे सल्लागार बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले.ब्राह्मण महिला मंचाच्या वतीने शानदार राज्यस्तरीय सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते शंभर कर्तृत्ववान महिलांचा विशेष पुरस्काराने गौरव करण्यात आला.

ब्राह्मण महिला मंच, घे भरारी फेसबुक ग्रुप व यशस्वी उद्योजिका समूह यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना शाल,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र अशा स्वरूपात राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर परळीचे माजी नगराध्यक्ष तथा अमृत संस्थेचे सल्लागार बाजीराव भैया धर्माधिकारी, परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा अमृत संस्थेचे सल्लागार विश्वजीत देशपांडे पुणे, संभाजीनगर चे माजी उपमहापौर संजय जोशी, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस अमृता पालोदकर, ब्राह्मण महिला मंचच्या अध्यक्षा विजया कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रातील महिलांना सेवा रत्न, समाज रत्न ,शिक्षण रत्न ,आरोग्य रत्न, कलारत्न .आणि उद्योग रत्न असे विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. विशेष म्हणजे या कार्यक्रमात दोन बंधूंनाही



गौरविण्यात आले. अनिल डोईफोडे नांदेड आणि राजेंद्र पोद्दार वसमत यांचाही समाज रत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना बाजीराव धर्माधिकारी म्हणाले की,ज्यांना स्त्री माता म्हणून कळाली ते जिजाऊंचे शिवबा झाले. ज्यांना स्त्री बहीण म्हणून कळाली ते मुक्ताईचे ज्ञानेश्वर झाले.आपण सर्वजण केवळ भाषणात महिला सबलीकरणं व स्त्री पुरुष समानता या मोठ मोठ्या विषयांवर बोलत असतो. मात्र खऱ्या अर्थाने आपल्या स्वतःच्या घरापासून ते देशाच्या कारभारापर्यंत जेंव्हा स्त्रीला अधिकार प्राप्त होतील तो दिवस महिलांसाठी ऐतिहासिक ठरेल.आता परिस्थिती खूप झपाट्याने बदलत आहे.चूल आणि मूल तसेच आपल्या कुटुंबाचा गाडा हाकणारी माय माऊली, आपल्या गावाचा,राज्याच्या,देशाचा कारभार चालवत आहे.असे कोणते क्षेत्र नाही की जिथे महिलांची यशोगाथा लिहिली गेली नाही.या सर्व यशस्विनी एक एक शिखरे प्रादाक्रांत करीत आहेत असे त्यांनी सांगितले. विश्वजीत देशपांडे म्हणाले अमृत संस्थेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना बळ मिळणार आहे तरुण तरुणी व्यावसायिक महिला अशा सर्व घटकांनी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी संजय जोशी व सौ अमृता पालोदकर यांची समयोचीत भाषणे झाली. सौ विजया कुलकर्णी यांनी संस्थेचा कार्य अहवाल मांडला.

यावेळी सौ. राजश्री कुलकर्णी यांनी बहारदार सूत्रसंचलन करून सर्वांची मने जिंकलीसौ. मीनाताई झाल्टे यांनी आभार प्रदर्शन केले व उज्वला ताईंनी स्वागत गीत गायले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.विजया कुलकर्णी, सौ सुषमा पाठक, सौ.मीना झालटे, सौ.प्रतिमा भाले, सौ.जयश्री चोब, सौ.उज्वला पैठणे, सौ.राजश्री एरंडे, सौ. वंदना कुलकर्णी दिशा स्वयंपाक घरच्या सौ.जयश्री डफळापुरकर, रांगोळी रेखाटन सौ.मनिषा खडके,कु. गिरिजा ठोसर आदींनी परिश्रम घेतले.

## सौ.के.एस.के. महाविद्यालयात मानसशास्त्र व समाजशास्त्र विषयाचे व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

नवगण शिक्षण संस्थेच्या सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मानसशास्त्र व समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे होते.



तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.रेखा ढेरे मानसशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय,बीड यांनी समुपदेशन या विषयावर सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मानसशास्त्र विषयाचे भावी जिवनात होणारे फायदे, मानसशास्त्र विषयातील संधी तसेच आजच्या काळात तनावमुक्त जिवन जगायचे असेल तर मानसशास्त्राच्या सहकार्याशिवाय अशक्य आहे असे व्याख्यान प्रसंगी डॉ.रेखा ढेरे बोलत होत्या.तसेच समाजशास्त्र व मानसशास्त्रात दोनही विषय अत्यंत उपयुक्त वाटतात असे ही त्या व्याख्यान प्रसंगी म्हणाल्या.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी समाजशास्त्र व मानसशास्त्र या विषयातील सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना सांगीतली. आजच्या जिवनामध्ये समुपदेशनाची प्रत्येकांना गरज आहे. असे ते यावेळी म्हणाले.या कार्यक्रमाचे सूत्र संचलन समाजशास्त्र विभागाचे डॉ.भीमराव राठोड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.अस्मिता भुतेकर यांनी मानले.कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदीसह कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ फेब्रुवारी**

रंगदेवताची पालखी सजवून, टॅक्टर, बैलगाडीवरून असंख्य बीडच्या कलाकारांनी एकत्रित येऊन आकर्षक अशी शोभयात्रा काढत चंपावती नगरीचे लक्ष वेधले. काल दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारच्या सुमारास बीडच्या इतिहासत अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्यानंतर चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून कलाकारांची शोभयात्रा पहिल्यांदाच निघाली. या शोभायात्रेत पारंपरिक कलाकार, असंख्य बाल कलाकार जेष्ठ कलाकार आणि कलाप्रेमी यांनी मिळून शिवातीर्थावर वंदन करून नटराजाची पालखी वाजवत गाजवत मोठ्या थाटामाटात नाट्यमंदिरात आणली आणि नटराजाचे पूजन करून चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे उदघाटन करून मोठ्या थाटामाटात शुभारंभ केला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेच्या उदघाटन



समारंभ प्रसंगी व्यापारी महासंघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री प्रमुख पाहुणे होते तर उदघाटक जेष्ठ कलाकार भरत अण्णा लोळगे उपस्थित होते. याबरोबरच दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, दै वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ, कलाकार किशोर धुताडमाल, जतीन वाघामारे, सोनल नहार, संस्कार भरतीचे प्रमोद वझे, बाळू सौंदतिकर यांच्यासह असंख्य कलाकार उपस्थित होते. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे या तिघांनी मिळून सर्व मान्यवरांचे सत्कार करून आपल्या भाषणात स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांना शुभेच्छा दिल्या. काल दि. ३ रोजी समूह नृत्य मराठी माध्यम इयत्ता ४ थी ते दहावी वयोगटाच्या समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या. याबरोबरच एकपात्री अभिनय स्पर्धा देखील संपन्न झाली.

# ज्ञानभाषा व्हावी माझी मराठी...!




मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येकाला याचा निश्चित अभिमान आहे मात्र आता काळाच्या ओघात काही शहरी संरचनेत सध्या प्रचलीत ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीचा वापर आपण करीत आहोत. सध्या ज्ञानमाषा इंग्रजी आहे असे मान्य करून मुलांना इंग्रजीतून शिक्षण देणा-यांची संख्या अधिक झाली आहे आणि दुसरीकडे आपल्या भाषेत ज्ञान उपलब्ध नाही असे आपण जणू कबूल करून सध्या वाटचाल करीत आहोत. यासाठी मराठी ज्ञानभाषा होणे आवश्यक आहे हे तर स्पष्टच आहे परंतु ही वेळ का आली याचाही प्रत्येकाने विचार करण्याची आज गरज आहे.

भारतावर ब्रिटिशांनी १५० हुन अधिक राज्य केले. त्यापूर्वीच्या काळात आपण शास्त्र, विज्ञान आणि इतर सर्व ज्ञानासाठी कोणती भाषा वापरत होतो हे आपण जाणून घेतले पाहिजे. इंग्रजांनी इंग्रजीचा प्रसार आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी केला. आज ते गेले असले तरी आपली मानसिकता बदललेली नाही आणि एक प्रकारे ज्ञानभाषा म्हणजे इंग्रजी हा समज आपण करून घेतला आणि तो येणाऱ्या पिढीसाठी एकमेव पर्याय मानून त्यावरच आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या पूर्ण कालवधीनंतरही ठाम आहोत.

मराठीला ज्ञानभाषा म्हणून ओळख मिळवून देताना आपण जगातील इतर देशांकडेही बघायला हवे. ज्या देशात ब्रिटिश साम्राज्य शिरकाव करू शकले नाही असा लगतचा देश फ्रान्स, दोन युद्धात ब्रिटन विरोधी लढणारे जर्मनी तसेच मित्र राष्ट्र म्हणून साथ दिलेल्या रशिया या देशांनी देखील सर्वच क्षेत्रात तोडीस तोड विज्ञान आणि संशोधन कार्य केले. या सर्व देशांची भाषा अर्थातच त्यांची राष्ट्रभाषाच होती आणि त्याच भाषेचा वापर या देशांनी ज्ञानभाषा म्हणुन केला आणि आजही करीत आहे.

अशिया खंडातील चीन, द. कोरिया, उ. कोरिया, जपान आदी देशांबाबत देखील आपणास याच पध्दतीने सांगता येईल यापैकी कोणत्याही देशात इंग्रजी ही ज्ञानभाषा नाही. आपला देशात इग्रंजी भाषा थोपली गेली आणि आपण आपली भाषा विसरून इंग्रजीलाच ज्ञानभाषा मानायला लागलो आहोत आणि या खेरीज दुसरी भाषा शक्यच नाही असाही एक मोठा गैरसमज आपण करून घेतलेला आहे.

भारतीय इतिहास आपण बघितला तर लक्षात येईल की संस्कृत, पाली, मगधी अशा विविध भाषा आपला ज्ञानभाषा होत्या. अगदी आपली मायबोली देखील एक ज्ञानभाषाच होती. संपर्कसूत्र म्हणून वापरणं वेगळं आणि ज्ञानभाषा वेगळी. ब्रिटिश येणापूर्वी भारतात मुगल साम्राज्य होते. त्या काळी ज्ञानभाषा म्हणून त्यांनी फारसी, ऊर्दूचा वापर केला. शिवकालीन महाराष्ट्रात ज्ञानभाषा मराठीच होती.

मला' स्वप्न मराठी भाषेत पडतात अनं चित्रपट अभिनेता नाना पाटेकर सांगतो त्यावेळी त्याचा खरा अर्थ आपण जाणून घेतला पाहिजे. प्रत्येकाला सर्वप्रकारे बोलीभाषेत आणि त्याच्या मातृभाषेत प्राप्त होणारी माहिती झटकन कळते. अनाकलनीय अशा इंग्रजी भाषेला ज्ञानभाषा म्हणून मान्य केल्याने आपण बहुतांश विद्यार्थ्यांना संकटात टाकतो. इंग्रजी भाषा आत्मसात करणे वेगळे आणि मराठीत विचार करून त्याचा इंग्रजीत अनुवाद करून ते मांडणं वेगळं... यात अनेकजण न्यूनगंडाचे शिकार होतात. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये यामुळे आपण मागास आहोत असा गैरसमज होतो. त्याचे अनेक मानसिक परिणाम होतात.. अगदी बुध्दीमान असून देखील भाषिक दडपणाने अनेक जण मग समाजात वावरण्यास घाबरतात असा अनुभव आहे.

ज्ञानभाषा म्हणून आपण मराठीचा वापर करण्यासाठी विशिष्ट पर्यायी शब्द शोधण्याची आणि क्लीष्ट मराठी भाषा करण्याची आवश्यकता नाही. मराठी भाषा आजवरच्या विकासात इतर भाषांना स्विकारत विकसित झाली आहे. इतर भाषांमधील शब्द आपण स्विकारणे त्याला पर्याय न काढता त्याचा स्वीकार केल्याने आजची ही मराठी भाषा अधिक संपन्न भाषा झाली आहे.

भाषेचे काही शुद्धतेचे नियम असतात. ते लिखाणाबाबत वापरले जातात. मात्र बोलीभाषेत इतर भाषेतील शब्द सहज येतात, आणि ते स्विकारले जाऊन वापरातही येतात. देशादेशातील व्यापार व इतर बंधांमुळे भारतीय भाषांमध्ये जसे इतर भाषांमधील शब्द आले तसे ते मराठी भाषेतही आले आहेत. अरबी, फारशी, ऊर्दू भाषांप्रमाणेच मराठी भाषेत इंग्रजी शब्द देखील मोठ्या प्रमाणात आले. यामुळे मराठी भाषेचे एकप्रकारे विस्तारीकरण झाले आणि ही प्रक्रिया अव्याहतपणे चालू आहे. याचाच पुढचा टप्पा आपली मराठी ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यात आपल्याला गाठायचा आहे.आपण ग्रेगरियन कैलेंडर स्विकारले आणि सर्व व्यवहारासाठी याचा वापर आपण करतो. अगदी आर्थिक वर्ष, शैक्षणिक वर्ष यांची आखणी त्याच्याच आधारे करतो. परंतु आपले सण-उत्सव मात्र आपण भारतीय ऋतू आणि पंचांग याचा वापर करतो. याच पद्धतीने ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विस्तार करताना आपल्याला दोन्हीचा सूवर्णमध्य साधायचा आहे. शक्य तिथं आणि मुळ मराठी शब्द उपलब्ध आहे अशा ठिकाणी आपण आवर्जून त्याचा वापर करणे, मराठीचा आग्रह धरणे यातून आपणास अपरिहार्यपणे स्विकार करावे लागले तर इतर भाषांमधील शब्दही स्विकारून आपण मराठीला ज्ञानभाषा करू शकतो हे नक्की!

प्रशांत विजया अनंत दैठणकर
जिल्हा माहिती अधिकारी,
बीड
चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

# आडगाव बाजार ते दिग्रस रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत; प्रवासी व नागरिकांमधून तीव्र नाराजी

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** जिंतूर सा वा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्त्याच्या कामाची सुरुवात होऊन कार्यकाळ संपत आला तरीही फुलाचे खोदकाम करून रोडवर मुरूम व गिट्टी टाकूनच रोड अर्धवट अवस्थेत काम मंद गतीने आहे. यामुळे अनेक नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे .तसेच दिवसा तालुक्याच्या ठिकाणी येण्यासाठी महिला, नागरिक, शेतकरी ,विद्यार्थी व अनेक कर्मचाऱ्यांनाही या गीट्ठीवरून प्रवास करावा लागत आहे .सदरील काम लवकर करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

जिंतूर तालुक्यातील आडगाव बाजार, गडदगव्हाण, मोहखेडा, सोरजा, दाभा, डिग्रस या गावांना जोडणारा बारा किलोमीटरचा रस्ता डांबरीकरण करण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण लांबी १२.९० कि.मी. असून डांबर रस्ता ११.४४० कि.मी व कॉंक्रेट सिमेंटचा रस्ता ६.५० लि .एकूण फुलांची संख्या १४ नग आहेत. एकूण अंदाजे किंमत ८२९.१० लाख असून सदरील काम चालू केल्याचा दिनांक २६ -९ -२०२३ काम पूर्ण करण्याचा कालावधी २५ मार्च २०२५ सदरील काम मे. रामेश्वर कंट्रक्शन कंपनी परभणी यांनी सदरील काम घेतले असून कार्यकाळ संपत आला असल्यामुळे सदरील रस्ता यावर्षी होणार किंवा नाही ? असा नागरिकांमध्ये यक्षप्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यामध्ये तसेच हिवाळ्यामध्ये व आता उन्हाळ्यामध्ये सुद्धा सदरील परिसरातील नागरिकांना रस्ता तयार न केल्यामुळे अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे .परभणी बस स्थानक येथून गडदगव्हाण येणारी गाडी मुक्कामी न जाता आडगाव बाजार येथेच मुक्कामी थांबत असल्याने अनेक नागरिकांची हेळसान होत आहे. जिंतूर बस स्थानक येथूनही बस येत नसल्याने अडचण निर्माण होत आहेत .सदरील रोडवर सर्वत्र गिट्टी व मुरूम टाकल्याने साधा दुचाकी वरून प्रवास करणे




कठीण झाली आहे. चार चाकीचा तर प्रवास करणे दूरच आहे. याच रोडच्या उद्घाटन करण्यासाठी राजकीय श्रेय घेण्यासाठी परभणी जिल्ह्याचे खासदार व विद्यमान आमदार या दोन गटांमध्ये मोठ्या प्रमाणात बाचाबाची झाली होती. परंतु सदरील रोडचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने नागरिकांमधून आचार्य व्यक्त केले जात आहे. सदरील रोड लवकर डांबरीकरण करून नागरिकांना प्रवासासाठी चालू करावा. सदरील परिसरातील दळणवळण बंदच असल्यामुळे अडचणी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### पवार महाविद्यालयात उद्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

### उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते उदघाटन

**पू/प्रतिनिधी :** येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि स्वातंत्र सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ०६ फेब्रुवारी गुरुवार रोजी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाच्या एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

सार्वजनिक आणि शैक्षणिक ग्रंथालयामध्ये ग्रंथालय सेवा वितरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयोगिता आणि वापर या विषयावर होणाऱ्या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन ०६ फब्रुवारी गुरुवार रोजी सकाळी १०:३० वाजता महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण विभागाचे संचालक, डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ रामेश्वर पवार हे उपस्थित राहणार आहेत.

तर प्रमुख अतिथी मुंबई येथील ग्रंथालय संचालनालयाचे संचालक, अशोक गाडेकर ,नवी दिल्ली येथील भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेकर हे उपस्थित राहणार आहेत.

तर या राष्ट्रीय चर्चासत्राचे बीजभाषक म्हणून सावित्रीबाई फुले विद्यापीठ ,पुणे येथील डॉ. राजेंद्र कुंभार हे सकाळी ११:३० ते १२:०० या दरम्यान भाष्य करणार आहेत.

उद्घाटन सत्रानंतर दुपारी १२:०० ते ०१:०० या वेळेत कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावरील चर्चासत्रात अध्यक्ष म्हणून डॉ. सुभाष चव्हाण तर साधन व्यक्ती म्हणून डॉ. नंदकुमार दहीभाते ,डॉ. किरण धांडोरे, डॉ. रामदास टेकाळे हे भाष्य करणार आहेत .

तर दुसऱ्या सत्रात दुपारी ०१:०० ते ०२:०० या वेळेत ग्रंथालय प्रणाली संदर्भात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा करावा या विषयावरील चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. धर्मराज वीर हे आहेत तर साधनव्यक्ती म्हणून डॉ. दत्तात्रय काळबांडे, डॉ. मंजु दुबे ,डॉ अनिल जाधव हे सहभागी होणार आहेत. या सत्रानंतर दुपारी ०२:०० ते ०३:०० या दरम्यान भोजन अवकाश असेल.

भोजन अवकाशा नंतर दुपारी ०३:०० ते ४:०० या दरम्यान तिसऱ्या सत्रामध्ये सार्वजनिक ग्रंथालय सेवा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या सत्राचे अध्यक्ष डॉ.एन. मोतेवार राहणार असून साधनव्यक्ती म्हणून डॉ. सुनील हुसे ,गुलाब मगर, डॉ. शिवाजी सोनटक्के हे सहभागी होणार आहेत .

या सत्रानंतर राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप सायंकाळी ०४:०० ते ०५:०० या वेळी प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, खंडेराव सरनाईक ,राम मेकाले ,डॉ.अशोक कोलंबीकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन या चर्चासत्राचे संयोजक डॉ. प्राचार्य रामेश्वर पवार, समन्वयक डॉ. अशोक कोलंबीकर, समन्वयक डॉ. विलास काळे, प्रा.दत्ता पवार, डॉ.त्रिमूर्ती सोमवंशी, प्रा. विठ्ठल डाके आदीनी केले आहे.

### टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वारांचा मृत्यू शहरातील नृसिंह चौकातील घटना



**जिंतूर,/प्रतिनिधी :** शहरातील नृसिंह चौक परिसरात वळणावर जड वाहतुक करणाऱ्या टिप्परच्या धडकेत सोनापूर येथील ५० वर्षीय दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असल्याची घटना घडली दरम्यान जखमीला ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले असता उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची घटना दि.१ फेब्रुवारी दुपारी १२;३० च्या सुमारास घडली असून नागरिकांनी अपघातग्रस्त वाहनांच्या चालकाला पोलीसांच्या ताब्यात दिले आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी जिंतूर शहरातील वरुड रोडवरील नृसीह चौक परिसरात जड वाहतुक करणारा टिप्पर चालकाने वाहन निष्काळजीपणाने चालून समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिल्याने यात सोनापूर येथील विनायक शिवलाल चव्हाण या दुचाकीस्वारांच्या कमरे खाली मार लागल्याने रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावर पडलेला असताना बहुतांश नागरिकांनी बघ्याची भूमिका घेतली गर्दी हटवत एका ऑटो चालक हुजूर यांनी पुढाकार घेत काही युवकाच्या मदतीने जखमी अवस्थेत असलेल्या जखमीला ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले यावेळी डॉ.वकार हुसैन,सिस्टर अर्चना जवळे,पालवे,शेख, सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात आदींच्या मदतीने प्राथमिक उपचार केले अपघातग्रस्ताचे रक्तस्त्राव जास्त होत असल्याने प्रकृती खालवत असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले असता परभणी येथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची समजते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी ग्रामीण रुग्णालयात आले असता नागरिकांनी वाहनावरील चालकाला पोलीसांच्या ताब्यात दिले असून याप्रकरणी जिंतूर पोलिसात बातमी देईपर्यंत कोणतीही नोंद झालेली नव्हती.

### डॉ. नितोंडे यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता देण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## श्रीमद् भगवद्गीता ज्ञान महोत्सवाची उत्साहात सांगता; सेलूतील ब्रह्माकुमारी विद्यालयाचे आयोजन



**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने श्री साईबाबा मंदिरात आयोजित राष्ट्रीय प्रवचनकार ब्रह्माकुमारी राजयोगिनी भारतीदीदी यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञान महोत्सवाला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रविवारी, २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी महोत्सवाची उत्साहात सांगता झाली. या वेळी झालेल्या यज्ञामध्ये व्यसन, विकार, आजार, ताणतणाव, समस्या, संकटे आदींची पूर्णाहुती देण्यात आली.

महोत्सवात २७ जानेवारीपासून ब्रह्माकुमारी राजयोगिनी भारतीदीदी यांनी श्रीमद् भगवद्गीतासारचे महत्त्व विशद केले. या वेळी ब्रह्माकुमारी शांता बहेन, नंदा बहेन, अर्चना बहेन आदींची उपस्थिती होती. भारती दीदी यांनी सांगितले की, समाजातील सद्य परिस्थिती पाहता, धर्मग्लानीची वेळ आली आहे. वाढत्या फॅशनच्या दुनियेत भारतीय संस्कृती अधिकच हरवत चालली आहे. त्यासाठी संयम, मर्यादांचे पालन करावे, अहंकार, द्वेष, मत्सर आदी विकारांना दूर ठेवा. सर्वांप्रती स्नेह आणि निस्वार्थ भाव ठेवावा. रामराज्याची पुनर्स्थापना आणि विश्व कल्याणासाठी दैवी गुण आणि अध्यात्मिकता अंगी बाणविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

महोत्सवात सकाळी सहा ते आठ यावेळेत म्युझिकल एक्झरसाइज मेडिटेशन तणावमुक्त तणावमुक्त जीवन शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दररोज दिव्य चैतन्य देखावे सादर करण्यात आले. यामध्ये स्वप्नाली गुंजाळ, श्रुती वायाळ, सान्वी हेलसकर, अहिल्या मोगल, हरिप्रिया घांडगे, जिजाई मोगल, सारिका पवार, स्वरा चव्हाण आदींनी सहभाग घेतला. प्रास्ताविक सविता बहेन यांनी केले. सूत्रसंचालन सीमा बहेन यांनी केले.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्माकुमारी सविता बहेन, सीमा बहेन, शांता बहेन, नंदा बहेन, अर्चना बहेन, सरिता बहेन, शारदा बहेन, योगिता बहेन, वैष्णवी बहेन, वैशाली बहेन, सीमा बहेन, प्रणिता बहेन, राधा बहेन, शिल्पा बहेन, रेखा बहेन, रूपा बहेन, सारिका बहेन, श्रुती बहेन, रूपाली बहेध, जया बहेध, सोनू बहेन, श्रुती बहेन आदींसह ब्रह्माकुमारी परिवाराने परिश्रम घेतले. महोत्सवाला विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच महिला, पुरूष भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मयत शिक्षकाच्या पत्नीला विम्याचा २५ लाखांचा धनादेश

**जिंतूर,/प्रतिनिधी-**तालुक्यातील वस्सा येथील महात्मा फुले विद्यालयातील शिक्षक रमेश माणिकराव क्षीरसागर यांचा अपघाती मृत्यू झाल्याने जिल्हा बँकेच्या वतीने मयत शिक्षकाच्या पत्नीला २५ लाखांचा शिक्षक अपघाती विम्याचा धनादेश नुकताच प्रदान करण्यात आला.

रमेश माणिकराव क्षीरसागर हे २१ जून २०२४ रोजी घरातील तिसऱ्या मजल्यावरील पिण्याच्या पाण्याची टाकी स्वच्छ करत असताना पाय घसरून खाली पडले. त्यातच त्यांचा अपघाती मृत्यू झाला. मयत शिक्षक रमेश क्षीरसागर यांचे वेतन जिल्हा बँकेच्या वस्सा शाखेतून होत होते. जिल्हा बँकेने शिक्षकांना अपघाती विम्याचे संरक्षण दिले आहे. यामुळे अपघाती निधन झालेल्या मयत शिक्षकाच्या पत्नी मंजूषा रमेश क्षीरसागर यांना जिंतूर येथे विशेष कार्यक्रमात मीनाताई बोर्डीकर, जिल्हा बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुरुंदकर, मंगेश फुलारी, फुटाणे, कराळे, सरोदे यांच्या हस्ते २५ लाखांचा अपघाती विम्याचा धनादेश देण्यात आला. मुख्याध्यापक सुरेश तावडे, उमेश सावळकर, महेंद्रकुमार तपोवनकर, वस्साचे शाखाधिकारी अंबादास ढोकर, कर्ज अधिकारी महेश देशमुख यांची उपस्थिती होती.



## पूर्णेत २२ व्या बौद्ध धम्म परिषदेची उत्साहात सांगता

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णेत दोन दिवशीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्या निमिताने १ फेब्रुवारी रोजी दक्षिण कोरिया च्या भन्तेची धनगर टाकळी येथे उपसंपदा शांती नगर येथे धम्म ध्वजारोहण,डॉ आंबेडकर नगर येथे भोजनदान बौद्ध महिलेची धम्म दिक्षा दक्षिण कोरिया भन्तेना डॉ. बाबासाहेबांना अर्धाकृती पुतळ्याची भेट व भिक्खु संघाची धम्मदेशना धम्म परिषदेत विविध ठराव समंत अशा विविध कार्यक्रम देश विदेश सह महाराष्ट्रातील भिक्खु संघ बौद्ध उपासक उपासिकां उपस्थितीत २२ बौद्ध धम्म परिषदेची सांगता झाली.

यामध्ये दक्षिण कोरिया च्या भन्ते उपगुप्त महाथेरो यांच्या हस्ते सकाळी ९ वा उपसंपदा विधी गोदावरी नदीच्या बेटा वर मुख्य भिक्खु संघाच्या उपस्थितीत विधी पार पडला शहरातील शांतीनगर येथे भदंत शरणानंद महाथेरो यांच्या धम्म ध्वजारोहण करण्यात आले दुपारी डॉ आंबेडकर नगर येथे नगर सेवक उत्तम खंदारे यांच्या निवासस्थानी भिक्खु संघाला भोजनदान देण्यात आले. दु २ वा. धम्म परिषदेला अभिवादन त्रिशरण पंचशिल ग्रहण करून धम्मदेशना देण्यात आली त्या नंतर हिमायत नांदेड येथील मुस्लीम महिलेने बौद्ध धम्माची दिक्षा घेतली त्या महिलेला दिक्षा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. शहरातील शाहीर संभा गाय गोधने त्यांची कन्या सुकेशनी गोधने यांच्या कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धा कृती पुतळा दक्षिण कोरिया च्या भिक्खु संघाला भेट देण्यात आली भिक्खु संघाची धम्मदेशना संपन्न प्रकाश कांबळे यांनी विविध ठराव मांडले धम्म परिषदेची सांगता राष्ट्रगीताने संपन्न झाली. सुत्र संचलन डॉ.उपगुप्त महाथेरो आभार प्रदर्शन भन्ते बोधीधम्मा यांनी केले. धम्म परिषद यशस्वीतेकरिता भन्ते पंयावंश, प्रकाश कांबळे,त्र्यंबक कांबळे,राम भालेराव, अतूल गवळी,साहेबराव सोनवणे, किशोर ढाकरगे, अमृत कऱ्हाळे, विजय बगाटे ,प्रशांत भालेराव, श्रीकांत हिवाळे सेवानिवृत रेल्वे कर्मचारी भारतीय बौद्ध महासभा पदाधिकारी महिला मंडळाच्या पदाधिकारी सह दिलीप गायकवाड पी.जी. रणवीर आदिनी केले.



## सेलूच्या स्वस्तिचा राज्यपालांच्या हस्ते गौरव



### बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कूलच्या लौकिकात भर

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** राज्य सरकारच्या वतीने श्री भगवान महावीर स्वामी निर्वाण महोत्सव समितीतर्फे आयोजित महावीर स्वामी जीवन चरित्रावर आधारित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सेलू (जि.परभणी) येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्थेच्या बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी स्वस्ति जिनेशजी काला हीने २ लाख २२ हजार २२२ रूपयांचे रोख पारितोषिक मिळविले आहे. रविवारी, दोन फेब्रुवारी रोजी राजभवनात आयोजित कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते स्वस्तिचा रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

पारितोषिक वितरण सोहळ्याला कौशल्या विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार चैनसुखजी संचेती, ललितजी गांधी, हितेशभाई मोता आदींची प्रमुख उपस्थिती होती.

निबंध स्पर्धेत स्वस्ति काला हीने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला आहे. स्वस्तिचे पालक जिनेश प्रकाशचंदजी काला, पायल काला, विशाल सुभाषचंदजी काला, अनिता काला, प्रशासकीय अधिकारी भुजंग देऊळगावकर, शिक्षक अमोल जाधव यांची उपस्थिती होती. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम.लोया, उपाध्यक्ष डी.के.देशपांडे, सचिव प्राचार्य डॉ.व्ही.के.कोठेकर, सहसचिव जयप्रकाशजी बिहाणी, नंदकिशोरजी बाहेती, सीतारामजी मंत्री, दत्तराव पावडे, मकरंद दिग्रसकर, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, प्राचार्य एन.पी.पाटील, भुषण देऊळगावकर आदींसह विविधस्तरांतून अभिनंदन होत आहे.

# जलजीवन मिशनच्या कंत्रादारांचा सामुहीक काम बंदचा इशारा

## ग्रामीण पाणीपूरवठा विभागासमारे डफडे वाजवून आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**



जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या ६५० कामांना सन २०२१-२२ मध्ये आदेश निर्गमीत करण्यात आले. त्यामुळे डीएसआरही त्यावेळी बनविण्यात आले आ- हेत. परंतु सध्याचे दर लक्षात घेता सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता द्यावी तसेच मागील ८ महिन्यांपासून निधी उपलब्ध नसल्यामुळे कामे बंद पडण्याची वेळ आली आहे. कंत्राटदारांवर उपासमारीची वेळ आली आहे. तत्काळ कंत्राटदाराच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा सामुहीक काम बंद करण्याचा इशारा कंत्राटदार संघटनेच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या कामांना सन २०२१-२२ प्रमाणे डीएसआर काढण्यात आले. एकाचवेळी राज्यात ही कामे सुरू केल्यामुळे कंत्राटदारांना मजूरदार व मिस्त्री उपलब्ध झाले नाहीत. परिणामी कामे वेळेत पूर्ण झाली नाही. ग्रामीण पाणीपूरवठा विभागाने कंत्राटदारांना निधी देण्याऐवजी नोटीस बजावल्या आहेत. काही कंत्राटदारांनी युध्दपातळीवर कामे पूर्ण करून गावांमध्ये नळाद्वारे पाणीपूरवठा सुरू केला आहे. परंतु सद- रील पूर्ण कामांना देयके अदा करण्यासाठी ८ महिन्यांपासून कामांना विभागाकडे निधी उप- लब्ध न झाल्यामुळे कंत्राटदारांची देयके पाणी पुरवठा विभागामार्फत अदा करण्यात आलेली ना- हीत. त्यामुळे कंत्राटदारांवर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच सदरील योजना सन २०२१-२२ च्या डीएसआर प्रमाणे बनविण्यात आल्या आ- हेत व सद्यस्थितीत सन २०२४-२५ चा डीएसआरचे दर यापेक्षा खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. परंतु कंत्राटदाराच्या दरामधील तफावत अद्यापपर्यंत विभागामार्फत देण्यात आलेली नाही.

त्रयस्थ कंपनीने अंदाजपत्रक तयार करतांना चुकीचा सर्वे केला आहे. त्यामुळे ६५० पैकी ३५० पेक्षा जास्त गा- वात सुधारीत अंदाजपत्रक बनविण्याची नामुष्की विभागावर आलेली आहे. अद्यापपर्यंत एकाही कामाला सुधारीत अंदाजपत्रकानुसार शास- नाने मंजुरी देण्यात आलेली नाही. विभागाच्या चुकीमुळे कंत्राटदारांना कामे पूर्ण करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होत आहेत. अनेक योजनांच्या उद्‌भवास पाणी न लागल्यामुळे सुध्दा त्या गावात पाणीपूरवठा चालू करता आ- लेला नाही. वरिष्ठ अधिकारी याबाबत निर्णय घेण्यात सक्षम नाहीत. तत्काळ कंत्राटदारांच्या मागण्यांचा विचार प्रशासन आणि शासनाने गांभीर्याने करावा अन्यथा कंत्राटदार जलजीवन मिशनची कामे बंद करणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर संतोष घुगे, अविनाश पानपट्टे, संदीप पतंगे, सुरेश शेळके, अनंत गिरी, नामदेव कोरडे, विष्णू जगताप, ज्ञानेश्वर गरड, दिपक जैस्वाल, भागवत भोयर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# औंढ्यात रथ सप्तमीनिमित्त श्री नागनाथाच्या रथाची पूजा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**

दरवर्षीप्रमाणे नागनाथ मंदिरात महाशिवरात्री उत्सवाची तयारी मंगळवारपासून (ता.४) सुरवात झाली आहे.रथसप्तमीनिमित्ताने श्री नागनाथाच्या रथाची पूजा करुन मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात आली. मकर संक्रांतीनंतर येणारी सप्तमी म्हणजेच रथ सप्तमीनिमित्त श्रींच्या रथाची स्वच्छता करण्यात आली. रथाची पूजाअर्चा करून रथगृहातून रथ बाहेर काढण्यात आला. नागनाथ देवस्थानचे पदसिद्ध सल्लागार तथा आमदार संतोष बांगर व देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांच्या उपस्थितीत रथाची पूजा देवस्थानचे अध- ीक्षक वैजनाथ पवार व व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, मुख्य पुजारी शेखर भोपी व श्रीपाद भोपी यांनी केली. यावेळी मा. उपनगराध्यक्ष साहेबराव देशमुख, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य माधव गोरे, नागनाथ मंदिराचेगार्ड प्रमुख बबन सोनुने, पुरोहित कृष्णा ऋषी,दत्त मठाचे महंत शामगीरिजी महाराज, महंत सुरेश गीरीजी महाराज, दत्ता मठाचे उत्तराधिकारी राजेश गिरीजी महाराज, नगरसेवक मनोज देशमुख, नागेश माने, विजय देशमुख, राम प्रसाद उदगिरे, बाळू देशमुख, श्रीराम राठी बापूराव देशमुख धुरपत गोरे, नवनाथ देशमुख, मंगेश गुरव, मुकेश पडोळे, कृष्णा पाटील, दत्तात्रय शेगुकर, भोला देशमुख, जितेंद्र नेव्हल प्रशांत स्वामी, प्रवीण कोकडवार, भगवान भोजे, राजू वाकुडे, तुकाराम भांडे, भगवान शिंदे, देशमुख रवी पवार, पद्माक्ष पाठक, महेश जोशी, अभिजित लोखंडे, गणेश जगताप, संजय मोरे नितीन देशमुख यांच्यासह मंदिरातील पुजारी, पुरोहित देवस्थानचे कर्मचारी व शिवभक्त उपस्थित होते.

# भारतीय राज्य घटनेमुळे देशाची प्रगती- प्रा सुधाकर इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**




येथील आदर्श महाविद्यालयाच्या रासेयो शिबिर च्या बौद्धिक कार्यक्रमात बोल- ताना प्रा. सुधाकर इंगोले यांनी भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे या विषयावर त्यांनी सांगितले कि देशाची प्रगती करण्यात व देश एकसंध ठेवण्यात भारतीय राज्यघटना महत्त्वाची आहे. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की जगाचा अभ्यास करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमामधून भारताला सर्वसम ावेशक अशी राज्यघटना दिली आणि ही राज्यघटना आपल्या विविधता असलेल्या देशासाठी व एकसंघतेसाठी आवश्यक असून या घटनेचे संरक्षण करणे ही प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे व प्रत्येकाने याप्रमाणे वागले पाहिजे. यावेळी प्रा. डॉ. एस.डी. चव्हाण यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर प्रा. डॉ. बी.बी. लक्षट्टे यांनी डिजिटल साक्षरता या विषयावर विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन केले. शिबिराची सुरुवात प्रा. डॉक्टर बी.टी. राठोड यांच्या योगाने झाली तर सायंकाळी प्रवीण रुईकर व बबन दांडेकर यांनी आपल्या बहारदार गायनांमधून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. यप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. विलास आघाव सर हे उपस्थित होते. आज विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता करीत श्रमसंस्काराचे धडे घेतले शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. सचिन हाटकर, डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा. सुरेश वऱ्हाड, प्रा. बीटी राठोड श्री दुर्गादास टापरे, श्री जावेद शेख व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. तसेच यावेळी चिं- चोलीचे ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित राहून आयोजकांचे मनोबल वाढवीत आहेत.



**हिंगोली- शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने अकरा तारखेपासून शिवजन्मोत्सव सोहळा प्रारंभ होणार असून यानिमित्त येथील शासकीय विश्रामगृहाशेजारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती परिसरात रंगरंगोटी तसेच सुशोभिकरणाचे काम करण्यात येत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### युवकांच्या मनातून अंधश्रध्दा काढा- मगरे

हिंगोली- चिंचोली येथे आदर्श महाविद्यालय हिंगोलीच्या रासेयो वार्षिक शिबिरात ते मार्गदर्शन करताना ते बोलताना म्हणाले कि भारतात अंधश्रद्धा बोकाळल्या असुन. देव धर्म यांच्या नावाने लोक समाजाची दिशाभुल करतात. देव मानण्यास कोणालाही बंधनकारक नाही. परंतु देवाच्या नावाने अंगात येणे, शोषण करणे हे कायदा विरोधी आहे. भुत पिशाच्च या संकल्पना खोट्या असुन. यातुन सुटका करणे गरजेचे आहे. चमत्कार करून लोकांना फसवणे. हात चलाखी करून ते फसवतात त्यासाठी युवकांनी जागृत राहणे व लोकांना यापासून वाचवणे गरजेचे आहे असे आवाहन कले. यानंतर त्यांनी सापाविषयी समज- गैरसमज यावर प्रात्यक्षिकासह समजून सांगितले. दुपारच्या सत्रामध्ये प्रा. जी.पी. चव्हाण यांनी भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षे या विषयावर मार्गदर्शन केले. राज्यघटना निर्मिती मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान यावर त्यांनी प्रकाश टाकला. प्रा. सोपान खरात यांनी मशरूम शेतीचे फायदे या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिबिराची सुरवात योग साधनेने झाली. प्रा. राठोड यांनी विद्यार्थ्यांना योग साधनेचे धडे दिले. तसेच विद्यार्थ्यांनी धम्मदेस या विपश्यना केंद्रामध्ये ध्यानधारणा केली. या शिबिरासाठी डॉ. हाटकर, डॉ. हापगुंडे, प्रा. व-हाड, श्री. टापरे, श्री.शेख परिश्रम घेत आहेत.

### औंढ्यात कर्मचाऱ्यांना शंभर दिवसांचे उद्दीष्ट



औंढा नागनाथ- येथील तहसील कार्यालयात तहसीलदार हरिष गाडे यांनी सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यमंत्री यांनी शंभर दिवसांचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील सर्व प्रशासकीय अधिकारी व यंत्रणा यांना दिले आहे, त्या निर्देशानुसार तह- सीलदार हरिष गाडे यांनी आपले अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना बैठक घेऊन सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शन केले आहे.तसेच सात कलमी कार्यक्रम नियमितपणे राबविण्यात येणार आहे त्यामुळे कोणीही कुचराई करता कामा नये असे ही ठणकावून सांगितले आहे. यावेळी निवडणूक नायब तहसी- लदार वैजनाथ भालेराव ,ना तह लता लाखाडे,ना तह अनिता कोलगने, सर्व सहायक महसूल अधिकारी श्रीकृष्ण दराडे, संगिता डोंगरे,महसूल सहायक भास्कर खंदारे, शेख हमीद, संजय पाटील, शेख सलीम, महेश हिवरे, उकंडी मारकड, नितेश कुलकर्णी, आनंद दातार, शिपाई नामदेव घोणे आदींची उपस्थिती होती.

# हिंगोलीत अकरा फेब्रुवारीपासून शिवजन्मोत्सव सोहळा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती म होत्सव समिती हिंगोलीच्या वतीने शिवजन्मोत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. या अनुषंगाने यंदा नऊ दिवशीय शिवजन्मोत्सव आयोजित करण्यात आला असुन दि.११ फेब्रुवारी रोजी शिवजन्म ोत्सवाच्या विविध कार्यक्रम, स्पर्धा यासह उपक्रमाला सुरुवात होणार आहे.

सार्वजनिक शिवजयंती म होत्सव समिती हिंगोली च्या वतीने शिवजन्मोत्सव २०२५ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाला मंगळवार दि.११ फेब्रुवारी रोजी सुरुव- ात होणार असुन शिवचरित्रावर आधारित ऑनलाईन परिक्षा, याच दिवशी क्रिकेट लीग सामने शहरातील रामलिला मैदानावर सकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आले आहेत. बुधवार दि.१२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या क्रिडांगणात व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि.१२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात शिवचरित्रावर आधारित ऐतिहासिक छायाचित्राच्या प्रदर्शनचे उद्घाटन होणार आहे. गुरुवार दि.१३ फेब्रुवारी रोजी स्व.ऍड.पंडितराव देशमुख क्रीडा संकुल अकोला रोड येथे सायंकाळी ६.३० वाजता लॉन टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि.१६ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिव- ाजी महाराज पुर्णाकृती परिसरात लाईव्ह वर्कआऊट व आहार मार्गदर्शन शिबिर पहाटे ५ वाजता आयोजित करण्यात आले आहे. दि.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता शिवचरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धा स्टडी गुरुकुल हिंगोली येथे आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा संकुल लिंबाळा येथे दि.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि.१६ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात सकाळी ९.०० वैयक्तिक नृत्य(बाल व खुला गट) व समुह नृत्य(खुला गट) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी सायंकाळी ७ वाजता शिवविचार पिठावर तुफान विन- ोदी कार्यक्रम मिर्झा एक्सप्रेसचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता वेशभुषा, अभिनय स्पर्धा(बाल, खुला गट) व गायन स्पर्धा(खुला गट), छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात आयोजित करण्यात आली आहे. दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शिवविचार पिठावर वक्तृत्व स्पर्धा तर महिलांसाठी रांगोळी स्पर्धा सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे. दि.१८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात भव्य दिपोत्सव आयोजित करण्यात आला आहे. तर रात्रीला सायंकाळी ७ वाजता तिन दिवशीय सांस्कृतिक स्पर्धेचा सम ारोप विजेत्यांच्या सादरीकरणाने होणार आहे.

शिवजन्मोत्सव दिवस दि.१९ फेब्रुवारी रोजी दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन यामध्ये पहाटे सहा वाजता शिवअभिषेक, सकाळी ७ वाजता ध्वजारोहण, सकाळी ८ वाजता शिवपाळणा, शिवपुजन व शिवगजर, सकाळी १० वाजता भव्य रक्तदान शिबिर, छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात आयोजित करण्यात आले आहे. विशेष आकर्षण असलेल्या भव्य मिरवणुक व शोभायात्रेची सुरुवात सकाळी ११ वाजता होणार असुन याम ध्ये शिवज्योत, मावळयांसह घोडदळ, वारकरी मंडळी, रथ, वारकरी महिला, शिवशंभो ढोल पथक, लेझिम पथक, लाठीकाठी, तलवारबाजी, पारंपारिक बंजारा/आदिवासी वेशभुषा नृत्य, चलचित्र दे- खावा, बॅन्ड पथक व युवक याचा समावेश राहणार आहे. शिवविचार पिठावर दुपारी ३ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत शिवछत्रपती गौरव पुरस्कार व बक्षीस वितरण सोहळा संपन्न होणार आहे. सायंकाळी ६ वाजता भव्य अतिषबाजी व दिपोत्सव होणार असुन रात्री ७ वाजता छत्रपती संभाजी नगर येथील प्रसिद्ध शिवशाहिर सुरेश जाधव यांचा शाहिरी जलसा, शिवगितांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. यासह विविध उपक्रम आयोजित करण्यात आले असुन संपुर्ण शिवजन्मोत्सव- ात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष ऍड. उल्हास पाटील, कार्याध्यक्ष बिरजु यादव, सचिव सागर डांगे व समि ती पदाधिकार्यांनी केले आहे.

# घोडा ग्रामपंचायतीवरील अन्याय दूर करण्याची ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ फेब्रुवारी**



कळमनुरी तालुक्यातील घोडा ग्रामपंचायतीवर २०२२ मध्ये ग्रामस्थांनी येथील सुशिक्षित बेरोजगारांना निवडून दिले परंतु येथील विरोधी राजकीय मातब्बर वारंवार ग्रामपंचायत कामांमध्ये अडचणी निर्माण करीत आहेत. त्यांना संबंधित कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारीही साथ देत असल्या कारणाने ग्रामपंचायतीवर अन्याय होत आहे, असे निवेदन ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केले आहे. घोडा येथील ग्रामपंचायतीवर ग्रामस्थांनी माजी विरोधकांना धोबीपछाड करीत तरूणांना विजयी केले तेव्हापासून गाव- ातील विरोधक ग्रामपंचायतीच्या कामांमध्ये तसेच इतर कामांमध्ये त्यांच्या राजकीय शक्तीचा वापर करीत अडचणी निर्माण करीत आहेत. १५ वर्षापासून विरोधकांचे शासकीय कार्यालयाशी हितसंबंध आहेत. त्यामुळे संबंधीत अधिकारी व कर्मचारी त्यांना साथ देत आहेत आणि अडथळे निर्माण करीत आहेत. अशांना वेळीच समज द्यावी तसेच सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांचेही कुठलेही अतिक्रमण नसतांना विनाकारण आरोप करणे, रोजग- ार सेवक व संगणक ऑपरेटर यांना काम करण्यासाठी आयडी देणे, माजी ग्रामपंचायत सदस्य, माजी उपसरपंच, माजी सरपंच यांचे नातेवाईकांनी केलेल्या अतिक्रमणांची चौकशी करणे आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदनावर साहेबराव पतंगे, राजेश देशमुख, सोनबा पतंगे, तुकाराम पतंगे, मंगेश धोतरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोली रेल्वे स्थानकावर जनरल तिकीटासाठी क्यूआर कोड सुविधा




**हिंगोली, ४ फेब्रुवारी :** येथील रेल्वे स्थानकावर सोमवार दि ४ फेब्रुवारीपासून प्लॅट फार्म क्रमांक दोनवर तिकीट खिडकीत क्युआर कोडद्वारे अनारक्षित जनरल व प्लॅटफार्म तिकीट खरेदीची सुविधा सुरू करण्यात आली आहे.

नांदेड विभागातील प्रवाशांना प्रवास सुकर व्हावा तसेच तिकीटासाठी रांगेत उभे राहण्याचे काम पडू नये यासाठी रेल्वे विभागाने ७० ठिकाणी क्यूआर कोड सुविधा उपलब्ध केली आहे. हिंगोलीत पहिल्याच दिवशी दुपारी एक वाजेपर्यंत सुमारे दीडशे प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घेतला असल्याचे बुकींग कर्मचारी स्वप्नील डांगे यांनी सांगितले. दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अरूणकुमार जैन आणि डीआरएम निती सरकर यांनी तिकीट खरेदीसाठी क्युआर कोडचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. डिजीटल पेमेंटमुळे सुट्या पैशाची अडचणही निर्माण होणार नाही तसेच प्रवाशांना तत्काळ तिकीट उपलब्ध होणार असल्यामुळे या सुविधेला चांगला प्रतिसाद मिळणार आहे. वाशिम, हिंगोली, वसमत स्थानकावर क्युआर कोडची सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेबद्दल रेल्वे प्रशासनाचे अभिनंदन करून मोबाईल द्वारे जनरल तिकीट खरेदीसाठी हिंगोली रेल्वे स्थानकावरील प्लॅटफार्म क्रमांक एकवर सुध्दा क्युआर कोडची सुविधा सुरू करावी अशी मागणी प्रवासी संघटनेचे अध्यक्ष धरमचंद बडेरा, जेठानंद नैनवाणी, चंद्रशेखर निलावार, गणेश साहू, डॉ विजय निलावार, प्रवीण पडघन, भरतलाल साहू आदींनी केली आहे.

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करण्यास मदत करते.




अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.



UIN-MP 1724

स्वस्थ पाचन, स्वस्थ जीवन

वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co

# छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# वाहतूक कोंडी सुटणार कधी?

## संभाजी नगरला भेडसावणारी मोठी समस्या

**समीर पाठक**
**छत्रपती संभाजी नगर, दि. १-**



आशिया खंडामध्ये सर्वा वेगाने वाढणारे शहर म्हणू छत्रपती संभाजीनगरचा उल्ले ऐंशीच्या दशकापासून करण्या येत आहे. संपूर्ण मराठवाड्यातू शिक्षण, व्यवसाय, नोकरी अश विविध कारणे लोक छत्रपत संभाजीनगर इथे वास्तवासाठ येत असल्याने वाहनांच संख्याही वेगाने वाढत आहे मात्र शहरवासीयांना सातत्या भेडसावणारी वाहतुकीच्या कोंडीची समस्या सुटणार कधी, हा सवाल नागरिक करत असून यासाठी ठोस उपाय योजना करण्याची मागणी होत आहे.

संभाजी नगर शहराच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत असून लोकांचे राहणीमान उंचावले आहे. दुचाकी अथवा चारचाकी वाहनांची खरेदी करणे आता सोपे झाले आहे. या सर्व कारणांनी वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे . वाहनाच्या संख्येच्या तुलनेने रस्त्यांची संख्या अपुरी आहे किंबहुना हे प्रमाण व्यस्त अस आहे.

वाहतुकीचे नियम न पाळणे, ठोस कारण नसतानाही विरुद्ध बाजूने वाहन पुढे नेणे. अश्या अनेक कारणांनी पुणे मुंबई सारख्या महानगरांला भेडसावणारी वाहतूकीची कोंडी ही समस्या आता छत्रपती संभाजीनगर मध्ये देखील आढळून येत आहे. सकाळच्या आणि संध्याकाळच्या वेळेत तर ही समस्या हमखास आढळून येत आहे. वेळ प्रसंगी रुग्णवाहिकांना देखील जायला कधी कधी जागा मिळत नाही इतक्या व्यापक स्वरूपात ही समस्या भेडसावत आहे. वाहतूक कोंडीमुळे वेळ, श्रम

## ठोस उपाय योजनांची गरज

दोन्ही खर्च होतात पण मानसिक आणि शारीरिक त्रासाचाही सहन करावा लागतो आहे. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस हे प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत दिवस रात्र ते आपले कर्तव्य बजावत आहेत तरी देखील वाहतूक कोंडी समस्या उद्भवत आहे. वाहतूक कोंडीने निर्माण झालेला ताण -तणाव याचे रूपांतर अनेकदा वाद भांडणात होत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी स्वयंशिस्त ही महत्त्वाची आहे. आता ही समस्या व्यापक झाली आहे.


### वाहतुकीच्या कोंडीचे कारणे

**(१) रस्त्यावरील अतिक्रमणे- कारण नसताना रस्त्यावर वाहन उभी करणे, टपरी, छोट्या खाद्यपदार्थाचे दुकान रस्त्यावर थाटणे, यामुळे रस्त्यावर अतिक्रमणाची समस्या होत आहे.**

**(२) रस्त्याची रुंदी न वाढणे- शहरातील रस्त्यांची सातत्याने वाहतूकीची कोंडीचा अनुभव वाहनधारकांना करावा लागतो.**

**(३) वाहतुकीचे नियम - वाहतूक नियम न पाळणे आणि स्वयंशिस्तीचा अभाव यामुळे देखील वाहतूक कोंडीचा सामना अनेकदा करावा लागतो.**

## गरिबांचा फ्रिज बाजारात...



गरिबांचा फ्रिज अशी ओळख असलेल्या पारंपारिक आणि नैसर्गिक पध्दतीने बनवलेल्या माठाच्या खरेदीकडे छत्रपती संभाजीनगरकरांचा कल वाढत असताना दिसून येत आहे. बाजारात मोठ्या प्रमाणात माठ, रांजण, सुरई विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

# गणेश जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२-**



माघ महिन्यातील शुक्ल चतुर्थीला गणेश जयंती सर्वत्र साजरी करण्यात येते. छत्रपती संभाजीनगर येथेही बुद्धीची देवता गणरायाच्या जयंती निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सिडको एन-वन परिसरातील श्री भक्ती ट्रस्टच्यावतीने गणेश जयंतीच्या पूर्वसंध्येला सहस्त्र मोदकाचे हवन करण्यात आले. अथर्वशीर्ष पठण, महाआरती करण्यात आली. श्री गणेश जयंतीच्या निमित्त समर्थ नगर परिसरातील श्री गणेश सभेच्या वतीने श्री वरद गणेश मंदिरात शुक्रवारी श्री गणेश महापूजन करण्यात आले.

२१ जोडप्यांनी १०८ अवर्तन पूर्ण केली. दुपारी बारा वाजता श्री गणेशांचा जन्म व आरती करण्यात आली. छत्रपती संभाजी नगर येथील ग्रामदैवत असलेल्या संस्थान गणपती मंदिरासमोर होमहवन, महाआरती करण्यात आली. महाआरतीला पालकमंत्री संजय शिरसाठ, शिवसेनेत नव्याने दाखल झालेले माजी महापौर नंदकुमार घोडेले, जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्थान गणपती मंदिरातील श्री गणेशाच्या मूर्तीला सुवर्ण अलंकारांनी सजवण्यात आले असून संध्याकाळी ५६ भोगाचा महाप्रसाद भाविकांना वितरित करण्यात आला.

छत्रपती संभाजी नगर येथील अनेक गणेश मंदिरामध्ये महाआरती तसेच गणपती अथर्वशीर्ष पठणात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मराठवाड्याला समन्यायी पद्धतीने पाणी मिळावे

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२-**

मराठवाड्याला समन्यायी पद्धतीने पाणी मिळावे, यासाठी मराठवाड्यातील जनप्रतिनिधींनी एकत्र येऊन लढा द्यावा. अशी मागणी जलतज्ञांनी व्यक्त केली.

छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा जलसमृद्धी प्रतिष्ठान, टीम ऑफ असोसिएशन, मसिया संघटना, साखर कारखाने व शेतकरी सहकारी पाणी वाटप संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पाणी प्रश्न आणि सिंचन विकास या विषयावर एकदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आलं होते.

मसिया संघटनेंच्या सभागृहात भरवण्यात आलेल्या या परिषदेला पालकमंत्री संजय शिरसाठ, आमदार प्रशांत बंब, रमेश बोरनारे, अनुराधा चव्हाण यांच्यासह आमदार कैलास पाटील, माजी मंत्री राजेश टोपे यांची प्रमुख उपस्थिती होती. जलतज्ञ शंकरराव नागरे, जल अभ्यासक जयसिंग हिरे, अतुल चव्हाण, महेंद्र वडगावकर यांनी मराठवाड्याचे हक्काचे पाणी कशाप्रकारे पळवले जात आहे. यावर सविस्तर मार्गदर्शन केले. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळवण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे, अशी अपेक्षा सर्वच जलतज्ज्ञांनी या परिषदेत व्यक्त केली.

### तंटा न करता समस्या सुटेल

**मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळण्यासाठी निर्माण झालेली ही समस्या भांडण - तंटा न करता देखील सोडवता येऊ शकतो. कोकणातून सह्याद्री पर्वतरांगेपर्यंत बंद पाईपने पाणी आणणे सहज शक्य आहे. एक बोगदा फक्त निर्माण करावा लागेल आणि यातून जलविद्युत प्रकल्प देखील उभारता येईल.**
**अतुल चव्हाण, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग**

# महोत्सवात चार एकांकिका सादर

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कला सादरीकरण विभागाच्या ४९ व्या एकांकिका महोत्सवात चार दिवसात एकुण १३ एकांकिका सादर होणार असून दुसऱ्या दिवशी चार एकांकिका सादर झाल्या. या एकांकिकेला रसिकांनी उत्फुर्त दाद दिली.

प्रारंभी संदीप पाटील लिखीत व साधना विठोरे दिग्दर्शीत 'फुलन ही एकांकिका सादर झाली. फुलन ही एका मुलीची गोष्ट आहे. त्याचबरोबर ती व्यवस्थेची गोष्ट आहे. व्यवस्था सत्य लपवून ठेवण्यासाठी कुठल्या थराला जाऊ शकते हे यातून सांगितलं आहे. यामधे एक मुलगी जी एका गुन्ह्याची साक्षीदार आहे. तिलाच त्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न केला जातो यावर भाष्य आहे. यानंतर दुसरी एकांकिका प्रा. डॉ. दासू वैद्य लिखीत व गणेश शिर्के दिग्दर्शीत 'देता आधार की करू अंधार सादर झाली. जोपर्यंत आपण आपल्या माणसाला आधार देत नाहीत तो पर्यन्त आपल्याला कोणीच आधार देणार नाही या गाव व शहर या द्वंदात फसलेल्या कलाकारांच्या समस्यांवर भाश्य करणारी व शेवटी सकारात्मकता दर्शवणारी एकांकिका सादर झाली. मंटोच्या कथेवर आधारीत अख्तर अली लिखीत व सय्यद एजास दिग्दर्शीत तिसरी एकांकिका बादशाहत का खात्मा ही हिंदी एकांकिका सादर झाली.

एका संवेदनशील लेखकाला फोन संभाषणाद्वारे अनोळख्या स्त्रीशी झालेले प्रेम आणि फोन संभाषणाच्या अतिरेकातून त्याचा झालेला करुण अंत यावर एकांकिकेत भाष्य करण्यात आले. अरविंद जगताप लिखित व रसिका भात खेडेकर दिग्दर्शित झाल्या तिन्ही सांजा ही चौथी एकांकिका सादर झाली. प्रेम, लग्न, ग्रामीण व शहरी भाग यांतील अंतर, संघर्ष, सुख- दुःख यावर भाष्य करणारी ही एकांकिका होती.

कला सादरीकरण विभागाच्या पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठीचा परीक्षेचा भाग असलेला हा एकांकिका महोत्सव असतो हे विशेष. यावेळी विभाग प्रमुख डॉ. वैशाली बोदेले, प्रा. स्मिता साबळे, प्रा. गजानन दांडगे, डॉ. सुनील टाक, डॉ. रामदास ठोके यांच्यासह विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.




# पाण्याचा लढा यश मिळेपर्यंत लढणे आवश्यकः नागरे

## जलसंवाद चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२-**

जायकवाडीला हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे. हा प्रश्न सोडवणे अगत्याचे आहे. हा लढा स्वकीयांबरोबर आहे. यश मिळेपर्यंत हा लढा आवश्यक आहे, असे प्रतिपादन जलतज्ज्ञ डॉ. एस.ए. नागरे यांनी केले.

मराठवाडा पाणी प्रश्ना संबंधी जलसंवाद २०२५ मध्ये आयोजित चर्चासत्रात डॉ. नागरे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. नागरे म्हणाले, एक ध्येयाने, एकजुटीने सगळ्यानी यात सहभागी व्हावे. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असतांना जल आराखडा तयार महत्त्वपूर्ण निर्णय झाले. कोकणातून मराठवाड्याला पाणी यावे यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या तालुकावार नियोजन करावे, मुख्य अभियंता नदीजोड प्रकल्प हे कार्यालय छत्रपती संभाजीनगर इथे स्थापन करावे, दमणगंगा-गोदावरी यासारख्या योजना कार्यान्वित व्हाव्यात, सिंचन अनुशेष निधी मराठवाड्याला द्यावा, कृष्णा खोऱ्यातील २५ टी एम सी पाणी द्यावे, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ कार्यालय स्थापन व्हावे, या सर्व मागण्या लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे कराव्यात असेही त्यांनी सांगितले

यावेळी मराठवाड्यातील अनेक

# भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार चव्हाण यांचा आज सत्कार समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२-**



भारतीय जनता पार्टीच्या कार्यकारी अध्यक्ष म्हणून नुकतीच माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती नियुक्ती झाली आहे या नियुक्तीनंतर ते पहिल्यांदाच सोमवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजी नगर शहरात येत आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या विभागीय कार्यालयात त्यांचा भारतीय जनता पार्टीच्यावतीने चव्हाण यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी संभाजी नगरमधील विविध पक्षातील काही पदाधिकारी आमदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षांमध्ये प्रवेश करणार आहेत. तरी या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर यांनी आवाहन केले आहे. यावेळी पक्षातील सभासद नोंदवणी तसेच इतर कामांचा आढावा घेतला जाणार आहे. यावेळी जिल्हयातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



# महानगरपालिकेच्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे बक्षीस वितरण

## बीडच्या नवस एकांकिने पटकावला करंडक

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२-**



छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेतर्फे आयोजित छत्रपती संभाजी महाराज करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत बीडच्या नवस या एकेकांकिने करंडक पटकावला.

महानगर पालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून या एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले होते. २७ ते ३० जानेवारी दरम्यान अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, संतोष वाहुळे व उप आयुक्त लखीचंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत २० एकापेक्षा एक दर्जेदार एकांकिका सादर झाल्या होत्या. यात पुढील प्रमाणे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रथम बीडच्या प्रगती सेवा भावी संस्थेच्या नवस एकांकिकेला, द्वितीय पारितोषिक छत्रपती संभाजीनगर येथील नाट्यवाडा संस्थेच्या 'अल्पभूधारक'ने, तिसरे बक्षीस गेवराई येथील बागवान संस्थेच्या 'लेखकांचा कुत्रा' या एकांकिकेने पटकावले.

उत्तेजनार्थ पारितोषिक स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या शहाजी आणि रंगफौज संस्थेच्या लास्ट बॅटल एकांकिकेला देण्यात आले. यासह **दिग्दर्शनः** प्रथम पुरस्कार 'नवस'च्या संतोष पैठणे यांना तर द्वितीय 'लास्ट बॅटल'च्या साधना विटोरे आणि तृतीय पुरस्कार 'शहाजी'च्या धनंजय जीवन यांना देण्यात आला.

**लेखनः** प्रथम पुरस्कार गोपाळ वाघमारे (अल्पभूधारक), द्वितीय फिरोज काझी (सन्माननीय षंढांनो), तृतीय पुरस्कार रामेश्वर झिंजूर्डे (फाटा), **अभिनय (पुरुष):** प्रथम सिद्धेश्वर थोरात (लेखकाचा कुत्रा), द्वितीय स्वप्नील घोडेराव (अल्पभूधारक), तृतीय गौरव फुलारे (शोषित), **अभिनय (महिला):** प्रथम मंदा जाधव (नवस), द्वितीय मंजू गंगावणे (नवस), तृतीय मृणाल पंतोजी (रंगवास्तू)

**संगीतः** प्रथम पांडुरंग शिनगारे (लास्ट बॅटल), द्वितीय अंशुमन पर्वतकर (रंगवास्तू), तृतीय हरिओम जैस्वाल (फाटा), **नेपथ्यः** प्रथम ऋषिकेश रत्नपारखी, भूषण ढोबळे (नवस), द्वितीय सचिन तायडे (लेखकाचा कुत्रा), तृतीय विजय क्षीरसागर (फिर भी प्यारी है), **प्रकाश योजनाः** प्रथम बाळू बटले (लास्ट बॅटल), द्वितीय रोशनी वाघमारे (शहाजी), तृतीय वाल्मिक जाधव (सन्माननीय षंढांनो), **रंगभूषाः** प्रथम कविता दिवेकर (लास्ट बॅटल), द्वितीय अनिता शिंदे (मी मुलगी आहे म्हणून), तृतीय अमृता ठाकूर (वर्गणी), **वेशभूषाः** प्रथम कविता दिवेकर (लास्ट बॅटल), द्वितीय मानसी जाधव (नवस), तृतीय केशव कांदे (सन्माननीय षंढांनो). स्पर्धाचे परीक्षक म्हणून प्रा, दिलीप महालिंगे, डॉ. जितेंद्र पानपाटील, अनिल हिवाळे यांनी काम पाहिले. **भाऊसाहेब जाधव,विजय निकाळजे, हुसेन खान, सुनील जैस्वाल, निखिल गायकवाड, अभिजित जहागीरदार व श्रेयस भार साखले यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू यांनी केले. आभार हंसराज बन्सवाल यांनी मानले.**

### ढोल ताशांच्या गजरात करंडकाचे आगमन

**महानगरपालिकेच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे बक्षीस वितरण अविस्मरणीय पद्धतीने साजरा झाला. छत्रपती संभाजी महाराज करंडक ढोल ताशांच्या गजरात तुतारीच्या निनादात पालखीत छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जय घोषात रंग मंचावर आणण्यात आला. भालदार चोपदार यांनी रंग मंचावर असलेल्या छत्रपतींच्या पुतळ्यास मुजरा करून हे मानाचे स्मृतिचिन्ह बक्षीस वितरणासाठी ठेवण्यात आले. यामुळे सर्वांना स्फुरण चढले होते. या नंतर अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते विजेत्या संघाला हा छत्रपती संभाजी महाराज करंडक, प्रमाणपत्र व पुरस्काराची रक्कम ३१००० रूपये प्रदान करण्यात आली. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख लखीचंद चव्हाण यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य अधिकारी शंभू विश्वासू, परिक्षकगण दिलीप महालिंगे, डॉ. जितेंद्र पानपाटील, अनिल हिवाळे, हंसराज बन्सवाल आदींची उपस्थिती होती.**

# आकांक्षा

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# सहवासातील आनंद



सहवासाचे चांदणे फुलवून रेवाचे आनंदाचे झाड चांगलेच बहरले. तिच्या प्रसन्नतेचे, सळसळत्या उत्साहाचे गुपित तिने नकळत सुरू केलेल्या समाजसेवेत आहे. त्याला ती समाजसेवेचं लेबल चिकटवायला मुळीच तयार नाही इतकी तिच्या जगण्यात सहजता आहे, याचे विशालला भारी अप्रूप ! 'इसी बात पे वो रेवा पे फिदा हैं' आणि तिच्या सहवासात राहून आनंदाच्या बागेतील फुल होऊ पाहतोय.

रेवा खरं तर एका सधन कुटुंबातील सरळमार्गी मुलगी! घरी आज्जी, आईबाबा आणि ती असं छान कुटुंब! संवेदनशील मनाच्या रेवाला आपल्या आजीचे एकटेपण जाणवायचे. तिला जसा जमेल तसा वेळ काढून ती आजीला आनंदी ठेवण्यासाठी धडपडायची. त्यातूनच, आज्जी नातीचे नाते अधिकच घट्ट होऊन, त्यांच्या घरात आनंदाची कारंजी थुई थुई नाचायची. स्पर्धा परीक्षेत सुयश मिळवून रेवा बँकेत नोकरीला लागली. पहिल्या पगारात तिने सगळ्यांना कपडे घेतले, आज्जीसाठी तिच्या आवडीच्या डाळिंबी रंगाची साडी घेतली. मस्तपैकी पार्टी, जणू घरी दिवाळीच! तो आनंदाचा ठेवा हृदयकुपीत ठेवून आजीने अचानक आपली इहलोकीची यात्रा संपवली. रेवाला दुःखातून बाहेर पडायला नवीन काहीतरी शोधावेसे वाटत होते पण, काही सुचत नव्हतं. असंच एक दिवस बँकेतून आल्यावर आईसोबत जुने अल्बम बघताना तिला तिचे एनएसएसच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून, वृद्धाश्रमास दिलेल्या भेटीचे फोटो दिसले. बास्स! मेंदूत जणू ट्युब पेटली. तिचा निर्णय झाला. वृद्धाश्रमातील वृद्ध आपुलकीच्या सहवासासाठी भुकेले, स्नेहमायेसाठी आसुसले असतात. हे तिला तेव्हा जाणवले होते. परंतु, जगण्याच्या गर्दीत ते दुर्लक्षिले गेले होते.

दुसऱ्या दिवशीपासूनच तिने बँकेतून परत येताना जसं जमेल तसं अर्धा-एक तास वृद्धाश्रमात जायचा निर्णय घेतला. सध्या तरी रेवावर घरची कुठलीच जबाबदारी नसल्याने आईबाबांनी नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. रेवाने खूप विचार केला की, जाताना काय बरं घेऊन जावं? बरेच जण आपले वाढदिवस तिथे जाऊन साजरे करतात. एक दिवस स्वतःच्याच सोयीचे, आवडीचे खाऊ घालतात. पण, मग नंतर पुन्हा कधी जात मात्र नाहीत. आपल्याला तसे न करता, पहिल्या भेटीतच एक आश्वासक ओळख व बंध निर्माण करता यायला हवा. तिने वृद्धाश्रमात फोन करून आपली माहिती देऊन येण्याचे प्रयोजन सांगून, वृद्धांची एकूण संख्या वगैरे माहिती विचारून घेतली. बँकेतून निघाल्यावर तिने प्रत्येक आज्जी-आजोबांसाठी निशिगंध व गुलाब घेतलेत. मिटिंग हॉलमध्ये बसलेले सारे वृद्ध रेवाची आतुरतेने वाट बघत होते. एक मुलगी, वाढदिवस किंवा इतर काहीही कारण नसतांना केवळ आपल्याला भेटायला येतेय, याचं त्यांना कुतूहल वाटत होतं. रेवाने पोहचल्याबरोबर सर्वांना हातातील टवटवीत सुगंधी फुलांसह अभिवादन करून, मी तुम्हां सर्वांची नात रेवा! अशी ओळख करून दिली. सुहास्यवदना रेवा सर्वांनाच आवडली. थोडे फार गप्पाष्टक रंगल्यावर रेवाची निघायची वेळ झाली. उद्या येण्याचं आश्वासन व आनंदी दरवळ देऊन रेवा घरी आल्यावर आईबाबांना पूर्वीची हसरी, खेळकर रेवा मिळाल्याचं समाधान वाटलं.

दुसऱ्या दिवशी काही जण रेवाच्या येण्याविषयी साशंक होते. मग तिचा आणि त्यांच्या भेटीचा नित्यक्रम सुरू झाला. रेवाच्या रुपात नात लाभल्याने नातवंडांसाठी झुरणारे आज्जी-आजोबा जाम खुश झाले. हळूहळू प्रत्येकाच्या गरजा, सवयी यांची पुरेपूर जाणीव तिला झाली. मग गप्पांसोबत गाणी, गोष्टी, खेळ तर रंगू लागलेच सोबतच गमतीजमती, मिश्किल विनोदाने हास्याचे फवारेही उडू लागलेत. एखाद्याची मनःस्थिती, भावुकता बघून केवळ हातात हात घेऊन बसल्याने त्या व्यक्तीला पुन्हा आनंदाच्या डोहात उतरवण्याचे कसब रेवाने जणू शिकून घेतले होते. रेवाच्या सहवासात त्यांची संध्याकाळ आनंदीत होऊ लागली. सामान्यतः ज्याच्या जवळ जे नसते, त्याला ते मिळाले की होणारा आनंद सर्वोच्च असतो, असाच अनुभव तेथील वृद्धांच्या बाबतीत कर्मचाऱ्यांसह सर्वांना येत होता. हळूहळू रेवाच्या मित्रमैत्रिणीही तिच्या आग्रहावरून, वेळ काढून जसं जमेल तसं पण, आवर्जून येऊ लागलेत. त्यांनाही सहवासाने मायेची ऊब मिळू लागली. जीवनातील आनंदही वाढल्याचे जाणवू लागले. मग सगळ्यांनी मिळून एक 'आनंदी सहवास' नावाचा समूह तयार केला. ज्याला जमेल तसे प्रत्येकाने महिन्यात दोन तास तरी आपल्या सहवासाने वृद्धाश्रमातील वातावरण उल्हासित अन् आनंदीत करण्यासाठी वेळ द्यायचा, ही एक अट त्यासाठी ठेवण्यात आली. रेवाला जाता येणार नसेल तरी त्यामुळे तिला चुकल्यासारखे वाटत नाही. ती फोनकरून सुद्धा त्यांच्या सहवासात असल्याचा आनंद देऊ-घेऊ शकते. अशा पद्धतीने तिने लावलेल्या रोपट्याचा छान डेरेदार वृक्ष होतोय. तिच्या सहवासाच्या हसऱ्या आनंदी पारंब्यांवर झुलण्याचा अपरिमित आनंद त्यांना मिळत रहावासा वाटतो. कोणत्याही नात्यातील सहवासाचा आनंद हा मनामनाला उभारी देत स्नेहप्रेमाची विण जेव्हा घट्ट करतो तेव्हा मिळणारा आनंद हा खराखुरा ठरतो. आठवणींच्या रूपातही तो तजेला देत राहतो.

काही माणसं निःस्वार्थी मनाने कार्य करतात तेव्हा, त्यांच्या जीवनात आनंदरुपी चंदनी दरवळ कायम राहतो. अशातीलच एक असलेली रेवा माणुसकीच्या धाग्याने अप्रतिम जीवनवस्त्र विणत राहते. त्या वस्त्राला आनंदाची जर आपोआपच लाभते. तिच्यातील सहृदयी, स्नेहस्पर्शी सहवासाने वृद्धाश्रमातील सर्वांना कमालीचा आनंद मिळतो. सोन्यासारख्या माणसांचा सहवास पैशापेक्षा अनमोल असतो, हे कळलं की जीवन सुंदर होते. ज्याच्या त्याच्या आनंदाचे निधान त्याची परिस्थिती, आवड, संस्कार यावर जरी अवलंबून असते तरी, चांदणस्पर्शी सहवासाचा आनंद अनुभवण्यास भाग्यच लागते. चांगली माणसं आणि त्यांचा सहवास एकप्रकारे जीवनाधार आणि आनंदी आधारस्तंभच ठरतो.

## अद्भुत भेट

वर्षा देशपांडे/ ८४२११७८००१

# जेव्हा दिग्गज भेटतात...

**पहिले बाजीराव पेशवे आणि माधवराव पेशवे यांची ही काल्पनिक पण अद्भुत भेट...**

**बाजीराव** : माधवा, काय म्हणतोस? का असा बसला आहेस?

**माधवराव** : काही विशेष नाही. बसलो आहे रमाची वाट बघत! बसा ना!

**बाजीराव** : तुझा मला खूप अभिमान वाटतो माधवा! माझ्या वंशात तुझ्यासारख्या कर्तृत्ववान आणि पराक्रमी पुरुषाचा जन्म झाला.

**माधवराव** : ते सर्व आपल्याकडून मिळालेल्या वारसामुळे! आपल्याकडून पराक्रमाचा वारसा मला मिळाला. मी पराक्रमी असेल तर आपण महापराक्रमी आहात. आपला पराक्रम काय वर्णू मी?

**बाजीराव** : हा तुझा केवळ मोठेपणा!



प्रतिकात्मक छायाचित्र

**माधवराव** : आपला अतुलनीय पराक्रम मला माहिती आहे. आपले पिताश्री ज्यावेळी दिल्लीला बादशहाच्या भेटीला गेले होते त्यावेळी कोवळ्या वयात आपणही त्यांच्यासोबत गेला होतात. आपल्या चाणक्ष बुध्दीमुळे, या भेटीत उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेला राज्य पसरण्याविसाठी किती वाव आहे, याचा आपण अंदाज घेतला. त्यानंतर, मोठमोठ्या लढाया जिंकून मराठी राज्याचा विस्तार केला. केवळ ४० वर्षांच्या काळात आपण ४७ लढाया जिंकल्या. अभूतपूर्व पराक्रम केला आपण आणि म्हणूनच आपला उल्लेख अपराजित थोरले बाजीराव असा केला जातो.

**बाजीराव** : अरे माधवा, तू काय रे माझ्या पराक्रमाची गाथा गातोस? तू तर माझ्यापेक्षाही पराक्रमी निघालास आणि त्यासोबतच अत्यंत बुद्धिमान! मराठा राज्याची विस्कटलेली घडी बसवण्यासाठी तू पेशवाईत घडलेल्या घडामोडींचा सूक्ष्म अभ्यास केला आणि राज्याचा विस्तार केला.

**माधवराव** : मला एक बोच होती. पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा झालेला पराभव आणि त्यातून झालेली मानहानी...ते मला सगळ धुवून काढायचं होतं. म्हणूनच मी आपल्या कारकिर्दीत निजाम हैदर अली याचा बंदोबस्त तर केलाच. शिवाय, उत्तरेत मराठ्यांची सत्ता स्थापन केली. मराठी राज्याला वैभव आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

**बाजीराव** : तू लढाया तर जिंकलास आणि माणसं पण जोडलीत. तुला माणसांची पारख होती. नाना फडणीसांसारखे मुत्सद्दी तर राम शास्त्रींसारखे न्याय निष्ठुर प्रामाणिक दरबारी होते ते केवळ तुझ्यामुळेच! प्रजेला न्याय मिळावा म्हणून न्याय खात्यात तू सुधारणा केली. दारूगोळा, तोफांचे कारखाने सुरू केलेस. नाणी पाडण्यासाठी टांकसाळीची व्यवस्था केली. मराठ्यांच्या राज्यात प्रामाणिक, प्रजाहितदक्ष शासक आणि पराक्रमी योद्धा म्हणून तुझी ख्याती आहे. माधवा, तू गेलास त्यावेळी तुझे वय केवळ २८ वर्षाचे होते. तुला अधिक आयुष्य लाभले असते तर, आपले हे मराठी राज्य किती विस्तारले असते, याची कल्पनासुद्धा करू शकत नाही.

**माधवराव** : खरं आहे आपलं म्हणणं! मला खूप करायचं होतं माझ्या राज्यासाठी! पण, नियती समोर कोणाचंही चालत नाही.

**बाजीराव** : अरे माधवा, तुझ्या कारकिर्दीत मराठ्यांच्या स्वारीने रोहिल्यांना एवढी धास्ती बसली होती की, मराठे येतात अशी कुणकुण लागली तरी रोहिले पळत सुटायचे. हा तुझा खरा पराक्रम !

**माधवराव** : मला या लढ्यात स्फूर्ती देणारी माझी सुशील पत्नी रमा होती. माझ्यासोबत ती सती गेली माझ्या प्रेमामुळे! तशी तर प्रेमवीरांची यादीच देता येईल परंतु, लग्न झालेले प्रेमिक जोडपे म्हणजे रमा माधव! असंच सर्वांच्या तोंडी येतं. अमर प्रेम होतं आमचं!

**बाजीराव** : माझं आणि मस्तानीचं पण होतं रे! मी मरण पावलो याची बातमी तिला कळल्यानंतर तिला धक्का बसला आणि तिने प्राण सोडले.

**माधवराव** : (तिरकसपणे) आणि काशीबाईंचं प्रेम नव्हतं का आपल्यावर?

**बाजीराव** : ती माझी धर्मपत्नी होती. तीच माझ्यावर प्रेम राहणारच.

**माधवराव** : पण, मस्तानी बाईसाहेबांशी आपण विवाह करावा, ही गोष्ट न पटण्यासारखी आहे.

**बाजीराव** : माधवा, छत्रसाल हे मोगलांविरुद्ध युद्ध करून बुंदेलखंडात स्वतंत्र राज्य साम्राज्य निर्माण करणारे! त्यांनी मोगलांविरुद्धच्या प्रत्येक लढाईत विजय मिळविला. उणीपुरी ५६ वर्षे त्यांनी बुंदेलखंडावर राज्य केले. अशा राजाला आम्ही मदत केली. त्यावेळी आपल्या उपपत्नीपैकी एका मुसलमान पत्नीच्या मुलीशी म्हणजेच मस्तानीशी माझा विवाह लावून दिला. मस्तानी ही जगतसुंदरी होती. तिचे सौंदर्य आरस्पानी होते. तिच्या एका कटाक्षाने मी तिच्यात गुंतलो. ती सौंदर्यवती होतीच पण, सोबतच युद्धनीती जाणणारी होती, तलवारबाज होती, शिवाय संस्कार संपन्न होती या सगळ्या गुणांमुळे मी तिच्याकडे आकर्षित झालो. त्यावेळी कर्मठांनी मस्तानी मुसलमान असल्याने माझ्यावर बहिष्कार टाकला. परंतु तिच्या अंगी असलेले गुण कुणीच लक्षात घेतले नाही. एवढे खरे की, मी कोणालाच जुमानलो नाही.

**माधवराव** : आणि पुण्यात आणलं, त्यांना शनिवार वाड्यात आणलं. तिला महाल बांधून दिला.

**बाजीराव** : अरे, माझी पत्नी होती ती! मी तिला पळवून नव्हते आणले.

**माधवराव** : पण, आपले घराणे कोणते...सनातन धर्म पाळणारे आपण आणि तुम्ही विरुद्ध धर्माच्या एका स्त्रीला आणलं. शिवाय, एक पत्नी असताना दुसरी पत्नी?

**बाजीराव** : बरोबर आहे माधवा! तुला वाटणं साहजिक आहे. श्रीरामांसारखं एकपत्नी व्रत धारण केलेला आहेस तू ! नाच गाणे तुला आवडत नसे. अरे, म्हणून काय मी काही वावगं केलं नाही. एवढा महान पराक्रम करून, मराठ्यांचे राज्य मिळवलं आणि फक्त मस्तानीशी विवाह केला तो एवढा बोचावा? आणि आज माधवा तू सुद्धा? (बाजीराव भावनाप्रधान होतात. निघून जातात.)

> **बाजीराव माधवरावांना म्हणाले... तू काय रे माझ्या पराक्रमाची गाथा गातोस? तू तर माझ्यापेक्षाही पराक्रमी निघालास आणि त्यासोबतच अत्यंत बुद्धिमान! मराठा राज्याची विस्कटलेली घडी बसवण्यासाठी तू पेशवाईत घडलेल्या घडामोडींचा सूक्ष्म अभ्यास केला आणि राज्याचा विस्तार केला.**

**माधवराव** : (स्वतःच्या मनाशीच) मस्तानी बाईसाहेबांबद्दल मी बोललो तर यांना वाईट वाटलं. पण, काशीबाईंचं काय? त्यांच्या मनाचा विचार केला कधी? किती कासावीस होत असेल त्यांचा जीव? मस्तानी सुंदर होती असे आपण म्हणता मान्य आहे. छत्रपतीच्या गादीचे सेवक आम्ही! राजे शिवाजी आमचा आदर्श! 'आमची आई अशी सुंदर असती तर आम्हीही सुंदर झालो असतो,' छत्रपतींचे उद्गार अमर आहेत. या मनाला यातना होतात. खूप वाईट वाटतं. इतक्या पराक्रमी बाजीरावांचे नाव त्यांच्या पराक्रमावरून ओळखण्याऐवजी मस्तानीवरून ओळखले जावे? एखाद्या विवाहित पुरुषाचे प्रेमसंबंध असले तर त्या पुरुषाला बाजीराव या नावाने संबोधले जाते. अशा गोष्टी ऐकून माझ्या काळजाचे तुकडे तुकडे होतात हो...

(डोळ्यांतून ओघळणारे अश्रू ते रोखतात. आता रमाबाई त्यांना दुरून येताना दिसतात.)

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६



# पुण्य परउपकार, पाप ते परपीडा

अभंग हा प्राचीन मराठी साहित्यात विकसित झालेला विशेष काव्यप्रकार आहे. तसेच, अभंग हे एक अक्षरवृत्त किंवा छंदाचा प्रकार आहे. हा काव्यप्रकार प्रामुख्याने आध्यात्मिक आशयाच्या अभिव्यक्तीसाठी वारकरी संप्रदायातील संतांनी या काव्यप्रकाराचा व छंदाचा प्रथम उपयोग केला. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ, संत गोरोबा, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत नरहरी सोनार अशा कितीतरी संतांचे विठ्ठलभक्तीपर काव्य हे अभंग स्वरूपात आहेत.

अभंगाचे दोन प्रकार आपण यापूर्वीच बघितले. २ चरणांचा छोटा अभंग आणि साडेतीन चरणांचा/२२ अक्षरांचा मोठा अभंग! त्याची उदाहरणे पण बघितली.

अभंग साहित्य प्रकाराचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते की, अभंगांचा उपयोग केवळ भगवंताची भक्ती एवढाच होता. का? आणि जर तेवढाच उद्देश असता तर जवळपास सातशे वर्षांची परंपरा असलेले अभंग आजच्या काळाला लागू पडणारे राहिले नसते.

पापपुण्याची संकल्पना मांडताना महाराज म्हणतात,

***पुण्य परउपकार, पाप ते परपीडा***

पापपुण्याची इतकी सुंदर, नेटकी व्याख्या कोणीही केली नसेल. पुढे संत तुकोबाराय आपल्या छोट्या अभंगात म्हणतात...

**जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥**
**तोची साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ॥**
**दया करणे जे पुत्रासी । तेची दासा आणि दासी ॥**
**तुका म्हणे सांगू किती । तोची भगवंताची मूर्ती ॥**

साधुसंतांचं लक्षण आणि भगवंताचा रहिवास कुठे असतो? हे त्यांनी अतिशय सोप्या शब्दात व्यक्त केलंय. थोडं विषयांतर होईल पण, तरीही सांगते. हा अभंग मला मराठी तिसरी-चौथीत होता. आज सहा दशके संपलीत तरीही या ओळी मुखोद्गत आहे. हिच या अभंगाची किमया आहे.

बरं, हे सर्व संत केवळ लिहून थांबले नाहीत, तर ते तसं जगले. छत्रपती शिवरायांकडून आलेला नजराणा नम्रपणे नाकारताना,'परद्रव्य आम्हाला मृत्तिकेसमान आहे,' असं ते सांगतात. संत एकनाथ महाराज अंत्यजाच्या लेकराला उचलून घेतात, श्राद्धाचे जेवण भुकेल्याला खाऊ घालतात, ही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. आज ओझोनचा थर, वृक्षकटाई, कमी झालेलं पर्जन्यमान, रानटी पशूंचा नागरी वस्तीत वावर या भितीदायक गोष्टी आहेत. पण, संत तुकारामांनी ते आधीच ओळखलं होतं. ते अभंगात म्हणतात...

***वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे,***
***पक्षीही सुस्वरे आळविती ॥***
***आकाश मंडप पृथ्वी आसन,***
***रमे तेथे मन क्रीडा करी ॥***

पर्यावरण रक्षणासाठी जगाने हा अभंग जरी लक्षात ठेवला आणि तसं सर्व जण वागू लागले तरीही हवं ते साध्य होईल. अंधश्रद्धेवरही त्यांनी आपल्या अभंगातून घणाघात केला. आज पुत्रप्राप्तीसाठी स्त्रिया भोंदू बुवांच्या मागे लागतात, नवस करतात. तर, ४५ वर्षांपूर्वी महाराज म्हणतात...नवसे पुत्र होती, तरी का करणे लागे पती?

आजच्या तथाकथित विद्वानांनी शरमेने माना खाली घालाव्यात, असे हे शब्द आहेत. संसार करणे हे प्रत्येक जीवाचे लक्षण आहेच आणि संसार म्हटला की, सुखदुःख आलेच. मग साहजिकच दुःख झाले की, परमेश्वराकडे गाऱ्हाणं घालायचं! शिवाय, प्रत्येकालाच आपलं दुःख हे मोठं वाटतं. त्यावर महाराजांचे उत्तर आहे,

***सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ॥***

संसार म्हटला की, सुखदुःख आलेच. आजच्या काळात करमणूक किंवा रिलॅक्स होण्यासाठी क्लब, निरनिराळी महागडी ठिकाणं, पिकनिक्स हे सगळं माणूस शोधू लागलाय. मात्र, आनंद कसा शोधायचा, तो कुठे सापडेल? संत तुकाराम महाराजांनी याचं उत्तर साडेचारशे वर्षांपूर्वीच देऊन ठेवलंय.

***आनंदाचे डोही । आनंदतरंग...***
***आनंदची अंग । आनंदाचे***

सातशे वर्षांपूर्वी आमच्या संतांनी या अभंगातून आम्हाला संस्कृती, भूतदया, मानवता आणि लोककल्याणाचा दृष्टीकोन, कार्यवाद, अंधश्रद्धेचा विरोध, जातीपाती न मानणं असं कितीतरी ज्ञान दिलंय. ते केवळ अभंगातूनच नव्हे तर जगण्यातून दिलं. भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन निघालेला वारकरी हा कोणत्याही एका समाजाचा नाही तर, अठरापगड जातीजमाती त्यात आहेत. गोपीचंदनाचा टिळा आणि गळा तुळशीमाळ घालणारा वारकरी ही त्या सर्वांची एकच जात आहे. एकत्र उठणे, बसणे, खाणे, पिणे आहेच.

***खेळ मांडियेला । वाळवंटी घाई,***
***नाचती वैष्णव । भाई रे ॥***
***वर्ण अभिमान । विसरली याती,***
***एक एका लोटांगणी जाती***
***निर्मळ चित्ते झाली नवनीते,***
***पाषाणा पाझर फुटती रे ॥***
***गोपीचंदन उटी तुळशीच्या माळा,***
***हार मिरविती गळा***
***टाळ मृदंग घाई पुष्पवर्षाव,***
***अनुपम्य सुखसोहळा रे ॥***
***होतो जयजयकार गर्जत अंबर,***
***मातले हे वैष्णव वीर रे***
***तुका म्हणे सोपी केली पायवाट,***
***उतरावया भवसागर रे ॥***

वरील एका रचनेचा अभ्यास जरी आपण मन लावून केला, तरी खूप छान होईल.

यात पुरुष संतांसोबतच स्त्रीसंतही आहेत. स्त्रीला भागवत धर्मात 'ताडण के अधिकारी' असं कधीच म्हटलं नाही. सातशे वर्षांपूर्वीची मराठी स्त्री ही सुशिक्षित होती. हे सर्व त्यांच्याही अभंगांवरूनच लक्षात येतं. तिला स्वतःचं आणि पुरुषांच्या बरोबरीचं स्थान होतं. पुरोगामी विचार व्यक्त करण्याचं स्वातंत्र्य होतं. हे सर्व त्यांच्या अभंगातूनच कळते.

अभंग हा काव्यप्रकार अतिविशाल आहे. यात अनेक महान संतांचे अभंग याची किमान ओळख करणे आवश्यक आहे. स्त्रीसंत, त्यांचे अभंग, मुक्ताईचे ताटीचे अभंग हे तर लेखनाचे स्वतंत्र विषय आहेत. मात्र, विस्तारभयास्तव आज इथेच थांबते. याचाच पुढील भाग घेऊन भेटू या पुढील शनिवारी !

> अभंग साहित्य प्रकाराचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते की, अभंगांचा उपयोग केवळ भगवंताची भक्ती एवढाच होता. का? आणि जर तेवढाच उद्देश असता तर जवळपास सातशे वर्षांची परंपरा असलेले अभंग आजच्या काळाला लागू पडणारे राहिले नसते.

# राणी अबक्का



शुभांगी गान/८६५७४२४०७१

राणी अबक्का सोळाव्या शतकातील पहिली तुलुआ राणी ! युरोपियन आक्रमणकर्त्यांबरोबर लढा देणारी पहिली राज्यकर्ती जिने, पोर्तुगीजांबरोबर अखंड चाळीस वर्षे संघर्ष केला. चौटा राजवंशाची, तुलुनाडू (तटीय कर्नाटक) येथील शूरवीर, धाडसी, प्रजाहितदक्ष, व्यापार क्षेत्राला एका उंचीवर पोहचवणारी आणि समर्थपणे आपलं राज्य सांभाळणारी ही साहसी वीरांगना म्हणजे इतिहासातील आणखी एक सुवर्णपान! भारतीय तटरक्षक गस्ती जहाजांच्या श्रृंखलांमध्ये आयसीजीएस राणी अबक्का हे जहाज प्रथम क्रमांकावर आहे. याशिवाय, टपाल खात्याने तिच्या नावाचं तिकीट काढून तिला सन्मान प्रदान केला. वर्ष १५२५ ते १५७० हा तिचा कर्तृत्त्वाचा कालखंड!

राणी अबक्का तुलुनाडू (कोस्टल कर्नाटक) येथील चौटा राजवंशाची ही विरांगना शस्त्र, अस्त्र, राजकारण यात अत्यंत तेजाने तळपत होती. उल्लाल ही तिची राजधानी! मातृसत्ताक पद्धतीचं पालन करणारा हा राजवंश स्त्रियांना शासन आणि संपत्ती यात अग्रणी, अत्यंत महत्त्वाचं स्थान देत असे. या परंपरेनुसार तिचे मामा तिरुमला राय यांनी तिला आपल्यानंतर उल्लालची राणी म्हणून घोषित केलं आणि संपूर्ण राज्यकारभार तिच्या हाती सोपवला. वर्ष १५२५ मध्ये तिचा कार्यकाळ प्रारंभ झाला त्याच काळात पोर्तुगीजांनी गोव्यात आपली सत्ता प्रस्थापित केली होती. त्यांना कर्नाटक तटीय क्षेत्र व्यापाराच्या दृष्टीने अत्यावश्यक वाटत होतं. भारतवर्षाचा जर विचार केला तर, कोणत्याही आक्रमणकर्त्यांचा नेहमी एकच उद्देश असायचा. ते म्हणजे भारतातील अपार धन, इथला व्यापार, इथले सागर किनारे आणि इथली माणसं यावर अधिसत्ता गाजवणं. राणी अबक्का ही कर्नाटक तटिय क्षेत्राची राणी होती. इथून तिचा अरब देशांशी व्यापार चालत असे. अरब व्यापारी आणि कालिकतचे जमेरील यांच्याशी तिचे व्यापारी आणि मैत्रीचे संबंध होते. व्यापाराला प्रोत्साहन दिल्यामुळे तिच्या राज्यात भरभराट होती आणि हेच गोव्यामध्ये बस्तान बसवलेल्या पोर्तुगीजांना खटकत होतं. हा प्रदेश आपल्या ताब्यात असेल तर, आपला व्यापार आपण निर्धोकपणे इतर देशांशी करू शकू. बोलून-चालून अबक्का ठरली स्त्री शासक! तिला आपण सहज मात देऊ शकू, या विचारांना राणीने खोटं ठरवलं. वर्ष १५२५ मध्ये पोर्तुगीजांनी दक्षिण कर्नाटकाच्या मंगलोर बंदरावर हल्ला करून ते नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तिथून उल्लालवर आक्रमण करण्याचा त्यांचा प्रयत्न असफल झाला. उल्लालच्या व्यापाऱ्यांनी स्वस्त दरात माल द्यावा, यासाठी पोर्तुगीजांनी केलेला प्रयत्न तिने हाणून पाडला. एक स्वतंत्र स्त्री राज्यकर्ती असूनही, तिच्या दराऱ्यामुळे पोर्तुगीज काही काळ शांत होते. मधल्या काळात तिचा मंगलोरच्या बंगा या रियासतच्या राजा लक्षमप्पा अरसाशी झालेला विवाह फार काळ टिकला नव्हता. ती उल्लालला परतली आणि तिच्या पतीच्या मनात तिच्याविषयी अढी झाली होती.

राणी अबक्का एक लोकप्रिय राणी होती. जैन धर्माचं पालन करणारी अबक्का धोरणी, न्यायप्रिय, सर्वधर्मसमभावाचं अवलंबन करणारी, कला, व्यापार याचं संरक्षण-संवर्धन करणारी होती. तिच्या सैन्यात सर्व धर्माचे लोक होते. व्यापार क्षेत्र विकसित करताना तिने बंदरांच्या विकासालाही प्राधान्य दिलं होतं. त्यासाठी कालिकतच्या राजाने तिला सहकार्य केलं. एकंदर तिची रणनीती आणि तिचं शासन एका उंचीवर होतं पण, वर्ष १५५५ मध्ये पोर्तुगीजांनी परत एकदा मंगलोरकडे आपली नजर वळवली. राणीला पकडण्यासाठी त्यांनी उल्लालकडे काही सैन्य रवाना केलं. पण, हा हल्ला तिने परतवून लावला. दुसऱ्या वेळेस टॉम अलवेरी डिसिल्हियासोबत त्यांनी मोठी सेना पाठवली. पण, राणी अबक्काने त्यालाही पराभूत करून परत पाठवलं. तरीही पोर्तुगीज शांत बसले नव्हते. त्यांनी तिसऱ्यांदाही तिच्यावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला आणि तिनं त्यांना पराभूत केलं. पण, जिद्दी पोर्तुगीजांनी वर्ष १५६८-६९ मध्ये मंगलोर जिंकलं. उल्लालवर आक्रमण करण्यासाठी जनरल पीक्सोटो मोठी सेना घेऊन आला पण, राणी अबक्काची चाल मात्र तो ओळखू शकला नाही. किल्ल्यात कोणीच नाही हे बघून पोर्तुगीज सैन्य खुश झालं. पण, त्यांच्या ध्यानीमनी नसतांना राणी अबक्काने केवळ २०० सैनिकांसहीत केलेल्या आक्रमणात बेसावध पोर्तुगीज सैन्य मारलं गेलं आणि त्यांचा जनरलही मारला गेला. बंदर पोर्तुगीजांच्या तावडीतून तिने मुक्त केलं. यात जमेरिल या कालिकतच्या राजाने केलेली मदत तिच्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण अशीच होती. युद्धामध्ये अग्निबाणाचा उपयोग करणारी ती शेवटची महिला शासक होती. पण, भारत देशाला जसा गौरवाचा इतिहास आहे तसाच विश्वासघाताचा देखील! राणी अबक्का विश्वासघाताचा बळी ठरली होती. तेही तिच्याच पतीकडून, भरपूर धन घेऊन त्याने तिची योजना, तिच्या ठिकाणाचा तपशील पोर्तुगीजांना दिला. परत एक आक्रमण आणि तिने पराक्रमाची शर्थ केली पण, ती हरली होती. तिला कैद करण्यात आलं. तिच्या शौर्याची ही कहाणी इतिहासाच्या पानांवर गौरवाने अंकित आहे.